म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र. १२९६

म. ग्रं. सं. ठाणे
विषय


म. श्री. दीक्षित



REFBK-0010995

महाराष्ट्रधर्माची स्फूर्तिदात्री देवता :

# जिजामाता



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २७६३८ वि. ...
क्रमांक ... नों. दि. १५/१२/६०

म. श्री. दीक्षित

REFBK-0010995

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०९९५

किंमत दोन रुपये

इनामदार बन्धु प्रकाशन : पुणें

□ प्रकाशक :
बा. शा. इनामदार
इनामदार बन्धु प्रकाशन
९११ सदाशिव, पुणें २

□ मुद्रक :
रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार, पुणें २

□ प्रथमावृत्ति :
विजयादशमी, शके १८८२
३० सप्टेंबर १९६०

□ सजावट :
सुधाकर खासगीवाले

□ पुढील सर्व हक्क
लेखकाचे स्वाधीन

तीर्थरूप आईस—

आई ! तुझ्याच ठायीं सामर्थ्य नंदिनीचें
माहेर मंगलाचें अद्वैत तापसाचें
गांभीर्य सागराचें औदार्य या धरेचें
नेत्रांत तेज नाचे त्या शान्त चंद्रिकेचें.

—यशवन्त

# अंतरंग


□ चरित्राविषयी थोडेंसें... ... पांच

□ संबंधित घटनांचा कालपट ... ... सात

१ : दोन दैवतें ... ... ९

२ : अनाचार आणि अवतार ... १४

३ : जिजाऊचें माहेर ... ... २०

४ : रंगपंचमीचा बेरंग ... ... २५

५ : कन्या सासुऱ्याशीं जाये— ... ३१

६ : ऊन-पावसाचा खेळ... ... ३७

७ : शिवजन्म ... ... ४३

८ : पतीचा पराक्रम आणि पुत्राचें शिक्षणं ... ५१

९ : मायलेकरांची एकरूपता ... ५९

१० : उसनें संभाजीचें व्यावें ... ६४

११ : वीरता आणि करुणा ... ७१

१२ : वात्सल्य, पुत्राचें तसें प्रजेचें... ७७

१३ : हर्ष आणि खेद ... ... ८३

१४ : स्मारक आणि पुण्यस्मरण ... ८९


○ ○ ○

# चरित्राविषयी थोडेंसें

छत्रपति शिवाजी महाराजांच्या जिजामातेचें हें चरित्र वाचकांच्या हातीं देतांना अतिशय आनंद व समाधान होत आहे. जिजामातेचीं स्वतंत्र अशीं चरित्रें मराठींत नाहीत असें नाही. आहेत; पण तीं जेमतेम एका हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीं. त्यांपैकी एक आहे कादंबरीवजा व बाकीचीं आहेत त्रोटक स्वरूपाचीं. तसें म्हटलें तर जिजामातेचें मोठें चरित्र कुणी लिहूं म्हटलें तरी जमणार नाहीं. इष्ट होणार नाही. तथापि, तिजविषयी जास्तींत जास्त माहिती एकत्रित करून तिच्या थोरवीचें यथार्थ गुणवर्णन करणें शक्य आहे. मीं असा एक प्रयत्न केला आहे. अर्थात् एवढें करून चरित्र जेमतेम शंभर पृष्ठांचें, म्हणजे छोटेंच झालें. तथापि, चरित्र छोटें झालें म्हणून चरित्र-नायिकेच्या थोरवीला बाध येत नाही.

विद्यार्थिवर्गाला व सर्वसामान्य जिज्ञासु वाचकाला इतिहासाची गोडी मुख्यतः ऐतिहासिक चारित्रांच्या वाचनाने लागते. अशीं चरित्रें चटकदार, ओजस्वी व भावनापूर्ण रीतीने लिहिलीं गेलीं तर इतिहासाच्या गोडीबरोबर इतर उदात्त संस्कारांचीहि त्यांच्या मनांत पेरणी होते. तरुण वाचकांस स्फूर्ति तर हमखास मिळते. प्रस्तुत ‘ जिजामाते ’चें चरित्र लिहितांना मुख्यतः ही दृष्टि वापरली आहे.

‘ जिजामाता ’ हें चरित्र मीं शक्य तो इतिहासाला धरून लिहिलें आहे. तथापि, चारित्रनायिकेची व्यक्तिरेखा उठून दिसावी, तिची मूर्ति रसरशीत व विलोभनीय वाटावी म्हणून बखरी, पोवाडे, काव्य इत्यादींचाहि उपयोग केला आहे. कांही प्रसंग मी कल्पनेने चितारले आहेत. चरित्र जाणत्या विद्यार्थिवर्गासाठी व इतिहासाची आवड असणाऱ्या सामान्य वाचकांसाठी लिहिलें असल्यामुळे व तेंहि विशिष्ट हेतूने लिहिलें असल्यामुळे वरील सर्व साधनांचा तारतम्याने उपयोग केला आहे. ज्या प्रमुख ग्रंथांच्या आधारें हें चारित्र लिहिलें–फुलवलें त्यांची यादी शेवटीं छापली आहे. चरित्रलेखनाच्या कामीं श्री. वा. कृ. भावे, श्री. वा. सी. बेंद्रे व श्री. दि. वि. काळे

यांच्याशीं केलेल्या चर्चाविनिमयाचा मला लाभ झाला. श्री. ग. गं. जांभेकर यांनी आपल्या संग्रहांतील कांही ग्रंथ मला भरपूर वापरूं दिले. मी या सर्वांचा आभारी आहें.

प्रकाशकमित्र श्री. बाबूराव इनामदार यांनी माझीं लागोपाठ तीन पुस्तकें प्रसिद्ध केलीं. आता ही आणखी एकाची भर ! मजसारख्या होतकरू लेखकास श्री. बाबूरावांनी हें जें सक्रीय उत्तेजन दिलें त्याचें मला विशेष महत्त्व वाटतें.

चित्रकार श्री. सुधाकर खासगीवाले यांनी केलेल्या सजावटीबद्दल मी त्यांचे आभार मानतों.

आश्विन शु. १, शके १८८२
दिनांक २१ सप्टेंबर १९६० —म. श्री. दीक्षित
नवा ८६५ सदाशिव, पुणें २

# जिजामातेशीं संबंधित असणाऱ्या घटनांचा

## कालपट

| | |
|---|---|
| पति शहाजी राजे यांचा जन्म | १५९४ ( सुमारें ) |
| जिजाई आऊचा जन्म | १५९७ ( सुमारें ) |
| शहाजी-जिजाई यांचें लग्न | १६०५ ( सुमारें ) |
| शहाजीस वडिलांची जहागिरी | १६२० ( सुमारें ) |
| शहाजी सासऱ्याकडून जखमी | १६२० |
| जिजाईचे वडील जाधवराव मोंगलांकडे | १६२२–२३ |
| वडील पुत्र संभाजीचा जन्म | १६२३ |
| भातवडीची लढाई ( सासरे विरुद्ध जावई ) | १६२४ |
| शहाजी आदिलशाहीकडे विजापुरास | १६२५ ते १६२८ |
| शहाजी पुन्हा निजामशाहींत | १६२८ अखेर. |
| वडील जाधवराव यांचा खून | २४–७–१६२९ |
| संभाजीचें लग्न–शिवनेरीस | १६३० |
| **शिवाजीचा जन्म**—शिवनेरीस | १९–२–१६३० |
| शहाजी मोंगलांचा मनसबदार | १६३० नोव्हेंबर |
| शहाजीस पुत्रदर्शन | १६३० नोव्हेंबर–डिसेंबर. |
| एकोजीचा ( सावत्र मुलगा ) जन्म | १६३१ |
| शहाजीकडून निजामशाहीचा सांभाळ | १६३२–३६ |
| माहुलीचा वेढा–शहाजीचा पराभव | १६३६ |
| निजामशाहीचा अंत | १६३६ |
| शहाजी पुन्हा आदिलशाहींत | १६३७ |
| शहाजीस बेंगळूरची जहागिरी | १६३९ |
| शिवाजीचें पहिलें लग्न | १६४० एप्रिल. |
| जिजाबाई व शिवाजी बेंगळुराकडे | १६४१ |
| मायलेकरांची पुण्यास पाठवणी | १६४१ |
| जिजाई व दादाजीकडून शिवाजीस शिक्षण | १६४१–४५ |

| | |
|---|---|
| हिंदवी स्वराज्याची शपथ | १६४५ |
| शिवाजी कोंडाणा व पुरंदर घेतो | १६४७ |
| दादाजी कोंडदेवाचा मृत्यु | १९-७-१६४७ |
| शहाजीची कैद व सुटका | १६४८ व ४९ |
| जिजामातेकडून निंबाळकराचें शुद्धीकरण | १६५२ |
| मायलेकरांनी मंत्रोपदेश घेतला | १६५३ |
| वडील पुत्र संभाजीचें वीरमरण | १६५५ |
| संभाजीचा जन्म ( शिवाजीचा मुलगा ) | १४-५-१६५७ |
| संभाजीच्या आईचा ( सईबाई ) मृत्यु | ५-९-१६५९ |
| अफजलखानाचा वध | १०-११-१६५९ |
| पन्हाळ्याचा वेढा | २-३-१६६० |
| बाजीप्रभूचें वीरमरण | १३-७-१६६० |
| शहाजी महाराष्ट्रांत ( ? ) | १६६१ |
| शायिस्तेखानावर छापा | ६-४-१६६३ |
| सुरतेवर पहिली स्वारी | १६६४ जानेवारी. |
| शहाजी राजांचें अपघाती निधन | २३-१-१६६४ |
| जिजाईकडून खवासखानाच्या स्वारीचा इषारा | १६६४ ( ऑक्टो. पूर्वी ) |
| जिजामातेची तुळा-महाबळेश्वरीं | ६-१-१६६ |
| पुरंदराचा तह | १३-६-१६६५ |
| शिवाजीचें आग्र्यास प्रयाण | ५-३-१६६६ |
| आग्र्याहून सुटका | १७-८-१६६६ |
| राजगडास मायलेकरांची भेट | २०-११-१६६६ |
| गड आला, पण सिंह गेला | ४-२-१६७० |
| राजारामाचा जन्म | २४-२-१६७० |
| काशीबाईचा ( सून ) मृत्यु. | ६-२-१६७४ |
| सोनियाचा दिवस--शिवराज्याभिषेक | ६--६-१६७४ |
| **जिजामातेचें निधन** | १७-६-१६७४ |
| शिवाजीमहाराजांचें निधन | ३-४-१६८० |

० ० ०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........... वि. ........
क्रमांक ........... नों. दि. ........
9022Y



## १ : दोन दैवतें

सुमारें तीनशे वर्षांपूर्वी मुसलमानी, म्हणजे परकी सत्तेविरुद्ध झगडून ज्यांनी महाराष्ट्राचें आनंदवनभुवन केलें व हिंदवी स्वराज्याचें तोरण उभारलें त्या छत्रपति शिवाजीमहाराजांचें चरित्र आबालवृद्धांना चांगलें ठाऊक आहे. शिवाजी हें महाराष्ट्राचें चैतन्यशाली दैवत आहे. शिवाजी म्हणजे स्वाभिमान. शिवाजी म्हणजे साहस. शिवाजी म्हणजे पराक्रम. शिवाजी म्हणजे शहाणपण. शिवाजी म्हणजे धर्माभिमान — राष्ट्राभिमान. शिवाजी म्हणजे शक्ति–युक्तीचा स्फूर्तिदायक आदर्श. मराठी माणसें शिवाजीवर नुसतें प्रेम करीत नाहीत, तर त्याची भक्ति करतात, आरती करतात. रामायण–महाभारताप्रमाणेच शिवचरित्राचें वाचन आणि गायन मराठी माणसास प्रिय आहे. शिवाजी महाराजांची थोरवी काय वर्णावी ! किती वर्णावी ! आजवर ती कितीकांनी वर्णिली आहे. मराठी भाषेंत शिवाजीसंबंधी जेवढें लिहिलें गेलें आहे तेवढें एकाहि व्यक्तीविषयी लिहिलें गेलेलें नाही. १९६० साल संपत आलें तरी अद्याप शिवचरित्रें लिहिलीं जात आहेत. त्याच्याविषयी सतत लिहिलें–बोललें जात आहे. शिवाजी ही महाराष्ट्राला व्यक्ति वाटत नाही, तर विभूति वाटते. शिवकालीन लोक तर त्यास अवतार मानीत. समर्थ रामदासस्वामींनी शिवाजीची अलौकिक कर्तबगारी पाहिलेली व ऐकलेली. शिवाजीच्या मागे संभाजीने स्वराज्याचा रथ हाकण्याची जबाबदारी

अंगावर घेतल्यावर समर्थांनी त्यास जो उपदेश केला त्यावरून शिवाजीच्या थोरवीची चांगली कल्पना येते——

**शिवरायास आठवावें । जीवित्व तृणवत् मानावें**
**इहलोकीं परलोकीं राहावें । कीर्तिरूपें ॥**
**शिवरायाचें आठवावें रूप । शिवरायाचा आठवावा प्रताप**
**शिवरायाचा आठवावा साक्षेप । भूमंडळीं ॥**
**शिवरायाचें कैसे बोलणें । शिवरायाचें कैसे चालणें**
**शिवरायाची सलगी देणें । कैसे असे ॥**

पण आपण एक लक्षांत ठेवलें पाहिजे की, मोठीं माणसें जन्मापासून कांही मोठीं नसतात. नदी उगमस्थानीं लहान असते. वृक्ष आरंभाला इवल्याशा बोटाएवढा असतो. शिवाजीने आपल्या पन्नास वर्षांच्या आयुष्यांत अद्भुत पराक्रम केला व अलौकिक कर्तृत्व दाखविलें तें एकाएकी नव्हे. तर हळूहळू, टप्प्याटप्प्याने व क्रमाक्रमाने. गुरुजनांची कृपा संपादून. मातेची प्रेरणा व आशीर्वाद घेऊन. लोकस्थिति जाणून व लोकसंघटना करून आणि शक्तियुक्ति वापरून. नदीसारखीं वळणें घेत ती कर्तृत्वगंगा वाहत होती. कधी शांतपणें, सरळपणें तर कधी वाटेंतल्या खडकांशीं टकरा देत व घनगंभीर आवाज करीत. सागराकडे जातांना नदी रुंदावत जाते त्याप्रमाणे शिवाजीचें कर्तृत्व प्रतिकूल परिस्थितींतहि फोफावत होतें. या कर्तृत्वाला बहर येऊन इ. स. १६७४ च्या ६ जूनला किल्ले रायगडावर शिवाजी महाराष्ट्राचा ‘ राजा ’ झाला.

**देशाचा पालनवाला । तो शिवाजी राजा झाला**
**धर्माचा रक्षणवाला । तो शिवाजी राजा झाला**
**वैकुंठ रायगड केला । लोक तो देवगण बनला**
**शिवराजा विष्णू झाला । वंदन त्याला ॥**

या शब्दांत स्वातंत्र्य-शाहीर कै. गोविंदांनी स्वराज्याची नांदी गाइली

 मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ क्रिं ........ 

आहे. शिवाजीस राज्याभिषेक झाला त्या वेळीं महाराष्ट्रांत आनंदी-आनंद व्हावा हें स्वाभाविकच आहे. तथापि, या राज्याभिषेकप्रसंगीं उपस्थित असणाऱ्या त्याच्या वृद्ध जिजामातेस किती आनंद व्हावा? हर्षातिरेकाने खरें म्हणजे तिचे डोळे याच वेळीं मिटायचे. कर्मधर्म-संयोगाने या प्रसंगानंतर अकरा दिवसांनीच ती निधन पावली व शिवाजी राजे पोरके झाले. होय, पोरके झाले, उदास झाले, बहुत कष्टी झाले, ढसढसा रडलेसुद्धा. एवढा मोठा पराक्रमी, पोलादी पुरुषोत्तम— पण आईच्या ताटातुटीने अजाण बालकाप्रमाणे तो रडला व अपार दु:खीकष्टी जाहला. अन्न जाईना, स्वारीवर निघवेना की कारभार नीट सुचेना. आणि त्याचें कारण एकच—

शिवाजी हें जसें महाराष्ट्राचें दैवत तसेंच जिजामाता हें खुद्द शिवाजीचें दैवत होतें. सर्वस्व होतें. जिजामाता ही केवळ शिवाजीची जन्मदात्री नव्हती तर त्याची स्फूर्ति होती, मार्गदर्शिका होती, आधार होती, सावली होती. शिवाजीच्या कर्तृत्वाचीं पाळेंमुळें जिजामातेच्या अंत:-करणांत: होतीं. शिवाजीला वडील शहाजी राजे यांचा सहवास फारसा लाभलाच नाही; जिजामातेचा मात्र अगदी जन्मापासून भरपूर लाभला. जिजामातेचें पुत्रप्रेम अजोड होतें व शिवाजीची मातृभक्ति अतुलनीय होती. मातृसुख लाभणें ही भाग्याची गोष्ट आहे. त्यांतून जिजामातेसारख्या गुणी व कर्तृत्ववान् मातेचें सहवास-सुख लाभणें आणखीनच दुर्लभ. शिवाजीला अशा अपरंपार मायेचें छत्र लाभलें होतें. राज्याभिषेक-समयींच्या छत्रचामरांपेक्षाहि मातेच्या ममतेच्या छत्राची मातब्बरी त्याला अधिक वाटत होती. आणि कां वाटूं नये?

शिवाजीला जन्म कोणीं दिला? कोणत्या बिकट परिस्थितींत दिला? त्याला दूध कोणीं पाजिलें? न्हायला कोणीं घातलें? काजळ-तीट

करून झोपवीत कोण होतें? अंगाई गीतें कोणीं म्हटलीं? दूध-भात कोणी भरवला? परवशतेचा बागूलबोवा त्याला कोणीं दाखवला? आणि तो पाहून विचकल्यासारखें झाल्यावर राम-कृष्णांच्या गोष्टी सांगून त्याची भीति कोणीं घालविली? शिवाजीच्या बाललीलांना मर्दानी वळण कोणीं लावलें? शिवाजीच्या अचपळ मनाला स्वराज्याची गोडी कोणीं लावली? अवखळ मनोवृत्तीला स्वधर्मप्रेमाचा पान्हा कोणीं पाजिला? घरांत वडील आणि विश्वासाचें माणूस म्हणजे एक दादाजी कोंडदेव. पण त्याला रक्ताच्या माणसाची सर कशी येणार? मायेची ऊब कांही न्यारीच! आईच्या वर्तनाचा व शिकवणीचा मुलांवर सर्वांत अधिक परिणाम होतो. बालपणीं काय किंवा मोठेपणीं काय, शिवाजीला मायेचें व विश्वासाचें वाटणारें एकच परमधाम होतें आणि तें म्हणजे त्याची तीर्थरूप आई—मातुश्री जिजामाता!

शिवाजीसारखा असामान्य पुरुष जिला देवतासमान मानीत होता ती माता केवढ्या योग्यतेची असेल याची कल्पना येऊं शकते. पुत्राच्या मोठेपणांत तिचा फार मोठा वांटा होता. पुत्राच्या मनाची विजिगिषु जडण-घडण तिनेच केली होती यांत शंका नाही. जिजामाता ही केवळ शिवाजीची आई म्हणून मोठी नव्हती. असें मोठेपण कोणाला लाभत नाही, लाभलें तरी टिकत नाही व तसें तें कोणी कोणाला लाभूंहि देत नाही. जिजामातेला स्वतंत्र कर्तृत्व निःसंशय होतें. पण तिचा पुत्र एवढा कर्तृत्ववान् निघाला की, त्याने तिन्ही लोकीं झेंडा लावला. त्यामुळे खुद्द तिचें कर्तृत्व पुसट झालें. वास्तविक पाहतां या अलौकिक मायलेकरांचे जीवनप्रवाह एकमेकांत इतके मिसळले आहेत की, स्वतंत्रपणें एकेकाचा प्रवाह दिसूंच शकत नाही. दोघांच्या इच्छा-आकांक्षा एकरूप होत्या. करतां येईल तें मातेने केलें व उरलेला सिंहाचा वांटा शूर पुत्राने उचलला. सारांश, जिजामातेचें चरित्र म्हणजेच शिवाजीचें

चरित्र व शिवाजीचें चरित्र ( निदान राज्याभिषेकापर्यंतचें ) म्हणजेच जिजामातेचें चरित्र.

कर्तृत्ववान् स्त्रीला कर्तृत्व दाखविण्यास आपल्या धर्मानें किंवा समाजाने कधीहि प्रतिबंध केलेला नाही याची साक्ष इतिहास देईल. जिजामातेच्या चरित्रावरून तरी ही गोष्ट पटण्यासारखी आहे. सामान्य-जनांच्या समजुतीप्रमाणे ज्याला संसारसुख किंवा पतिसौख्य म्हणतात तें जिजामातेला फारसें मिळालें नाही. उलट, तिचें आयुष्य हें अडचणींनी, संकटांनी व मूक दुःखाने भरलेलें होतें. पण अशाहि प्रतिकूल परिस्थितींत या गुणी स्त्रीने पुत्राच्या कर्तृत्वाला खतपाणी घातलें व त्याला स्वतंत्रतेचा राजा झालेला बघण्यांत आपल्या जीविताची सार्थकता मानली.

जिजामाता दीर्घायुषी होती. तिच्या चरित्रांतील जेवढ्या घटना इतिहासांत नमूद आहेत त्यांच्या आधारें तिचें एक सुसूत्र चरित्र आपण समजावून घेऊं. ज्या स्त्रीचें चरित्र नि वर्तन शिवाजी महाराजांस प्रेरक होतें तिचें चरित्र आजच्या सर्वसामान्य वाचकांस, विशेषतः विद्यार्थिवर्गास खात्रीनेच आदर्श व स्फूर्तिदायक वाटेल. कवीन्द्र परमानन्द व सभासदापासून तों पुरंदरे-काळे यांच्यापर्यंत अनेक कवींनी, बखर-कारांनी, संशोधकांनी व चरित्रलेखकांनी शिवचरित्राचें गायन केलें आहे. यांतील ठळक साधनांच्या आधारें प्रस्तुत चरित्रांत जिजामातेची ठसठशीत व रसरशीत मूर्ति उभी करण्याचा यत्न करीत आहें. या मूर्तीची घडण कोणत्या परिस्थितींत झाली ती परिस्थिति आपण आधी पाहूं.

० ० ०



## २ : अनाचार आणि अवतार

जिजामाता ज्या काळांत जन्मली तो काळ परतंत्रतेचा होता. या वेळीं भारतांत जवळजवळ सर्वत्र मुसलमानी सत्तेचा अंमल होता. कांही ठिकाणीं जे हिंदू राजेरजवाडे होते ते दुबळे होते. त्यांना मुसलमानांच्या आक्रमणाचें नेहमी भय वाटत असे. मुसलमानी सत्ता बोलून चालून परधर्मी होती. राज्यविस्तार व धर्मप्रसार हे दोन मुख्य हेतु मनांत धरून मुसलमानांनी भारतांत सर्वत्र आक्रमणें केलीं व हिंदु लोकांतील दुहीचा आणि दुर्बलतेचा फायदा घेऊन त्यांनी आपली सत्ता चांगली दृढमूल केली. मुसलमानांच्या या आक्रमणाला खरा पायबंद घातला तो मराठ्यांनी. उत्तरेच्या रजपुतांनी मोंगली आक्रमणाच्या लाटा थोपविण्याचा थोडाबहुत प्रयत्न केला. पण तो फारसा यशस्वी झाला नाही. कित्येक रजपूत राजे व सरदार मुसलमानांची चाकरी करण्यांत धन्यता मानीत होते. त्यांच्यापैकी कित्येकांनी दिल्लीवर मोंगली सत्ता बळकट करण्यास चांगला हातभारहि लावला आहे.

भारतांत मुसलमानांच्या स्वाऱ्या होण्यापूर्वी अर्थातच हिंदु व बौद्ध राज्यें नांदत होतीं. आपणाला सबंध भारताच्या परिस्थितीशीं तूर्त कर्तव्य नाही. आपण नर्मदेच्या दक्षिणेकडील भारताची व महाराष्ट्राची परिस्थितीच स्थूलमानाने पाहूं. मुसलमानांचीं आक्रमणें वायव्येकडून

झाल्याने प्रथम त्यांची सत्ता उत्तर भारतांत पसरणें साहजिक होतें. दक्षिणेकडे ती सत्ता पसरण्यास कांही काळ लोटावा लागला. त्यांतून दक्षिणेकडचा भाग हा डोंगराळ व त्यामुळे दळणवळणास थोडा गैर-सोईचा असल्यामुळे या अपरिचित भागांत त्या सत्तेचा प्रसार सुलभपणें होणें शक्य नव्हतें. दक्षिण भारतांत, म्हणजे महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणादि भागांत, मुसलमानी सत्ता प्रस्थापित होण्यापूर्वी आंध्रभृत्य, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव अशी हिंदू साम्राज्यें नांदत होतीं. कदंब, शिलाहार अशीं लहान-मोठीं राज्येंहि सुखेनैव विसावत होतीं. पण हीं सारीं साम्राज्यें नि राज्यें संकुचित धर्मभावना, जातिभेद, सत्ताभिलाषा इत्यादि कारणां-मुळे पोखरत गेलीं व अखेर आक्रमक सत्तेने तीं धुळीला मिळविलीं. खिलजी साम्राज्याने नर्मदा-तापीच्या अलीकडे एकदा हातपाय पसरण्यास सुरुवात करतांच हिंदूंना विजयश्री मुळी सोडूनच गेली.

महाराष्ट्रांत इ. स. ११८७ ते १३१८ पर्यंत यादवांचें साम्राज्य होतें. तें कोलमडून पडलें. तदनंतर महाराष्ट्र, कर्नाटक व तेलंगणादि मुलुखाला हसन गंगू ऊर्फ अलाउद्दिनाच्या बहामनी राज्याने ग्रासलें. ही राजवट सुमारें दीडशे वर्षें टिकल्यावर ( इ. स. १५२६ पर्यंत ) तिचीं पांच छकलें होऊन स्वतंत्र शाह्या स्थापन झाल्या. अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही व गोवळकोंडयाची कुतुबशाही या तीन शाह्या ( राजवटी ) त्या वेळीं प्रमुख होत्या. याशिवाय चौथी यांच्यापेक्षा प्रबळ अशी दिल्लीला मोंगल बादशहांची सत्ता होती ती वेगळीच. मुसलमानांच्या या चार सत्ता वावरत असतांनाच दक्षिणेकडे तुंगभद्रेपलीकडे कन्याकुमारीपर्यंत एकमेव असें हिंदु साम्राज्य टिकून होतें आणि तें म्हणजे विजयनगरचें. साधारणपणें कर्नाटकांत हें साम्राज्य नांदत होतें असें म्हटलें तरी चालेल. तथापि, बहामनी राज्याचीं छकलें झाल्यानंतर सुमारें चाळीस-पन्नास वर्षांनी हें स्वराज्यहि अस्तंगत

झालें ( इ. स. १५६५ ). या साम्राज्याचे कांही अवशेष लहानमोठ्या राजेरजवाड्यांच्या रूपाने पुढे कित्येक वर्षे तग धरून होतें; पण आदिलशाहीने त्यांच्यापैकी अनेकांना गिळंकृत केलें. अशा रीतीने संपूर्ण महाराष्ट्र व दक्षिण भारतांत मुसलमानांची सत्ता प्रस्थापित झाली, इतकेंच नव्हे तर ती हिंदू लोकांच्या थोडीबहुत अंगवळणींहि पडली.

मुसलमानांच्या या ज्या चार सत्ता नांदत होत्या त्यांचा कारभार सर्वसाधारणपणें हिंदू प्रजेला मोठा जाचक होता. विशेष म्हणजे या चार सत्ता एकाच धर्माच्या असून आपापसांत सत्तेसाठी व राज्य-विस्तारासाठी झगडत होत्या. कोण केव्हा बादशहा होईल व वजीर होईल याचा नेम नसे. कोण कोणाशीं लढाई करील किंवा तह करील याचाहि अंदाज नसे. दक्षिणेंतील तिन्ही शाह्यांवर दिल्लीकर मोंगल बादशहा वर्चस्व गाजवीत. किंबहुना त्या गिळंकृत करण्याचाच त्यांचा सतत यत्न होता. याउलट मोंगली वर्चस्व झुगारून देण्यासाठी दक्षिणेंतील तिन्ही शाह्यांची वरवर एकजूट दिसे. पण स्वार्थासाठी या शाह्या पुन्हा आपापसांत भांडत असत. एकमेकांवर त्यांचा विश्वास नसे. लढाया, तह, राज्यकारभारांतील खांदेपालट, खून, मुलुखगिरी हे प्रकार सतत चालू असत. त्यांतल्या त्यांत निजामशाहीचा कारभार जरा सुसह्य होता. हिंदूंना थोड्याफार स्वाभिमानाने दिवस काढतां येत होते. पराक्रमी व गुणी हिंदूंच्या कर्तृत्वाला निजामशाहींत पुष्कळ वाव होता. तसें म्हटलें तर सर्वच मुसलमान सत्ताधीशांच्या पदरीं थोडेबहुत हिंदू लोक होतेच. या लोकांच्या बळावरच त्यांच्या सत्ता भारतांत लवकर रुजल्या व फोफावल्या. तथापि, निजामशाहींत हिंदूंच्या कर्तृत्वाला अधिक वाव असे यांत शंका नाही.

मुसलमानी सत्ता हिंदूंना जाचक कां वाटत होत्या ? पहिलें उघड

कारण म्हणजे त्या सत्तांचा हेतु राज्यविस्तार व धर्मप्रसार हा होता. या हेतूच्या सिद्धीसाठी मुसलमानांनी साम-दाम-दंड-भेदादि सर्व मार्ग अवलंबिले. विशेषतः दाम-दंड-भेदावर म्हणजे, अन्याय व जुलमावरच त्यांचा अधिक भर होता. उत्तरेकडून येणाऱ्या व तिकडून आल्यावर स्थायिक झालेल्या कडव्या मुसलमानांनी हिंदू प्रजेवर अतिशय जुलूम केला. हा जुलूम नानाप्रकारचा होता. लढाईच्या प्रसंगीं लूटमार व जाळपोळ केली जाई. सक्तीने बाटवलें जाई. जबरदस्तीने दंड व कर वसूल केला जाई. मंदिरें पाडलीं जात. मूर्ति फोडल्या जात. स्त्रियांची अब्रू कधीच सुरक्षित नसे. मायबहिणी राजरोस पळविल्या जात. प्रजेचें जीवित सुरक्षित नसे. मुसलमानी परचक्रामुळे सर्वत्र गलबला माजून गेला. प्रजेची अक्षरशः नागवण होत होती. मुळांत आपला महाराष्ट्र तुटपुंज्या उत्पन्नाचा. कष्ट केल्याशिवाय अन्न मिळणार नाही अशी स्थिति. प्रदेश दगडाधोंड्यांचा. लोक काटक व कणखर, तसेच गरीब व धर्मभोळे. पण परतंत्रतेच्या वरवंट्याखाली भरडून निघत होते. त्यामुळे स्वार्थ, अनाचार व भ्याडपणा बोकाळला. परक्यांची चाकरी कित्येकांना करावी लागे. मग हळूहळू त्यांची भाकरीहि गोड लागे. मुसलमानांचें राज्य ही आपत्ति दैवी व अटळ वाटूं लागली. स्वाभिमान लोपला, पराक्रम संपला. पराक्रम गाजवलाच तर तो स्वार्थासाठी व परसत्तेचे हात बळकट करण्यासाठी. अशा निःसत्त्व वातावरणांत दुष्काळासारखी अस्मानी आपत्ति आदळली की, मग प्रजेचे हाल कुत्रें खात नसे. प्रजा निराधार व अनाचारी होई.

ज्ञानेश्वर, तुकाराम व रामदासादि साधुसंतांनी प्रजेची ही परतंत्र, दुःखी-दरिद्री अवस्था पाहिली व तळमळीने लिहून ठेवली. तत्कालीन राजकीय परिस्थितींत समाजजागृतीचें जेवढें कार्य करतां येईल तेवढें त्यांनी केलें. जिजामातेने शिवाजीला जन्म देण्यापूर्वी तुकाराम व

रामदासांनी तत्कालीन समाजस्थितीचें जें भेदक चित्र रंगविलें तें अगदीच बोलकें आहे—

**सोडिले आचार । द्विज चहाड झाले चोर**
**टिळे लपविती पातडी । लेती विजारा कातडी**
**नीचाचे चाकर । चुकलीया खाती मार**
**राजा, प्रजा पीडि । क्षेत्रीं दुश्चितासी जोडी**
**वैश्यशुद्रादिक । हे तो सहज नीच लोक**
**तुका म्हणे देवा । काय निद्रा केली धावा.**

× × ×

**पदार्थमात्र तितुका गेला । नुस्ता देशचि उरला**
**येणें करितां बहुतांला । संकट जालें.**
**माणसा खावया अन्न नाही । आंथरूण पांघरूण तेंहीं नाही.**
**घर कराया सामग्री नाही । काय करिती.**
**कितेक अनाचारी पडिली । कितेक याति भ्रष्ट जाली**
**कितेक ते आक्रंदलीं । मुलेंबाळें**
**कांहीच पाहतां घड नाही । विचार सुचेना कांही**
**अखंड चिंतेच्या प्रवाहीं । पडले लोक.**

धार्मिक प्रवृत्तीच्या हिंदू प्रजेवर धर्मांध सत्ताधाऱ्यांकडून कसा जुलूम होत असे याचा एक ठळक दाखला सांगण्यासारखा आहे.

पुणें जिल्ह्यांतील आंबेगाव तालुक्यांत घोडे येथे एक जुनी मशीद आहे. त्या मशिदींतिल इ. स. १५८६ च्या फारशी शिलालेखांत 'हे मुहम्मदा, जनाब मीर मुहम्मद झमान याने परमेश्वराच्या कृपेसाठी तीस व तीन देवळें मोडलीं व या खराबाबादेंत (घोडें) इमारतीचा पाया घातला' असें प्रौढीने लिहिलें आहे. मशीद उभारण्यासाठी देवळें पाडायचीं, आणि परमेश्वराची कृपा संपादन करायची! केवढें

अज्ञान ! केवढी असहिष्णुता ! या उलट परमेश्वरावर हरघडी कोसळणारें हें संकट निवारण्यासाठी हिंदूंनी मात्र केवळ त्या परमेश्वराची करुणा भाकली, प्रार्थना केल्या, अवतार घ्या म्हणून विनवण्या केल्या. जुलमी सत्ता त्यांना नकोशी झाली होती. पण सर्वस्वी देवावर भार घातल्यामुळे त्यांना मार्ग सापडत नव्हता. जे पराक्रमी होते ते बलाढ्यांची चाकरी करीत होते आणि जे दुर्बळ होते ते अगतिकतेने अवताराकडे डोळे लावून बसले होते. म्लेंच्छसत्तेने पिडलेल्या लोकांची शिवजन्मापूर्वी भावना काय होती हें ' राजव्यवहारकोशां 'तील पुढील ओळींवरून दिसून येईल :

**देवदेव रिपवो वसुंधरां पीडयन्ति यवना भृशातुरं ।**
**तत्कुरुष्व जगतीसमीहितं म्लेंच्छवर्गमधुना शृणीहि तं ॥**
**साध्वी जिजूर्नाम सुलक्षणास्ते पत्नी दिलीपस्य सुदक्षिणेव ।**
**त्वं शाहपृथ्वीपतिवीरपत्न्यामस्यां समासाद्य मनुष्यजन्म**
**म्लेंच्छापहत्या सुखमारचय्य भूमेः पुनः स्थापयवर्णधर्मान् ॥**

अर्थ– हे देवाधिदेवा, हे यवन पृथ्वीला भारी पीडा देत आहेत. त्यांचा नाश करून तूं लोकांना संकटांतून सोडव. पृथ्वीपति शहाजीराजांची साध्वी वीरपत्नी जिजाबाई केवळ दिलीपराजाच्या पत्नीसारखी आहे. तिच्या पोटीं, देवा, तूं जन्म घे म्हणजे या म्लेंच्छांचा ( यवनांचा ) नाश होऊन वर्णधर्माची पुन्हा स्थापना होईल व पृथ्वीला सुख लाभेल.

० ० ०



## ३ : जिजाऊचें माहेर

ज्या थोर स्त्रीनें शिवाजीस जन्म दिला तिचें कुल, म्हणजे घराणें, गर्भश्रीमंत, पराक्रमी, प्रतिष्ठित व नांवाजलेलें होतें. जाधव हें या घराण्याचें नांव. देवगिरी ऊर्फ दौलताबाद येथील यादव साम्राज्य कोलमडून त्यांतील राजवंशाच्या ज्या अनेक शाखा-उपशाखा झाल्या त्यांतील एक शाखा सिंदखेडला वसति करून राहिली. पुढे यादव नांवाचा लोप होऊन ' जाधव ' नांव प्रचलित झालें असावें. जाधवांचीं कांहीं घराणीं देऊळगाव, औरंगाबाद इत्यादि भागांत पांगलीं व एक घराणें सिंदखेडला स्थिरावलें. जिजाऊ याच सिंदखेडच्या घराण्यांतली. सिंदखेड गाव पूर्वी निजामशाहींत होतें. सांप्रत तें विदर्भांतील बुलढाणा जिल्ह्यांत मेहकर तालुक्यांत आहे. कृष्णाची रुक्मिणी विदर्भकन्या होती. विदर्भाच्या संपन्न कुशींत तदनंतर जन्मलेली कुलकन्या म्हणजे जिजाऊ, जिजू किंवा जिजी. सिंदखेडच्या आसपासचा प्रदेश सुपीक व डोंगराळ. पैनगंगा व खडकपूर्णा या नद्यांनी पावन झालेला. पाऊसपाणी बऱ्यापैकी. हवा साधारणपणें थंड. जवळच अजिंठ्याचा डोंगर. औरंगाबाद व वेरूळ हीं प्रसिद्ध ठिकाणेंहि फारशीं लांब नाहीत.

जिजाऊच्या वडिलांचें नांव लखूजी जाधव व आईचें नांव गिरजाबाई ऊर्फ म्हाळसाबाई. जुन्या ऐतिहासिक वाङ्मयांत लखूजीचा उल्लेख सर्वत्र

१००९५

लुखजी किंवा लुकजी जाधवराव, या नांवाने केलेला आढळतो. लखूजीचें मूळ नांव लक्ष्मणसिंह असल्याचाहि उल्लेख आहे. लक्ष्मणसिंहाचें व्यवहारांत लुखजी किंवा लखूजी होणें अगदी शक्य वाटतें. तसेंच या शाण्णव कुळी घराण्याची प्रतिष्ठा लक्षांत घेतां ' जाधवा 'चें जाधवराव हें बहुमानार्थक रूप रूढ होणेंहि शक्य आहे. लखूजी जाधवरावाचा जन्म नेमका कोठे व केव्हा झाला हें इतिहास सांगूं शकत नाही. तथापि, निजामशाही राज्यांत दौलताबादेच्या आसपासच तो होणें शक्य दिसतें. लखूजीचा १६३० सालीं निजामशाही दरबारांत खून झाला. त्या वेळीं तो पाऊणशे-ऐशीं वर्षांचा होता असा एक उल्लेख मिळतो. जिजामाता मृत्युसमयीं अशीच दीर्घायुषी होती. वंशपरंपरा किंवा आनुवंशिकता लक्षांत घेतल्यास लखूजीचा वृद्धापकाळ खरा मानण्यास हरकत नाही व तसा तो मानल्यास इ. स. १५५० च्या सुमारास त्याचा जन्म झाला असावा. जिजाऊचा सासरा मालोजी भोसले हा वयाने जवळजवळ लखूजीच्याच बरोबरीचा होता.

जाधव मंडळींचीं नांवें बहामनी राज्यापासून ऐकूं येतात. गोविंदजी व ठाकूरजी जाधव हे त्या राज्यांतील प्रसिद्ध पुरुष होत. तालिकोटच्या लढाईंत मुसलमानांतर्फे लढणाऱ्यांत विठोजी जाधव या सरदाराचा उल्लेख आहे. लखूजीसकट सर्वच जाधव मंडळी पराक्रमी होती. शेतीवाडीपेक्षा त्यांची मदार पराक्रमावर होती. तलवार गाजवावी, सरदारकी मिळवावी व राजाप्रमाणे ऐश्वर्यास चढावें अशी या घराण्याची परंपरा दिसते. यादववंशाचा अभिमान त्यांच्या रक्तांत सळसळत असला पाहिजे. अशा पराक्रमी वीरांना मोंगली सत्ता नेहमी सरदारकीचें व मनसबीचें आमिष दाखवी. हिंदू लोकांना हाताशीं धरण्या-शिवाय हिंदूंवर राज्य करणें त्यांना शक्य नसे. या वीरांच्या अंगीं कुलाभिमान, जात्यभिमान पराकोटीचा होता. तथापि, यांचे अभिमान

व पराक्रम हे फक्त स्वतःपुरते व स्वजनांपुरतेच असत. आपला धर्म, देश व समाज यांची चिंता त्यांना फारशी नव्हती. स्वराज्याची कल्पना त्यांना कधी शिवली नाही. स्वातंत्र्याची आकांक्षा त्यांनी कधी धरली नाही. त्यामुळे यांच्या पराक्रमाचा फायदा परक्यांना मिळे. स्वतंत्रतेची दृष्टीच नसल्यामुळे आमचे हे वीरपुरुष स्वहितासाठी कधी मोंगलाईत, तर कधी निजामशाहींत, तर कधी आदिलशाहींत चाकरी करीत व तेथे प्राप्त होणाऱ्या मानसन्मानावर तृप्त राहत. तृप्त किंवा संतुष्ट होण्याने प्रगति खुंटते, कर्तृत्व खुरटतें.

जिजाऊचे वडील लखूजी हे कुलाभिमानी, महत्त्वाकांक्षी व पराक्रमी होते. त्यांच्या अंगीं विलक्षण धैर्य व तडफ होती. स्वभाव थोडा रागीट व अस्थिर स्वरूपाचा होता. वृत्ति कांहीशी सुखासीन होती. मूळचा तो सिंदखेडचा देशमुख. पराक्रमाच्या ईर्ष्येने फौजबंद झाला. फौजबंद लढवय्यांना चाकरीची कधीच वाण नसे. लखूजीचे गुण हेरून निजामशहाने त्याला आपल्या पदरीं बाळगलें. पुढे त्याचा वाढता पराक्रम पाहून सिंदखेड, पडतूर, खेरडें वगैरे प्रांत त्याला खाजगी खर्चास दिले व पंचहजारी सरदारकी बहाल करून वैजापूर, गांडापूर, फुलंबर, पैठण वगैरे महाल खर्चासाठी लावून दिले. निजामशहाची त्याच्यावर अतिशय मर्जी बसली. इतकी की, एकदा भाऊबीजेला लखूजीच्या पत्नीने, म्हणजे म्हाळसाबाईने शहाला ओवाळलें व त्या निमित्ताने किल्ले दौलताबादची देशमुखीहि लखूजीस प्राप्त झाली. लखूजीकडे या वेळीं २७ महाल व ५२ चावड्यांचा अधिकार होता असें म्हणतात. यावरून निजामशाहींत तो किती श्रेष्ठ पदाला पोचला होता याची कल्पना येते.

लखूजीस एक धाकटा भाऊ होता. त्याचें नांव जगदेवराव. भावा-भावांचें एकमेकांवर फार प्रेम होतें. जगदेवरावास मूलबाळ नव्हतें.

त्यामुळे भावावर व त्याच्या मुलांवर त्याची फार माया होती. जिजाऊला तर त्याचा फार लळा होता. लखूजीचा एक मुलगा बहादुरजी याला जगदेवरावाने दत्तक घेतलें होतें. खुद्द लखूजीस चार मुलगे व एक मुलगी अशीं अपत्यें होतीं. दत्ताजी, अचलोजी, रघूजी व बहादुरजी हे चार मुलगे व जिजाऊ ही मुलगी. जिजाऊ एकुलती एक मुलगी असल्याने आईवडिलांची ती साहाजिकच लाडकी होती. तिचा जन्म सिंदखेड येथे इ. स. १५९७ च्या सुमारास झाला. लखूजीचा थोरला मुलगा दत्ताजी इ. स. १६२० च्या सुमारास हत्तीवरून माजलेल्या एका चकमकींत भोसल्यांकडून मारला गेला. त्याला एक मुलगा होता. त्याचें नांव यशवन्तराव. भोसले कुटुंबांत जिजाऊ पडल्यानंतर हीं दोन्ही कुटुंबें कांही वर्षें सलोख्याने नांदत होतीं. तथापि, मालोजीच्या पश्चात् हा सलोखा नीट राहिला नाही. हत्तीच्या निमित्ताने उडालेली चकमक, तदनंतर १६२४ सालीं झालेली भातवडीची लढाई, पुढे जांवयाचें (शहाजी) दरबारांत वाढलेलें प्रस्थ इत्यादि निमित्ताने या दोन्ही कुटुंबांचे संबंध चांगलेच विघडले होते. लखूजीचा खून होण्यापूर्वी कांही दिवस हे संबंध पुन्हा सुधारले व त्याच्या खुनानंतर तर पूर्वीचा सलोखाहि निर्माण झाला. शिवाजीच्या नातवापर्यंत, म्हणजे शाहूपर्यंत या दोन कुटुंबांतील कर्ते पुरुष सहकार्याने नांदत असल्याचें आढळतें. लखूजीस बहादुरजी नांवाचा जो मुलगा होता त्याची नात (मानसिंग याची मुलगी) राजसबाई ऊर्फ अंबिकाबाई शाहूस दिली होती. तसेंच दुसरा एक मुलगा अचलोजी याला संताजी ऊर्फ सुजनसिंह नांवाचा मुलगा होता. तो शिवाजीचा थोरला भाऊ संभाजी याजबरोबर असे. कर्नाटकांत कनकगिरीच्या लढाईंत संभाजीबरोबर तो मारला गेला असें सांगतात.

जाधवांचें घराणें हें असें पराक्रमी होतें. खुद्द लखूजी पराक्रमाच्या जोरावर निजामशहाला व मोंगलांना झुलवीत होता. मलिकंबराला वऱ्हाडचा भाग मिळवून देण्यांत लखूजीने मोठी मदत केली होती. पुढे अंबरचें नि त्याचें बिनसून तो मोंगलांना मिळाला. चांदबिबीने अहमदनगर लढविलें त्या वेळच्या लढ्यांतहि लखूजीने मर्दुमकी गाजविल्याचा उल्लेख मिळतो. जिजाऊचे वडील हे असे पराक्रमी व कर्ते होते. एका बखरींत त्यांचें वर्णन 'लुकजी जाधवराव देशमुख, सरकार दौलताबाद, सिंदखेडकर, निजामशाही मनसबदार' असें केलेलें आढळतें. बालपणीं जिजाऊ कधी सिंदखेडास तर कधी दौलताबादला असे. या चुणचुणीत मुलीला आईबापांनी कधी कांही कमी पडूं दिलें नाही.

० ० ०



## ४ : रंगपंचमीचा बेरंग

इ. स. १६०५ चा सुमार असेल. जिजाऊ या वेळीं सात-आठ वर्षांची असावी. परकर-चोळी नेसणारी मुलगी. मोठी चुणचुणीत, चलाख आणि पाणीदार. बोलकी आणि खोडकर. तिची वेणी घालायची म्हणजे दासींची कोण तारांबळ उडे ! रस्त्यांतून जाणाऱ्या हत्तींची मिरवणूक बघण्यांत जिजीला कोण आनंद वाटे ! आपल्या रागीट आईचीसुद्धा तिला भीति नसे. दासी तिला हाक मारून, हात धरून वाड्यांत नेत. पण मिरवणूक संपेपर्यंत ती उठत नसे. जसा हत्ती पाहण्याचा हट्ट तसाच घोड्यावर बसण्याचा. पागेंत तऱ्हतऱ्हेचे उमदे नि देखणे घोडे होते. तांबडे, काळे आणि पांढरे. कांही भीमथडी तर कांही अरबी. पाठीवर थाप मारली की, फुरफुरणारे आणि खाण्याची वेळ झाली की खिंकाळणारे. पागेंतील या घोड्यांच्या रांगा बघून जिजाचें मन फुलून येई. मोतदाराचा हात धरून एखादवेळीं ती घोड्याच्या शेपटीचा झुबका ओढे तर एखादे वेळीं पांढऱ्याशुभ्र घोड्यावर बसण्याचा हट्ट धरी. श्रीमंताची लाडकी लेक. तिचा हट्ट कोण पुरवणार नाही ? कधी कधी वाड्यांतल्या शस्त्रागारांत जिजा जाई. नको म्हटलें तरी जाई. आईने धोपटलें तरी जाई.

देवघरांत आई पूजा करीत असे. भिंतींवर दोन रंगीत चित्रें काढलेलीं होतीं. एक चित्र होतें धनुर्धारी राम-लक्ष्मणाचें आणि दुसरें होतें द्रौपदी-वस्त्रहरणाचें. रावणाला मारण्यासाठी श्रीराम लंकेला निघाले

होते. पण गर्विष्ठ समुद्र वाट देईना. अखेर रामाने त्वेषाने धनुष्याला बाण लावला व पवित्रा घेतला. समुद्र घाबरला. त्याच्या बायका भयभीत होऊन वर आल्या व त्यांनी विनवणी केली, ' दयार्णव रामचंद्रा, वाट देऊं, पण बाबा आमचं सौभाग्य सांभाळ. ' दुसऱ्या चित्रांत कौरवसभा भरली होती. असहाय्य द्रौपदीचें दुष्ट दुःशासन भरसभेंत वस्त्रहरण करीत होता. दुर्योधनादि दुर्जन तो प्रसंग मिटक्या मारून पाहत होते आणि द्रौपदीचे महाप्रतापी पति खाली माना घालून तो सारा प्रकार सहन करीत होते. अर्जुनाचे बाहू स्फुरण पावत होते. भीम दात-ओठ खात होता. पण या वेळीं ते परिस्थितीचे गुलाम होते. द्रौपदीचा धावा एकट्या श्रीकृष्णाने ऐकला आणि म्हणून तर तिची अब्रू राखली गेली.

जिजाने एकदा आईला विचारलें, ' आई, रामाने रावणाला मारलें तें धनुष्यानेच की नाही ? '

' होय बाई, धनुष्यानेच. '

' मग आपल्याकडे तसे धनुष्यबाण कुठे दिसत नाहीत ? '

जिजाचा हा प्रश्न ऐकून आई चपापली. कांही तरी उत्तर द्यायचें म्हणून ती म्हणाली, ' अग, एक होतं. पण तें किनई, तुझ्या आजोबांच्या हातून मोडलं. '

आईला अडविण्याच्या बुद्धीने जिजाने मग दुसरा प्रश्न केला—

' त्या चित्रांतली द्रौपदी कां ग रडते ? '

' तिची अब्रू घेतो आहे ना तो मेला—'

' हं; तो म्हणजे दुःशासन ना ? '

' हो, तोच तो–दुष्ट—'

' पण कां ? '

जिजीच्या या प्रश्नाने आई त्रासली, अन् म्हणाली, ‘ जिजा, तूं अजून लहान आहेस. असे प्रश्न विचारूं नयेत. मोठी झालीस म्हणजे समजेल तुला आपोआप. जा आता, बादशहाची स्वारी निघालेली दिसते. ’

जिजा पटकन् उठली नि धावत धावत जाऊन दिंडीदरवाजांत उभी राहिली.

जिजाच्या किशोर लीला, बालपृच्छा व खोड्या पाहून आईने जाणलें की, लेक मोठी होत चालली, शहाणी होत चालली. सणासुदीला किंवा मंगलप्रसंगीं थोरामोठ्यांच्या बायका एकत्र जमत. जरीच्या खणाची परकर-चोळी नेसलेली चिटुकली जिजा सर्वांची नजर वेधून घेई. म्हाळसा-बाईंना वाटे की, ‘ पोर दृष्टावणार, लवकर उजवून टाकावी हें बरं. ’ मग एक दिवस रात्रीं त्यांनी जाधवरावांपाशीं गोष्ट काढली. जाधवराव या वेळीं नुकतेच स्वारीवरून परतले होते. फाल्गुनाचा महिना होता. होळी-रंगपंचमी जवळ आली होती. रंगलेला विडा पितळी पिकदाणींत टाकून ते म्हणाले, ‘ अहो, दिपवाळीनंतर येणं झालं. पोर आता मोठी दिसाया लागली खरी. बघूं जमलं तर या वैशाखांत. ’

होळी विझली, धुळवड संपली आणि रंगपंचमीचा मजेचा दिवस उगवला. लखूजी जाधवरावांच्या वाड्यांत दुपारच्या दरबाराची नि पानसुपारीची एकच धांदल उडाली. वाड्याबाहेरील देवडीजवळ सनई-चौघडा गर्जत होता. सरदार — जहागिरदारांची रीघ लागली होती. दरवाजावर जाधवरावांचे थोरले पुत्र सर्वांचें स्वागत करीत होते. आंत मोठा चौक होता, तो ओलांडून पायऱ्या चढल्या की, लांबलचक ऐसपैस ओटी होती. नक्षीदार छताला हंड्याझुंबरें लगडलीं होतीं. चौकाकडील खांबांचें नक्षीकामहि चित्तवेधक होतें. आंब्याच्या डहाळ्यांचा नि उदबत्त्यांचा घमघमाट सुटला होता. बैठक सुशोभित व

जाधवरावांच्या ऐश्वर्याला साजेल अशीच होती. ठिकठिकाणीं तक्क्ये-लोड व गालीचे अंथरले होते. पिकदाण्या होत्या, पानसुपारीचीं ताटें होतीं, अत्तरदाण्या-गुलाबदाण्या होत्या आणि हुक्केहि होते. याशिवाय भरीला गुलालाचीं ताटें नि रंगाचीं घंगाळीं होतीं. कांही पोरंसोरं रंग खेळत होतीं आणि मोठीं माणसें त्यांचा खेळ कौतुकाने पाहत होतीं. एकूण थाट मजेचा होता.

नाचरंगाचा कार्यक्रम संपला. आता मिठाई वांटण्याचा आणि विडे देण्याचा कार्यक्रम. पण इतक्यांत महिरपी कोनाड्याखाली बसलेल्या जाधवरावांचें लक्ष कोपऱ्यांत बसलेल्या एका चलाख मुलाकडे गेलें. बापाच्या मांडीवर कोपर रेलून व हाताचा अंगठा हनुवटीशीं लावून हा पाणीदार चौकस मुलगा आजूबाजूला भिरभीर पाहत होता. त्याचा चेहरा अतिशय बोलका होता. जाधवरावांचें त्याच्याकडे लक्ष गेलें आणि त्यांनी त्याला हाकच मारली. जणु सिंहाने सिंहाच्या छाव्यासच पुकारलें. ‘ ए पोरा, जरा इकडे ये. ’ दरबारची नजर पोराकडे वळली. पोराने बापाच्या व चुलत्याच्या तोंडाकडे प्रथम पाहिलें. त्यांनी आनंदाने ‘ जा - जा ’ म्हणतांच पोरगं ताटकन् उठलं नि मोठ्या ऐटींत जाधवरावांपाशीं गेलं. जाधवरावाने मोठ्या प्रेमाने त्याला विचारलें ‘ नांव काय तुझं ? ’ पोराने ताटकन् उत्तर दिलें, ‘ शहाजी भोसला. ’ मग जाधवरावाने त्याला अगत्याने मांडीवर बसविलें. डाव्या मांडीवर त्यांची लाडकी लेक जिजा नटूनथटून बसली होती. पोरगा जाधवरावांना अतिशय आवडला होता. आनंदाच्या भरांत जिजाला त्यांनी सहज विचारलें, ‘ बेटा जिजू, हा नवरा छान आहे ना ? जोडा कसा शोभून दिसतो. ’ जाधवरावांच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच ऐकणाऱ्या इतर मंडळींनीहि माना डोलावल्या व ‘ छान, छान, अगदी युक्त, तोडीस तोड ’ असे पसंतिदर्शक उद्गार काढले. एवढ्यांत जिजाने



ताटांतला बचकभर गुलाल उचलून त्या पोरावर फेकला. त्यानेहि गंमतीने परतफेड केली. मंडळींना मोठी मौज वाटली. जाधवरावांना हसूं लोटलें. पोराचा बाप नि चुलता लांब बसले होते तेहि उठून जवळ आले. जाधवरावांनी त्यांना जवळ बसण्यास सांगितलें. पण बसण्यापूर्वी पोराचा बाप आनंदून मोठ्याने ओरडून म्हणाला, ' मंडळी, ऐकलंत ना ? झाला प्रकार पाहिलांत ना ? जाधवराव आमचे व्याही झाले. जिजा आमची सून झाली. तुम्ही सर्व साक्षी आहांत ! '

मालोजी भोसल्याच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच मात्र जाधवराव जरा चपापले. स्तब्ध झाले. सहज थट्टेने बोललों काय आणि मालोजीने शब्दांत पकडलें काय ! मोठी पंचाईत होऊन बसली. पण तो प्रसंग जास्त बोलण्याचा किंवा भांडण्याचा नव्हता. मालोजीचे उद्गार ऐकून त्यांनी बळेंच हसल्यासारखें केलें. मग पानसुपारी वगैरे झाल्यावर

दरबार संपला. मंडळी उठून गेल्यावर जाधवराव थोडे सचिंत झाले. जावई तर त्यांना पसंत होता, पण व्याही ? ते मात्र पसंत नव्हते. कां ? तर ते आपल्यासारखे प्रतिष्ठित व श्रीमंत नव्हते. मालोजी म्हणजे साधा फौजबंद शिपाईगडी. आपणच त्यास अन्नास लावलें व वर चढवलें. तो आपला व्याही कसा शोभणार ? मग लोकांत चांगलीच शोभा होणार. त्यांतून हा व्याही घरांत पसंत कसा पडावा—

सूनबाईने व दासींनी झाला प्रकार म्हाळसाबाईच्या कानांवर घातला. ज्वालेवर तूप ओतल्यासारखें झालें. रात्रीं नवराबायकोंची चांगलीच जुंपली. एकुलती एक लाडकी कन्या या वेळीं झोपीं गेली होती. तिच्या भवितव्याचा तावातावाने पण प्रेमाने खल चालला होता. दरबारांतला प्रसंग आठवून अजाण जिजा झोपेंत हसत होती तर तिचे आईबाप प्रतिष्ठेच्या संकुचित कल्पना उराशीं बाळगून भोसल्यांचें कुळ उद्धरीत होती. मुलगी भोसल्यांच्या घरीं द्यायला जाधवराव थोडे तरी अनुकूल होते. पण म्हाळसाबाई ! त्यांची समजूत पटेना. त्यांनी खूप आदळ-आपट केली, ‘ माझी जिजी मी या हलक्या कुळांत देणार नाहीं ! ’ हें एकच पालुपद त्या गात बसल्या. शेवटीं जाधवराव समजावणीच्या स्वरांत म्हणाले, ‘ सगळा थट्टेचा प्रकार. देवाच्या मनांत जसं असेल तसं होईल. उगाच काथ्याकूट कशाला ? ’

० ० ०



## ५ : कन्या सासुऱ्याशीं जाये—

जिजाऊच्या माहेरीं रंगपंचमीचा बेरंग झाल्याचा जो प्रसंग मागील प्रकरणांत रंगवला तो बखरींतला आहे. बखरकारांनी हा प्रसंग पुढे आणखी कसा रंगवला तें पाहूं :

रंगपंचमीच्या दुसऱ्या दिवशीं रिवाजाप्रमाणे जाधवरावांच्या घरीं जेवणावळ होती. मालोजी व त्याचा भाऊ विठोजी यांना अर्थातच बोलावणें होतें. तथापि, हे दोघे बंधू त्या दिवशीं जेवायला गेले नाहीत. 'आता येऊं ते एकदम व्याही-भोजनालाच' असा त्यांनी निरोप पाठवला. मग मात्र जाधवराव व म्हाळसाबाई हट्टाला पेटले. इकडे भोसलेबंधूंनीहि जाधवरावांचा नकार मनाला लावून घेतला. स्वतःचा कनिष्ठ दर्जा स्मरून दोघे मोठे कष्टी झाले. जाधवरावाने त्यांना कमी लेखलें होतें. त्यांचा एक प्रकारें अपमान केला होता. जाधवरावांच्या मानाने भोसले कमी दर्जाचे असले तरी शाण्णवकुळी अस्सल मराठेच होते. कष्टाळू होते, धार्मिक होते, पराक्रमी होते. अपमानाची त्यांना चीड आली. घरीं आपणहून चालून आलेल्या लक्ष्मीला ते अंतरले होते. झाल्या प्रकाराची मालोजीला तर मोठी खंत वाटूं लागली.

पौर्णिमेची रात्र होती. झोपण्यापूर्वी मालोजीने देवीची आराधना

केली व तिच्यापुढे गाऱ्हाणें गाइलें. मालोजी घोंगडी पांघरून झोपीं गेला. पहाटेस त्याला एक स्वप्न पडलें. साक्षात् देवी त्याच्या स्वप्नांत आली. ' तुझें कुळीं श्रीसांब अंशें करून अवतार घेऊन धर्मस्थापना करणार ' असें म्हणून तिने शेतांतलें एक वारूळ दाखविलें व ' तें खणून त्याखालचें द्रव्य घे ' असें सांगितलें. दुसऱ्या दिवशीं मालोजी आपल्या भावासह शेतांत गेला. वारूळ खणूं लागतांच नागोबा फणा काढून वर आला. दोघा बंधूंनी न घाबरतां त्याला दंडवत घातला. नागोबा प्रसन्न होऊन चूपचाप निघून गेला. मग त्या वारुळावर भराभर कुदळी पडल्या. वारूळ पाहतां पाहतां जमीनदोस्त झालें व त्या ठिकाणीं कमरेएवढा खड्डा झाला. पुढच्याच घावाला खणकन् आवाज झाला. आजूबाजूची माती साफ केली गेली. मग द्रव्यानें भरलेले सात हंडे तिथे गवसले. ते बघून दोघे बंधू क्षणभर आनंदाने नाचले. पण लगेच चिंताक्रान्तहि झाले. एवढें द्रव्य ठेवायचें कुठे या चिंतेने ते अस्वस्थ झाले. अखेर देवीनेच त्यांना बुद्धि दिली व त्यांनी तें द्रव्य श्रीगोंद्याचा सावकार शेषावा नाईक पुंडे याजकडे ठेवलें.

ईशकृपेने मालोजी आता श्रीमंत झाला होता. ' सगळीं सोंगें अणतां येतात, पण पैशाचें सोंग आणतां येत नाही ' ही त्याची स्थिति संपली होती. द्रव्याच्या अभावीं त्याचें कर्तृत्व जें खुरटलें होतें त्याला आता बहर फुटणार होता. अचानक द्रव्यलाभ झाल्यावर मालोजीने वेरूळच्या घृष्णेश्वरमंदिराचा जिर्णोद्धार केला, आणि श्रीशिखरशिंगणापूरच्या निर्जल डोंगरावर एक विस्तीर्ण तळें बांधलें. त्यानंतर बराच पैसा खर्च करून स्वतःची ' पागा हजारपांचशेची केली.' तथापि, एवढ्याने त्याचें समाधान झालें नव्हतें. जाधवरावाने केलेला अपमान तो विसरला नव्हता. जिजाऊ सून त्याला पसंत होती. पण हें लग्न व्हावें कसें ? मग त्याने एक युक्ति योजली. फलटणच्या सरदार निंबाळकरांशीं त्याचा

अनुक्रम .................... दि: ..................
क्रमांक .................... नों. दि:

घरोबा होता. त्यांना मध्यस्त करून शेवटीं मालोजींनें निजामशहापर्यंत गाऱ्हाणें मांडलें. सुदैवाने बादशहाला गुणीजनांची पारख होती. जाधवरावाने काढलेलें ‘ यांचें भाग्य, वैभव आमचे बराबरीचें नाही ’ हे आढ्यतेचे उद्गार शहाला आवडले नाहीत. त्याने लगेच हुकूम काढून मालोजीस पंचहजारी मनसब व ‘ राजे ’ हा किताब बहाल केला.

मालोजीचें भाग्य आपल्या बरोबरीचें झालेलें पाहून जाधवराव व म्हाळसाबाई खजिल झाले. मग आढेवेढे न घेतां त्यांनी मालोजीच्या पुत्रास जिजाऊ देऊं केली. लग्न दौलताबादेस मोठ्या थाटामाटाने झालें. जाधवरावाने बहुत द्रव्य खर्चिलें. खासा पादशहा लग्नास हजर होता. शहाजी व जिजाऊ यांच्या लग्नाची बखरींतील हकिकत ही अशी आहे. आता अन्यत्र यापेक्षा अधिक विश्वसनीय अशी या लग्नाची व एकंदर भोसले कुलाची असलेली हकिकत आपण समजावून घेऊं.

बखरकारांनी रंगवला इतका सामान्य शिपाईगडी मालोजी नव्हता. तर जिजाऊच्या लग्नाच्या वेळीं तो चांगला श्रीमान, प्रतिष्ठित असा फौजबंद सरदार होता. लग्नप्रसंगीं शहाजीचें वय मिसरूड फुटण्याचें होतें. त्याची कान्ति सुवर्णासारखी सतेज होती. डोळे पाणीदार व विशाल होते. नाक पोपटाप्रमाणे बाकदार होतें. शस्त्रविद्या त्याला वश होती. अवखळ घोड्यावर स्वार होण्यास तो कचरत नसे. शहाजी उत्तम लक्षणांनी युक्त होता. तेव्हा अनुकूल ग्रह पाहून जाधवरावाने आपली सुकन्या जिजा मोठ्या आनंदाने शहाजीस दिली. भरपूर हुंडा देऊन दिली. शिवाजीचा दरबारी कवि कवीन्द्र परमानन्द याने हा प्रसंग नमूद केला आहे.

**कुलकन्या कुलेधन्या कन्या कुवलयेक्षणा**
**दत्ता सदक्षिणा तस्मै जिजूर्विजयलक्षणा** –( अध्याय २–४४ )

तसेंच पुढे तो म्हणतो की, ‘ ज्याप्रमाणे शुभ्र व खोल गंगा सागरास

मिळाली असतां शोभते त्याप्रमाणे तेज:पुंज शरीर धारण करणारी ती गुणवती जिजा, गुणगंभीर अशा थोर मनाच्या पतीशीं संयोग पावून शोभूं लागली.' लग्नप्रसंगीं शहाजी 'मिसरूड फुटलेला' होता असें कवीने म्हटलें आहे. पण त्यांत थोडी अतिशयोक्ति वाटते. शहाजी व जिजाऊ यांचें लग्न सुमारें १६०५ सालीं झालें. या वेळीं उभयतांचीं वयें साधारणपणें १०–११ व ७–८ अशीं असावींत.

जाधवराव आपल्या लाडक्या मुलीसाठी सासर शोधणार तें आपल्या दर्जाला साजेसेंच शोधणार हें साहजिकच नव्हे काय? मालोजीची योग्यता तो जाणून होता व भोसले कुलाचीहि त्याने नीट चौकशी केली असली पाहिजे. भोसले हे शाण्णवकुळी मराठे. त्यांचा मूळ वंश शिसोदिया किंवा शिसोदे. उदेपूरच्या शिसोदिया वंशाशीं या कुलाचा संबंध पोचतो. भोसल्यांच्या क्षत्रिय परंपरेची खातरजमा शिवाजीराजांनी राज्याभिषेकाच्या वेळीं गागाभट्टादि पंडितांकडून करून घेतली होती. वेरूळ, श्रीगोंदें, व पुणें हीं भोसल्यांचीं महाराष्ट्रांतील आरंभीचीं वसतिस्थानें. शेती हा यांच्या वाडवडिलांचा व्यवसाय होता. निजामशाहींत नांगर टाकून यांनी हातीं तलवार घेतली. जिजाऊचा आजेसासरा, म्हणजे मालोजीचा बाप बाबाजी हा निजामशाहींत पाटस परगण्यांत पाटील होता. दौंडाजवळ भीमाकाठच्या पांडेपेडगावची जहागिरी पुढे त्याने संपादन केली.


बाबाजीस मुलगे दोन. थोरला मालोजी व धाकटा विठोजी. मालोजीच्या पत्नीचें माहेरचें नांव दीपाबाई व सासरचें नांव उमाबाई. फलटणच्या जगपाळ निंबाळकरांची ती बहीण. निंबाळकर म्हणजे आदिलशाहींतले मातब्बर सरदार. अशा घराण्यांतील मुलगी भोसले घराण्यांत पडते यावरून भोसल्यांचा दर्जा कळून येतो. भोसल्यांचा उदय मालोजीपासून झाला आहे. निजामशाहीचा अस्त आणि भोसल्यांचा उदय या घटना साधारण-

पणें एकाच काळीं चालू होत्या. बाबाजीच्या पश्चात् मालोजीला जहागिरी मिळाली. अपल्या पराक्रमाने त्याने निजमशाहीचा चांगला विश्वास संपादन केला होता. श्रीगोंदा, वैजापूर, दौलताबाद इत्यादि भागांतील कांही गावांची वतनवाडी व जहागिरी त्याने स्वकर्तृत्वाने मिळवली होती. मालोजी जसा राजकारणी, पराक्रमी, तसाच धार्मिक व परोपकारी वृत्तीचा होता. घराण्यांत शिवभक्ति चालत आलेली होती. सातारा जिल्ह्यांतील शिखर शिंगणापूरचा शंभुमहादेव हें या घराण्याचें कुलदैवत. या ठिकाणीं चैत्री पौर्णिमेला मोठी यात्रा भरते. पण प्रदेश डोंगराळ व निर्जल. जवळपास उदक नसल्याने यात्रिकरूंना ‘ पाणियाचें बहुत संकट ’ पडे व तें लांबून आणावें लागे. द्रव्य हातीं येतांच मालोजीने येथल्या डोंगराला भिंत घालून ‘ एक थोर तळें बांधिलें. ’ तसेंच गावच्या, म्हणजे वेरूळच्या घृष्णेश्वर-मंदिराचा जीर्णोद्धार केला. घृष्णेश्वराच्या अभिषेकासाठी उमाबाईने तर एका भिक्षुकास नेमणूक करून दिली. या प्रेमळ व धार्मिक दांपत्याच्या आयुष्यांत उणीव काय ती एकच होती. ती म्हणजे संततीची, पुत्र-संततीची.

उमाबाईने पुष्कळ नवससायास केले, पण तिची इच्छा पुरी होईना. शेवटीं कुणी तरी सुचवल्यावरून अहमदनगरच्या शहाशरीफास नवस केला. हा एक फकीर होता व लोक त्याला भजत. कर्मधर्मसंयोगाने कांही काळ लोटल्यावर उमाबाईस दिवस राहिले. दोन वर्षांच्या अंतराने दोन मुलगे झाले. शहाशरीफांच्या आशीर्वादाने मुलगे झाले म्हणून त्यांचीं नांवें शहाजी व शरीफजी अशीं ठेवलीं. मुलें आईच्या व चुलत्याच्या देखरेखीखाली वाढत होतीं आणि बाप मालोजी स्वाऱ्याशिकारींत गुंतलेला असे. शहाजी वयांत येण्याच्या सुमारास निजामशहाने मालोजीस इंदापूरच्या बाजूस बंदोबस्तास पाठविलें होतें. तेथे आदिलशाहीशीं झालेल्या चकमकींत तो ठार झाला.

मालोजीच्या पश्चात् विठोजीने पुतण्यांवर मायेचें छत्र धरलें व भावजयीला धीर दिला. विठोजीला स्वतःचे आठ मुलगे होते. दौलताबादेस खंडागळ्याच्या हत्तीच्या निमित्ताने जाधव-भोसले मंडळींत जी अचानक चकमक उडाली तींत विठोजीच्या संभाजी व दत्ताजी या मुलांचा मोठा भाग होता. संभाजीच्या हातून जाधवरावांचा मुलगा मारला जातांच, जाधवरावाने त्वेषाने संभाजीवर हल्ला केला व त्याला ठार मारलें. या प्रसंगीं जिजाऊचा पति शहाजी चुलत-भावांच्या मदतीला गेला होता. त्यालाहि सासऱ्याकडून प्रसाद मिळाला. निजामशहाने जातीने हें प्रकरण मिटवलें नसतें तर या वेळीं आणखीहि कांहीं मुडदे पडले असते. जाधवराव या प्रकरणानंतर निजामशहाला सोडून मोंगलांकडे गेला. भोसल्यांची बाजू शहाने घ्यावी या गोष्टीचा त्याला राग आलेला होता. जाधव-भोसले मंडळींचें प्रथम वितुष्ट आलें तें असे. या वेळीं विचाऱ्या जिजाऊला किती दुःख झालें असेल याची कल्पना केलेली बरी. चुलत दिराकडून भाऊ मारला गेला, त्याचा सूड म्हणून वडिलांनी दिरास ठार मारलें, प्रत्यक्ष पतीलाहि वडिलांच्या तलवारीचा वार बसला आणि या साऱ्या भीषण प्रकाराचें पर्यवसान म्हणजे वडिलांनी रागावून मोंगलांची चाकरी पत्करली. जिजाऊला परम दुःख झालें. माहेराला ती जवळजवळ मुकलीच.

० ० ०



## ६ : ऊन-पावसाचा खेळ

जिजाबाई सासरीं गेली खरी; पण संसारांत तिला फारशी स्वस्थता लाभली नाही. तिचें सांसारिक जीवन धावपळींत, संकटांत व कष्टांत गेलें. माहेरास मुकल्यामुळे व तरुणपणांतील जबाबदारीच्या जाणिवेमुळे ती विचारी व समजूतदार होत गेली. सासर-माहेरांत कांही कारणाने वैमनस्य आलें तरी तिला दोन्ही कुळांचा अभिमान वाटत असे. इतकेंच नव्हे तर आपल्या या दोन्ही कुळांत सलोखा कसा नांदेल, वाढेल याची तिला चिंता वाटे. तो वाढावा या दृष्टीने ती स्वतः आपलें वर्तन गोड व संयमशील ठेवीत असे. माणसांचा तिला हव्यास होता. ती कधी कोणाला दुखवत नसे.

घरीं सासू—उमाबाई होती. जाऊ दुर्गा होती. दीर शरीफजी होते. चुलत दिरांचा व भावजयांचाहि घरीं राबता होता. मामंजींच्या पश्चात् पति शहाजीराजांना निजामशहाकडून जहागिरी मिळाली होती. तथापि राजांची स्वारी राजकारणांत व लढायांत दंग असे. जिजाईच्या वांट्याला पतिसेवा थोडी येई. पण जेव्हा येई तेव्हा मात्र ती मनोभावें होई. जिजाई सदा सेवातत्पर असे. तिची पतिनिष्ठा प्रखर होती. जाज्वल्य होती. पतीच्या सुखांत ती स्वतःचें सुख मानी. पति दुःखी झाल्यास तिचे डोळे भरून येत. आपल्या शूर व महत्त्वाकांक्षी पतीबद्दल जिजाई अभिमानाने बोलत असे. तो स्वारीशिकारीवर गेला की, तिला अहर्निश

चिंता वाटे आणि परत आला की आनंदाची महापर्वणी वाटे. अशा वेळीं ती साहजिकच नटूनथटून देवाला जाई.

कवीन्द्र परमानंदाने यौवनदशेंतील जिजाईचें पुढीलप्रमाणे वर्णन केलें आहे—'त्या उच्चकुलीन लावण्यवतीचे हात कमळासारखे, केशकलाप लांबसडक, काळा व तुळतुळीत, भालप्रदेश अर्धचंद्राकृति, भुवया धनुष्याकृति, नेत्र कमळासारखे, नासिका सरळ, कान सुवर्णाच्या शिंपल्याप्रमाणे, दांत कुंदकळ्यांसमान, ओठ आरक्त व मुख प्रफुल्लित होतें. तिचीं नखें लालसर असून आवाज कोकिळेसारखा मधुर होता. तिच्या पावलांवर राजलक्ष्मीचीं चिन्हें होतीं. जरतारी वस्त्रांतील व निरनिराळ्या अलंकारांनी नटलेली जिजाई अतिशय प्रेमळ, प्रसन्नवदन व विनयशील होती.' कवीचें हें वर्णन अर्थातच अतिशयोक्तीचें आहे. तथापि, कवीने जिजाईला प्रत्यक्ष पाहिलेली असणार हेंहि विसरतां येत नाही. त्याने केलेल्या रूपवर्णनावरून एवढें खास म्हणतां येईल की, जिजाई तरुणपणीं सुंदर, सुदृढ व सतेज होती. गृहिणी या नात्याने तिचें वर्तन आदर्श होतें हें सांगतांना कवीन्द्र म्हणतो—

**श्वश्रूशुश्रूषणपरां पतिप्रियतरोत्तराम ।**
**शीलसंरक्षणे सज्जां लज्जां मूर्तिमतीमिव ॥** ( अध्याय २-६३ )

म्हणजे जिजाई 'सासूच्या सेवेंत तत्पर, पतीला प्रिय बोलणारी, शीलसंरक्षणांत दक्ष व वियनशील अशी मूर्तीच होती.' तिचें वर्तन दोन्ही कुलांना सुखवीत होतें. सासू-सासऱ्यांचें धार्मिक व परोपकारी वळण तिनें हुबेहूब उचललें होतें. पति अहर्निश रण व राजकारणांत गुंतला असल्यामुळे त्याच्यासाठी देवाला शरण जाण्याविना ती अबला आणखी काय करणार? काळजीच्या दिवसांत मनोधैर्य यावें म्हणून ती अधूनमधून कथापुराणांस जाई. रामायण-महाभारतादि ग्रंथांतील प्रसंग तिला धीर देत, अपार सोशिकपणा शिकवत.

शहाजी व जिजाबाई यांना एकूण सहा पुत्र झाले. पैकी जगले दोघे. थोरला संभाजी व धाकटा लाडका शिवाजी. हीं सारीं अपत्यें ज्या बिकट व धकाधकीच्या परिस्थितींत जन्मलीं ती परिस्थिति समल्या-शिवाय जिजामातेचें कष्टमय जीवन कळणार नाही. पति शहाजी राजे निजामशाहीचे जहागिरदार व फौजबंद सरदार असतात. त्यांच्या कर्तबगारीस नुकतीच कोठे सुरुवात झालेली असते. निजामशहाचा शूर व सुज्ञ वजीर मलिकंबर याचा राजांवर मोठा विश्वास. शहाजी राजे म्हणजे निजामशाहीचा आधार अशी सर्वांची समजूत झालेली. या निजामशाहीवर दिल्लीकर मोंगलांची नेहमीच वक्रदृष्टि. कधी स्वारी होईल याचा नेम नसे. तशांत जिजाईचे वडील निजामशहावर रागवून मोंगलांना मिळलेले. म्हणजे एकीकडे पति तर दुसरीकडे वडील असाच सामना. या अशान्त प्रसंगीं जिजाईच्या जिवाची कोण ओढाताण झाली असेल ! याच सुमारास तिला दिवस गेले होते. मुक्काम दौलताबादेस होता. मोंगली स्वारीची चाहूल लागल्याने पतिराज अहमदनगराकडे गेले होते. इकडे जिजाई पूर्ण मास भरून प्रसूत झाली. पुत्ररत्न झालें. नांव शंभू ऊर्फ संभाजी ठेवण्यांत आलें. पतीच्या विरहांत जिजाईस एक विरंगुळा मिळाला.

जिजाईचें जीवन म्हणजे खरोखरच ऊन-पावसाचा खेळ. अगदी शेवटपर्यंत. घटकेंत सुख, तर घटकेंत दुःख. संभाजी जरा कुठे रांगतो न रांगतो तोंच युद्धाचे ढग जमूं लागले. मोंगलांनी व विजापूरच्या आदिलशाहीने हातमिळवणी करून निजामशाही गिळंकृत करण्याचें ठरविलें. उभयतांच्या फौजा अहमदनगरावर चालून आल्या. नगरापासून दहा मैलांवर भातवडी येथे युद्धास तोंड लागलें. ( इ. स. १६२४ ) मोंगलांकडे जिजाईचे वडील जाधवराव, तर निजामशाही तर्फे मलिकंब-राच्या नेतृत्वाखाली पति शहाजीराजे, असा संग्राम येऊन ठेपला. पण

युद्धांत नातीं विसरायचीं असतात. युद्ध घनघोर झालें. सामना अटी-तटीचा, जिद्दीचा झाला. शहाजीने प्रथमच मोठा पराक्रम गाजवला. मलिकंबराने पाठ थोपटली. मोंगल हरले. विजापुरी सेनापति मुल्ला महमद मारला गेला. इखलासखान, लष्करखान कैद झाले. जाधवरावावर तर पळून जाण्याचा प्रसंग आला. मोंगल बादशहा जहांगीर खजिल झाला. आदिलशहाने हाय खाल्ली. शहाजीच्या पराक्रमाने साऱ्यांचे डोळे दिपून गेले. विजयोत्सवांत खेदजनक घटना एकच घडली. जिवाला जीव देणारा शहाजीराजांचा पाठचा भाऊ शरीफजी या युद्धांत मारला गेला. दुर्गाबाईचें सौभाग्य निळखलें.

लढाईतील विजयाने शहाजीराजांचा भाग्यरवि उदय पावून जिजाईचें भाग्य उजाडलें. पण त्यांचा मार्ग निरभ्र, सरळ नव्हता. मार्गांत अधूनमधून काळे ढग येत व त्यामुळे मार्गाची दिशा बदलावी लागे. राजे पराक्रमी, धाडशी व महत्त्वाकांक्षी होते. स्वकर्तृत्वावर त्यांचा जबर विश्वास होता. त्यामुळे मानहानि झालेली त्यांना सहन होत नसे. जिथे कर्तृत्वाला वाव असे तिथे राजांचें मन रमत असे. जिथे या कर्तृत्वाला अटकाव होई तिथून तें माघार घेई. त्यांची वृत्ति एकप्रकारें युयुत्सू जिवंत अशी होती.

भातवडीच्या संग्रामानंतर निजामशाहींत वस्तुतः त्यांचा दर्जा चांगला वाढावयाचा. पण झालें उलट. मलिकंबराला वाटलें, शहाजी डोईजड होणार. त्यापेक्षा त्याच्या चुलतभावांना हाताशीं धरूं. मग उभयतांचे अंतस्थ सूत जमलें व शहाजीची उपेक्षा होऊं लागली. शहाजीस हें कसें सहन व्हावें? तो तडक आपल्या जहागिरीकडे निघून गेला. आदिलशहास ही गोष्ट समजल्यावर त्याने राजांना पाचारण केलें, इतकेंच नव्हे तर ' सरलष्कर ' या हुद्दयावर चढवलें. राजांना ही नामी संधि मिळाली. त्यांनी प्रथम निजामशाहींतील पुणें–पाटसाकडील स्वतःच्या जहागिरीचा मुलूख आदिलशाहीकडे घेतला. मग मलिकंबरास एका लढाईंत धूळ


चारली. मुधोजी फलटणकरास वठणीवर आणलें. आदिलशहाची मर्जी संपादन केली. पण दुर्दैवाने इ. स. १६२७ मध्ये आदिलशहा मरण पावला. तिकडे यापूर्वी (इ. स. १६२६) मलिकंबरहि पैगंबरवासी झाला. आणि या साऱ्या घटनांचा फायदा घेऊन दिल्लीच्या शहाजहान बादशहाची निजामशाहीवर पुन्हा संक्रान्त वळली. शहाजी राजांना आपल्या जुन्या धन्याचा—निजामशाहीचा साहजिकच कळवळा होता. त्यांतून आदिलशहाच्या मागे राजांना तिकडे फारसें कोणी विचारीना. अखेर राजे विजापुराहून निघाले आणि इ. स. १६२८ च्या अखेर पुन्हा निजामशाहींत आले. याच वेळीं कांही तरी बिनसून राजांचे सासरे जाधवरावहि मोंगलांना सोडून दौलताबादेस आले. सासरे-जांवयांची दिलजमाई होणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. जिजाईला या घटनेमुळे किती आनंद झाला !

पण तो आनंद क्षणैक ठरला. निजामशहा या वेळीं दुष्टचक्राने वेढला होता. त्याची वृत्ति संशयी बनली होती. सल्लागारांनी त्यांचे कान फुंकले व जाधवरावांविषयी त्याचें मन कलुषित केलें. ' जाधवराव हा जुना व अनुभवी सरदार, गुप्त गोष्टी शत्रूला सांगून आपल्याला गोत्यांत आणील, सबब त्याचा निकाल लावावा ' असा सल्ला मिळतांच निजामशहाने भयंकर कारस्थान रचलें. २४ जुलै १६२९, दिवस बहुधा पौर्णिमेचा, किल्ले दौलताबादेस शाही दरबार भरला. जाधवराव मुजरे करण्यास निघाले. बरोबर दोघे पुत्र अचलोजी, रघूजी व नातू यशवन्तराव यांना घेतलें. भाऊ जगदेवराव व धाकटा मुलगा घरीं होते. मुजरे होऊन थोडेंसें बोलणें झाल्यावर तख्तावरून शहा एकदम उठून गेला. हा प्रकार चमत्कारिक वाटून जाधवरावहि तावातावाने निघाले. पण चार पावलें टाकतात न टाकतात तोंच त्यांच्यावर अचानक हल्ला झाला. फर्दखान, सफजरखान, मोतीखान इत्यादि जण त्यांच्यावर तुटून पडले. जाधवराव व मुलें प्रतिकारासाठी तलवारी उपसतात तों त्या

खसकन् हिसकावून घेण्यांत आल्या. मग या शूर मराठ्यांनी खंजिर उपसले, व झुंजतां येईल तेवढी झुंज दिली. पण अखेर सामर्थ्य तोकडें पडून चौघा जाधवांचीं भर दरबारांत प्रेतें पडलीं.

हा भीषण प्रकार कळतांच जाधव व भोसले कुटुंबांत एकच आकान्त उडाला. पाचावर धारण बसली. जगदेवराव, बहादरजी, म्हाळसाबाई व इतर बायका भीतीने सिंदखेडास पळाल्या. जाधवरावाच्या सुना सती गेल्या. त्यांच्या छत्र्या सिंदखेडास बांधण्यांत आल्या. जगदेवराव व बहादरजी यांनी मोगलांचा आश्रय घेतला. जिजाबाई या साऱ्या भीषण धामधुमींत कुठे होती कुणास ठाऊक ! बहुधा शहाजी-राजांजवळ परांड्यास असावी. राजांना हा प्रकार समजतांच त्यांचें रक्त विलक्षण सळसळलें. सासऱ्याचा खून !—लाडक्या जिजाऊच्या वडिलांचा खून ! सासऱ्यांशीं भांडण होतें. पण वैर नव्हतें. तें वैरहि ओसरत चाललें होतें. आणि अशा वेळी—अशा मंगल वेळीं — जाधवरावांचा — सासऱ्याचा — खून व्हावा आणि तोहि कपटाने ! अभिमन्यूस कौरवांनी घेरून जसें मारलें तसें ! राजांच्या मुठी वळल्या. स्नायू तणाणले. परांड्याहून त्वेषाने निघाले ते संगमनेरमार्गे पुण्याकडे त्यांनी दौड ठोकली. अशी तशी नव्हे, तर मुलूख लुटीत नि उध्वस्त करीत. पत्नी जिजाऊ व पुत्र संभाजी बरोबर होता. त्यांना वाटेंत जुन्नरास शिवनेरी किल्ल्यावर ठेवलें. कशासाठी ? त्यांच्या भल्यासाठी व त्याहून म्हणजे महाराष्ट्राच्या भल्यासाठी. जिजाऊस सहाव्यांदा दिवस राहिले होते.

० ० ०



## ७ : शिवजन्म

वडिलांच्या व भावांच्या भीषण खुनानंतर जिजाऊ अतिशय उद्विग्न व दु:खीकष्टी झाली होती. याच सुमारास तिला दिवस गेले होते. पति शहाजी राजांनी जी नवी बंडखोरी उभारली होती तीहि काळजी उत्पन्न करणारी होती. आदिलशाही मुलखांत राजांनी धूमधाम माजवल्या-मुळे शहाची त्यांच्यावर वक्रदृष्टि वळणें साहजिकच होतें. आगामी संकट हेरून राजे मोंगलांना मिळण्याच्या विचारांत होते. निजाम-शहाची चाकरी त्यांनी अद्याप झुगारलेली नव्हती. त्यांचा उत्साह उदंड होता व महत्त्वाकांक्षा इतकी जबर की, कुठल्याहि नव्या साहसाला प्रवृत्त करीत होती. महाराष्ट्राच्या कांही भागांत याच वेळीं भीषण दुष्काळाची छाया पडली होती. सारांश, जिजाऊला या वेळीं दिवस कठीण जात होते. तथापि, ती डगमगली नाही की, खचली नाही. शहाजी राजांवर तिची कमालीची निष्ठा होती.

शिवनेरीला या वेळीं विजयराज नांवाचा किल्लेदार होता. त्याला जयंति नांवाची मुलगी होती. जिजाऊचा मोठा मुलगा संभाजी सात-आठ वर्षांचा झाला होता. त्याचें लग्न याच धामधुमींत जयंतीशीं उरकण्यांत आलें. या लग्नसंबंधामुळे शहाजी राजांची एक मोठी काळजी मिटली. राजे खानदेशांत दर्याखानावरील स्वारीवर निर्धास्तपणें निघून गेले. विजयराजांनी जिजाऊची व्यवस्था उत्तम ठेवली. तथापि,

तिला अन्न जाईना. पतीच्या जिवाची काळजी वाटे. मुसलमानी स्वाऱ्यांचें भय वाटे आणि त्याहिपेक्षा त्यांच्या जुलमी सत्तेचा राग येई. शांततेने व स्वाभिमानाने जीवन कंठणें किती कठीण आहे याचा ती नित्य अनुभव घेत होती. सर्वसामान्य लोकजीवनाला तरी कुठे स्थिरता होती ? उत्तम, सुंदर स्त्रिया पळवल्या जात होत्या, विकल्या जात होत्या, भ्रष्टविल्या जात होत्या. कित्येक हाल होऊन मरत होत्या. पुरुष माणसें सुरक्षित होतीं म्हणावें तर तसेंहि नव्हतें. धरपकड, कैद व राजदंड हे प्रकार सर्रास चालू होते. ' दुःख दारिद्र्य आणि ऋण । विदेशपळणी नागवण । ' अशी महाराष्ट्राची दशा झाली होती. वीरकन्या नि वीरपत्नी जिजा या म्लेंच्छसत्तेला खरोखर कंटाळली होती. पुरेपूर विटली होती. शिवनेरीवर शिवाई देवी होती. जिजाऊ नेमाने तिची प्रार्थना करी. बखरकार लिहितात कीं, पराक्रमी पुत्र होण्यासाठी तिने शिवाईस नवस केला.

जिजाऊचे या वेळचे डोहाळे मात्र विलक्षण होते. चाल मंदावली होती. दागिन्यांचें ओझें सोसवत नव्हतें. चेहऱ्यावर पांढरेपणा आला होता. वासना चमत्कारिक होऊं लागल्या. तिला हत्तीवरून मिरवावेंसें वाटे. वाघावर स्वार व्हावेंसें वाटे. गडकोटांवर हिंडावेंसें वाटे. दुंदुभीध्वनि ऐकावा व शस्त्रसज्ज होऊन युद्ध करावें अशी प्रबळ इच्छा होई. शुभ्र छत्राखालीं सुवर्णसिंहासनावर बसावें, दासदासींनी चवऱ्या ढाळाव्यात, या आकांक्षेने तिचें मन पेट घेई. विजयश्री मिळवावी, मोठीं दानें करावींत व धर्मसंस्थापना करावी अशा अलौकिक वासनांनी मन उचंबळून येई. पण तिच्या या वासना कोण पुरविणार ? ती गोष्ट भविष्यकाळाच्या हातीं होती. शिवनेरीवरील स्त्रियांनी मात्र या वासनांचें भरपूर कौतुक केलें. डोहाळजेवणाच्या थाटाच्या प्रसंगीं या स्त्रियांनी जिजाऊला शृंगारलेल्या झोपाळ्यावर बसविलें व मग मंद झोका देऊन गाणें म्हटलें —



**अजि हौस जिजीची नुरवा। हठ गर्भवतीचा पुरवा ॥ ध्रृ० ॥**
**सित छत्र तिच्या शिरिं धरवा। सित चामर सुंदर फिरवा ॥**
**गज–शिबिका यांनी मिरवा। नव भव्य महोत्सव करवा ॥**
**पाचूहार चुडा हिरवा। हिरवा शालु वेणिंत भरवा ॥**
**शृंगार थाटुनि वरवा। प्रियसखिची ओटी भरवा ॥***

या डोहाळजेवणानंतर हळूहळू जिजाऊची कान्ति चंद्रकलेप्रमाणे सतेज दिसूं लागली. पहाटेपूर्वीचा काळोख संपत आला होता. नेहमीची शिवाईदेवी प्रसन्न भासूं लागली. नवमास भरत आले. वसंत ऋतूची चाहूल लागली. मूर्तिमंत पौरुष आकार घेत होतें. जन्मास येऊं घातलें होतें. शिवनेरीवर कारभाऱ्यांनी अनुभवी व कुशल वैद्यांना पाचारण केलें. आसपासच्या पोक्त सुईणी किल्ल्यावर मुक्कामाला आल्या. बाजूची बाळंतिणीची खोली गोमयाने सारविली गेली. भिंती रंगविण्यांत आल्या. ॐ कार, स्वस्तिक, मंगलदीपादि कुंकुमचित्रें रेखाटण्यांत आलीं.

* हें डोहाळ्याचें गाणें ' शिवसंभव ' नाटकांतलें आहे.

दाराबाहेरच्या भिंतीवर देवदेवतांनी खडा पहारा दिला. विजयराजांनी व शहाजी राजांच्या कारभाऱ्यांनी रामजन्माची आठवण व्हावी अशी सर्व सिद्धता केली.

आणि मग एक दिवस जिजाऊचे मनोरथ पूर्ण झाले. तिचें सकल दु:ख हरण झालें. शालिवाहन शके १५५१ शुक्लनाम संवत्सरीं उत्तरायणांत शिशिर ऋतूमध्ये, फाल्गुन वद्य तृतीयेस ( १९ फेब्रुवारी १६३० ) सूर्यास्तानंतर थोड्या वेळाने सिंह लग्नावर जिजाऊ प्रसूत होऊन पुत्ररत्न झालें. या वेळीं पांच ग्रह अनुकूल व उच्चीचे होते. शिवकालीन जेधे शकावलींत या सुवर्णघटिकेची व मंगल प्रसंगाची पुढीलप्रमाणे नोंद करून ठेवलेली आढळते— शके १५५१ शुक्ल संवत्सरे फाल्गुण वद्य त्रितीया शुक्रवार नक्षत्र हास्त घटी १८ पळे ३१ गड ५ पळे ७ ये दिवसी राजश्री सिवाजी राजे सिवनेरीस उपजले.’ शिवकालास अगदी नजीक असणाऱ्या सभासदबखरींत हा प्रसंग तपशील न देता जरा वेगळ्या पद्धतीने म्हणजे भक्तिभावाने नोंदविला आहे. ‘ शहाजी राजियांची प्रथम स्त्री जिजाई आऊ. तिचे पोटीं राजश्री शिवाजी राजे पुत्र होताच श्री शंभुमहादेव जागृति येऊन स्वप्न झालें की, आपणच अवतरलों आहों. पुढे बहुत ख्यात करणें आहे. बारा वर्षेंपर्यंत तुम्ही आपलेजवळ ठेवावें. पुढे न ठेवणें. जातील तिकडे जाऊ देणें. आटोप न करणें.’ चिटणिशी व शाण्णव कलमी बखरींत शिवजन्माचा प्रसंग फारच सुरसपणें व भाविकतेने कथन केला आहे. तथापि, शिवजन्माची महत्त्वाची तिथि मात्र चुकीची दिली आहे.

शाण्णव कलमी बखरींत शिवजन्माची व तत्पूर्वीची हकीकत अवास्तवपणें रंगविली आहे खरी तथापि, जुन्या गद्याचा एक सुरस व समर्थ नमुना म्हणून ती वाचनीय खास आहे, ‘ **शहाजी राजे** पांच

हजार फौजेसह वर्तमान **सासरे जाधवराऊ यांचा मोर्चा रात्री मारून** रातोरात जिजाऊ व पुत्र संभाजीराजे देखील विजापूरच्या रोखें चालिले. **जिजाऊ गरोदर साता मासाची.** सिवाजी राजे त्यांच्याने होती. दोन तीन कोस जाता मार्गी घोडीवर होती. जिजाऊ आडली. पलवेनासे जालें. शाहाजी राजे यांस संकट जाले. संभर स्वार जिजाऊ पासी ठेऊन संभाजीराजे वडील पुत्रास घेऊन पळाले. मार्गी जिजाऊस टाकून पलता शहाजी राजे जिजाऊस बोलिले जे, तुमचे पिते मागे आमच्या पाठिलागी करून येताती. त्यास शरम असिली तर सोडून देतील पलवितील. आम्हास तुमची गरज नाही. ऐसे बोलोन शाहाजी राजे पलोन गेले. त्याउपर लुखजी जाधवराऊ यांणी रात्री तेच क्षणीं तांब्रास सावध करून महताबा हत्तीवर घेऊन हरोल होऊन पाठीलाग केला **तो मार्गी जिजाऊ उभी राहिली.** सिपाई जाधवराऊ त्याचे यांणी वलखिली. जाधवराऊ बाप भेटले. समागमे लोकांनी फजीत जाधवराऊ त्यास केलें. जे जिजाऊ **तुमची कन्या व गरोदर** तांब्रास जाहीर जाले तर उत्तम नाही. दावेदार तुमचे निघोन गेले. ईस कन्येस वाटे वेगळे काहाडणे. जिजाऊ सांगाते पांचसे स्वार देऊन रातोरात किले शिवनेर निजाम-शाही– किला शहाजी राजे त्यांकडे होता तिथे जिजाऊस नेऊन घातली. सिवनेर गडावर श्री भवानी सिवाई तीस नवस जिजाऊने केला. जे जे आपणांस पुत्र जाला तर तुझे नांव ठेवीन. त्याउपर सिवाजी राजे त्यांचा जन्म जाला. शके १५४९ क्षये नाम संवत्छरे वैशाख सुध पंचमी चंद्रवार.'

वरील हकीकतींतील शिवाई देवी नवसाला पावली म्हणून पुत्राचें नांव शिवाजी ठेवलें ही घटना खरी आहे, शक्य आहे. 'शिवनेरी' या नांवावरून शिवाजी नांव ठेवलें असण्याचीहि शक्यता आहे. बखरींतील इतर मजकूर घोटाळ्याचा व अविश्वसनीय समजला पाहिजे.

पुत्रजन्मानंतर पुराणिकबोवांकडून शुभ दिवस पाहिला गेला व तें कान्तिमान, हसतमुख व गोंडस बालक पाळण्यांत घातलें गेलें. नांव शिवाजी ठेवण्यांत आलें. पाळणा म्हटला गेला, आणि साखरा वाटण्यांत आल्या.

**जो जो जो जो रे । शिवराया । सुख पावो तव काया ।**
**जो जो जो जो रे ।**

जिजामाता आपल्या वत्सलहाताने त्या चिमण्या तेजस्वी बालकाला झोके देत होती. तिच्या हातची रेशमी रंगीत दोरी मागेपुढे होत होती. पाळण्यांतला नटलेला बाळ किलकिल्या नेत्रांनी विश्व न्याहाळीत होता. त्याला खरें म्हणजे आईच्या अंत:करणांत डोकावून पाहायचें होतें. पण तें कसें शक्य होतें ? सर्वांनी घेऊन घेऊन, कुरवाळून कुरवाळून, बाळ कोमेजून गेलें. रडूं लागलें. मग जिजामातेने त्याला अलगद उचलून मांडीवर घेतलें व पदराखाली लपवलें.

बालशिवाजी आता मुठी चोखूं लागला होता. मुठींत दिलेलें चांदीचें रिंगणें तो अगदी घट्ट पकडून ठेवी. पाळण्यावर लावलेल्या रंगीबेरंगी कापडी चिमण्यांकडे बघून तो उसळ्या घेई. कित्येकदा पालथें पडून तो आपल्या मातेला न्याहाळी. ती दिसली नाही की तो रडूं लागे. त्याचें रडणें ऐकून दासी त्याला उचलून घेत. पण तो कांही केल्या थांबत नसे. त्याची माता या वेळी शिवाईच्या देवळांत गेलेली असे. पति स्वारीवरून लवकर परतावा म्हणून तिची देवीजवळ प्रार्थना चालू असे. पुत्रजन्माच्या आनंदोत्सवांत पतिराज हजर नसावेत, इतकेंच नव्हे तर अद्यापहि त्यांना लेकाला बघतां येऊं नये याची जिजामातेला खंत वाटे. मग ती देवळांत जाऊन एकान्तांत अश्रू ढाळीत बसे. ‘ शिवबा रडतोय् बाई ’ हे शब्द कानीं पडताच मात्र ती माउली बाळाकडे वेगाने धाव घेई. आपल्या अस्थिर व भयाकुल जीवनाला म्लेंच्छसत्ता कारणीभूत आहे या जाणिवेने तिच्या मनांत पुन्हा पुन्हा वेदना उठत. मनाची

व्यथा हलकी करण्यासाठी मग एखादेवेळीं ती शिवबाला पाळण्यांत घाली व भावनावेगाने झोका देऊन स्वतःच गाणें म्हणे—

**मी लोटीते झोका तुज शिवबाळा । सुंदरा, नीज स्नेहाळा ॥ ध्रु०॥**
**तनुशांतीते शांत नीज तुज येण्या । राष्ट्रगीत गाते तान्ह्या.**
**वघ दास्यि जळे मही अंबिका माय । हंबरडे फोडी हाय.**

**निजशत्रूंनी हिचें भंगिलें छत्र । मांगल्य-सूत्र स्वातंत्र्य**
**या दुःखाने दुःखिं फार रे पाही । मी जिजाबाइ तव आई**

**बहु शत्रु मातले मेले । रे ।**
**मेल्यांनि आर्यधन नेले । रे ।**
**आमचें राज्य बुडविलें । रे ।**

**कुणि निपजेना शास्ता यां चांडाळा । सुंदरा नीज स्नेहाळा ॥ १ ॥**

**भूमातेच्या भूतकाळि उद्धरणी । झुंजली रणीं नृडरमणी**
**श्रीरामाने रावण वधिला लढुनी । वानरां वीर बनवूनी**
**घे स्वतंत्रता कंसाच्यापासूनी । गोविंद गोप जमवूनी**

**तूं तसा वीर होशील का ? रे ।**
**तरवार करी धरशिल कां ? । रे ।**
**मिळविशिल मावळे गडि कां ? । रे ।**

**रणि वधावया देशशत्रुचा मेळा । सुंदरा नीज स्नेहाळा ॥ २ ॥**

**भूभक्तीचें प्रबल दुग्ध पाजीन । मी वीर तुला बनवीन**
**रिपुरक्तें भू तुझ्या करी न्हाणीन । स्वातंत्र्य घरीं आणीन**
**साधीन सख्या जाण लोककल्याणा । तुज राज्यपदीं स्थापून**

**स्वातंत्र्यविराची माता । रे ।**
**मी स्वतंत्र सुधन्य होता । रे ।**
**ध्वज स्वातंत्र्याचा डुलता । रे ।**

**ठेवीन तनु अशा नंदमय वेळा । सुंदरा नीज स्नेहाळा ॥ ३ ॥**

गद्गदा तदा पाळण्यांत शिव हंसला। जणुं मातृबोल त्या रुचला
मग करि लीला मृदुल मुष्टि वळवून। जणुं म्हणे हिने रिपु वधिन
तशि आर्यशिखा रक्षिन या भावें हो। जावळाशि तो खेळे हो.
श्रीजिजाइला असा क्रीडता तान्हा। दाटला प्रीतिचा पान्हा

उचलिलें तिने तधि त्याला। हो।
उचलिलें जणू प्रेमाला। हो।
आलिंगि; चुंबि तान्हुला। हो।

* गोविंद म्हणे सफळ तदाशय झाला। शिव करिल मुक्त देशाला॥४॥

० ० ०

* 'गोविंद' म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे नाशिकचे सहकारी. गोविंद त्र्यंबक दरेकर हें त्यांचें नांव. त्यांना आबा म्हणत. पायाने ते पांगळे होते. पण प्रतिभाबलावर ते स्वातंत्र्यकवि झाले. त्यांच्या ओजस्वी संग्रहांतली वरील कविता आहे. शेवटची ओळ 'शिव स्वतंत्र करि देशाला' अशी आहे. शिवजन्माच्या प्रकरणांत ती शोभणार नाही म्हणून मी 'शिव करिल मुक्त देशाला' असा उचित बदल केला आहे.



## ८ : पतीचा पराक्रम आणि पुत्राचें शिक्षण

शिवजन्मापासून शहाजीराजांचें जीवन अतिशय गतिमान झालें. त्यांचा पराक्रम व ऐश्वर्य वाढूं लागलें. संकटें सारखीं येत होतीं, पण त्यांची पर्वा नसे. लढावें केव्हा, नमतें घ्यावें केव्हा ही कला त्यांना चांगली अवगत होती. जशी परिस्थिति असेल तसे राजे वागत. जिथे आपल्या कर्तबगारीला वाव मिळेल तिथे ते बेलाशक जात. शिवजन्माच्या वेळीं राजांच्या पुणें प्रांतांत विजापुरी सरदार मुरारपंत याने स्वारी करून धुमाकूळ मांडला होता. राजांनी हा कठीण प्रसंग जाणून मोंगलांकडे अर्ज केला व त्यांची मनसबदारी पत्करली. खुद्द राजांना पंचहजारी व थोरला पुत्र संभाजी यांस दोन हजारी मनसबा, व शिवाय उंची पोषाख वगैरे देऊन मोंगलांनी राजांना हाताशीं धरलें.

इकडे शिवनेरीवर बालशिवाजी रांगूं लागला. माणसें ओळखूं लागला. सूर्यदर्शन, उपवेशन, अन्नप्राशन इत्यादि त्याचे संस्कार उरकून घेण्यांत आले. जिजामाता त्याच्या पित्याची रोज वाट पाही. पण बाळ उंबऱ्यांत बसून जग पाहूं लागला तरी त्याला बापाच्या मांडीवर बसण्याचें भाग्य लाभलें नव्हतें. मग एके दिवशीं कार्तिक-मार्गशीर्षांत शहाजीराजे अकस्मात् शिवनेरीवर आले. आपल्या गुटगुटीत व हसऱ्या मुलाला त्यांनी प्रथमच पाहिलें व मांडीवर घेऊन मनमुराद कुरवाळलें. जिजामाता हें दृश्य चोरून पाहात होती. तिचें मन आनंदाने फुलून

आलें. तिचेंच काय, पण शिवनेरीवर साऱ्यांचें. राजांनी आता चार दिवस मायलेकरांच्या सहवासांत घालवावे अशी साऱ्यांची इच्छा होती.

पण राजांच्या नशिबांत असें सहवाससुख नव्हतें. निजामशाहींत बेदिली माजली होती. मोंगलांच्या भीतीने निजामशहाने मलिकंबराचा पुत्र फत्तेखान याची कैदेंतून सुटका केली व त्याला वजीर केलें. पुढे निजामशहा वेडसर झाला व १६३२ च्या फेब्रुवारींत निधन पावला. फत्तेखानाने विष घालून त्याला मारलें असाहि एक प्रवाद होता. हा फत्तेखान अत्यंत स्वार्थी व संधिसाधू होता. आंतून तो मोंगलांना सामील असे. सात वर्षांच्या एका मुलास दौलताबादेला गादीवर बसवून तो अंमल गाजवूं लागला. तथापि, त्याच्यावर कोणी राजी नसे. दरबारांत तट पडले. याच सुमारास मोंगलांनी फत्तेखानास जवळ केलें व शहाजीची मनसब काढून त्याला दिली. राजे या कारस्थानामुळे अर्थातच रागावले. त्यांनी मोंगली सत्तेविरुद्ध बंड उभारलें व निजाम-शाहीचें पुनरुज्जीवन करण्याचा निर्धार केला. राजांजवळ या वेळीं पांच-सहा हजार फौज होती. त्या फौजेच्या जोरावर त्यांनी नाशिक, त्रिंबक, संगमनेर, जुन्नर व उत्तर कोकणांतल्या कांही भागांत लूट केली. याशिवाय आदिलशाही वजीर खवासखान व त्याचा मातब्बर सरदार मुरारपंत यांच्याशीं संधान बांधून मोंगलांविरुद्ध एकजूट निर्माण केली. फत्तेखानाने दौलताबादेस गादीवर बसवलेला अल्पवयी मुलगा म्हणजे उघड उघड मोंगलांच्या हातचें बाहुलें होतें. शहाजी राजांसारखा मानी व पराक्रमी सरदार या बाहुल्यासमोर कसा नमणार ? मग त्यांनी सरळ जुन्नरनजीक पेमगिरी येथे नवी निजामशाही स्थापन केली, व आपण स्वतः वजीर बनून ते कारभार करूं लागले. ( सप्टेंबर १६३२ ).

पुढें मोंगल सेनापति महाबतखान याने दौलताबादेस वेढा देऊन

निजामशाहीच्या मुळावरच प्रहार केला. ( मार्च १६३३ ). या वेळीं आदिलशाही फौज व शहाजी राजे निजामशाहीच्या मदतीला धावून आले. दौलताबादेजवळ पांच महिने उभयपक्षांत चकमकी चालू होत्या. शहाजी राजांनी या वेळीं अद्‌भुत पराक्रम गाजवून महाबदखानास जेरीला आणलें. तथापि, आदिलशाही सरदारांचीं आपसांतील भांडणें आणि वेढ्यांत अडकलेल्या फत्तेखानाचें मतलबी वर्तन या दोन गोष्टींचा फायदा घेऊन मोंगलांनी भेदनीति वापरली. ती यशस्वी होऊन राजधानी दौलताबाद मोंगलांच्या हातीं पडली. ( जून १६३३ ). शहाजी राजे निराशेने व कांहीशा रागाने माघारे फिरले, आणि आवेशाच्या भरांत त्यांनी पुणें, चाकण, जुन्नर, नगर, संगमनेर, नाशिक, त्र्यंबक हा भाग जिंकून स्वतःच्या ताब्यांत घेतला. मोंगलांच्या भीतीने सैन्यहि मोठ्या प्रमाणावर जमविलें.

निजामशाहीचें मूळ छत्र मोडल्यावर मोंगलांनी आपला मोर्चा साहजिकच शहाजी राजांकडे वळविला ! शहाजीसारख्या बंडखोर व फौजबंद सरदारास काबूंत आणणें सोपें नव्हतें. मोंगलांना ती गोष्ट अगदी अशक्य वाटली. मग जी गोष्ट पराक्रमाने साधेना ती त्यांनी भेदनीति वापरून साधली. निजामशाहींतील वांटणीचें मोठें आमिष दाखवून मोंगलांनी आदिलशाहास आपलेंसें केलें व मग शहाजीविरुद्ध उभयतांनी जंगी मोहीम काढली. शहाजहान बादशहा जातीने दौलताबादेस आला. ( फेब्रुवारी १६३६ ). शास्ताखानास व झमनखानास शहाजीच्या प्रदेशावर पाठविण्यांत आलें. त्यांनी जुन्नर-संगमनेर वगैरे भाग झपाट्याने काबीज केले. शहाजीने मोंगलांच्या संयुक्त फौजेस अनेकदां हुलकावण्या दाखवून सतत तीन वर्षें झुंज घेतली. अखेर सामर्थ्य कमी पडून राजे माहुलीच्या किल्ल्यांत आश्रयास गेले. मोंगलांनी तिथेहि वेढा घातला. आता मात्र शरण गेल्याशिवाय गत्यंतर नव्हतें.

मग उभयपक्षांत तह झाला. या तहान्वयें राजांनी आपला जहागिरीचा मुलूख वगळून इतर सर्व किल्ले व प्रदेश मोंगलांना दिले व स्वतःची सुटका करून घेतली. अशारीतीने राजांनी उभारलेली व झुंजवलेली ही नवी निजामशाहीहि कोलमडून पडली व तिचें तीन तुकडे झाले. (१६३६ अखेर).

राजे तदनंतर लवकरच आदिलशहाकडे विजापुरास गेले. मोंगली सत्तेची आक्रमक चाल पाहून शहाने त्यांना आपणहून दरबारीं बोलावलें व मोठा हुद्दा देऊन त्यांच्या पराक्रमाचा उपयोग करून घेतला. राजे आता धावपळीला कंटाळले होते. परक्यांची चाकरी त्यांना अटळ दिसूं लागली. विजापूरला जाण्यापूर्वी राजांनी पुणें—सुप्याच्या आपल्या जहागिरीची व्यवस्था मुतालिक दादाजी कोंडदेव यांजकडे सोपविली व ते निर्धास्तपणें विजापुरास रवाना झाले. विजापूर दरबारीं त्यांचा भाग्योदय उत्तरोत्तर वाढत गेला. १६३९ मध्ये आदिलशहाने सेनापति - रणदुल्लाखानाबरोबर शहाजी राजांना कर्नाटकाच्या स्वारीवर पाठविलें. या वेळीं राजांनी मोठाच पराक्रम गाजवला. आदिलशहाने त्यांच्या पराक्रमाचें योग्य चीज केलें. बंगळूरचा किल्ला व प्रदेश राजांना जहागिरीदाखल वहाल करण्यांत आला. राजांच्या जीवनाला यामुळे एकप्रकारची स्थिरता प्राप्त झाली. विजापूर दरबारांतील एक बडे सरदार म्हणून ते ख्यात पावले. शहाजी राजे बंगळुरांत खरोखरच एखाद्या ‘ राजा ’ सारखे दिमाखाने नांदूं लागले. त्यांचा दरारा पुढे पुढे इतका वाढला की—‘ अरू उत्तर दच्छिन रच्छनको इत साहजि है उत सा जिहां ’ असे उद्‌गार जयराम पिंड्ये नामक कवीला काढावे लागले. हा कवि खुद्द राजांच्या पदरीं होता. ‘ दक्षिणेच्या रक्षणास शहाजी तर उत्तरेच्या रक्षणास शहाजहान ’ या शब्दांत त्याने केलेली राजांची स्तुति बहुतांशीं खरी आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ............ दि: ............

राजांच्या या दहा-बारा वर्षांच्या धावपळीच्या कि धकाधकीच्या काळांत जिजामाता व बालशिवाजी होते कोठे, त्यांच्या जीवनक्रम कसा चालला होता, उभयतांना राजांचा सहवास कितपत व कसा लाभला हें आतां पाहूं. माहुलीच्या वेढ्यापर्यंतची मायलेकरांची पहिलीं सहा वर्षे शिवनेरी, दौलताबाद, अहमदनगर, पेमगिरी व माहुली या ठिकाणीं गेलीं असलीं पाहिजेत. त्यांतहि शिवनेरी-पेमगिरी व माहुली या तीन ठिकाणीं त्यांचें वास्तव्य अधिक झालें असलें पाहिजे. शिवाजी तीन वर्षांचा असतांना त्रिंबकचा किल्लेदार म्हालदारखान याने बढतीच्या आशेने शहाजी राजांच्या अब्रूला धोका पोचविल्याची एक हकिकत बखरकार सांगतात. हा प्रकार असा की, खानाने शिवनेरीवर स्वारी करून जिजाईस कैद करून नेलें. जिजाईला या गोष्टीचा सुगावा लागल्याने तिने बालशिवाजीला आधीच दासीकरवीं शिवापुरास पाठविलें. पुढे चुलता जगदेवराव याने मध्यस्थी केल्यामुळे तिची सुटका झाली. शिवाजी बालपणीं अतिशय अवखळ होता. घराबाहेर केव्हा पडेल व कुठे कुठे जाईल याची मातेला अहर्निश चिंता वाटे. वडील शहाजी राजे सदा स्वारीशिकारीवर असत. त्यामुळे शिवाजीला मातेशिवाय जवळचें मायेचें माणूस नव्हतें. घरीं थोरला भाऊ संभाजी होता. पण तो बरोबरीचा नव्हता. चांगला पांच-सात वर्षांनी मोठा होता. त्यामुळे आई हेंच शिवाजीचें सर्वस्व होतें. लाड करणार आई, खेळवणार आई, भरवणार आई, मार देणार आई आणि शिकवणारहि आईच. बालपणीं आई हाच शिवाजीचा एकमेव आधार होता. या काळांत त्याच्यावर झालेले सर्व संस्कार आईने घडविलेले होते. जी शिवाजीची स्थिति तीच त्याच्या आईची. तिलाहि पतिसान्निध्य अल्प मिळे. मग ती माउली सारा वेळ लाडक्या शिवाजीच्या लालनपोषणांत घालवी.

शहाजी राजांनी शिवजन्माच्या आधी दुसरें लग्न केलें होतें. त्यांच्या द्वितीय पत्नीचें नांव तुकाबाई. याशिवाय नरसाबाई नांवाची आणखी एक उपस्त्री राजांजवळ असे. तुकाबाईला एकोजी ऊर्फ व्यंकोजी नांवाचा मुलगा होता. त्याचा जन्म शिवजन्मानंतर वर्ष दोन वर्षांत झाला. हा एकोजी नेहमी कर्नाटकांत असे. राजांनी त्याला पुढे तंजावरचें राज्य दिलें. कांहीं इतिहासकारांनी राजांना जिजाई आवडे-नाशी झाली म्हणून त्यांनी दुसरें लग्न केलें असें लिहिलें आहे. पण हें बरोबर नाही. वस्तुस्थिति अशी आहे की, राजांना जिजाईच अधिक प्रिय होती, व शिवाजीच त्यांचा लाडका पुत्र होता. शिवजन्मापासून आपलें ऐश्वर्य वाढीस लागलें याची राजांना पुरेपूर जाणीव होती. जिजाबाईसंबंधी सांगायचें तर ती मूर्तिमंत साध्वी, पतिव्रता, विनयशील विचारी व धीरगंभीर स्त्री होती. पतीने अन्य स्त्रिया केल्या तरी तिने त्यांचा कधी तिरस्कार केला नाही की त्याला दुखवलें नाही, उलट सवतीमत्सर न करतां ती सवतीच्या मुलांची विचारपूस करी व सणावारीं त्यांना पोषाख वगैरे पाठवीत असे.

शिवबाचें बालपण सह्याद्रीच्या हिरव्यागार व ओबडधोबड परिसरांत गेलें. आईचा डोळा चुकवून तो सवंगड्यांबरोबर बाहेर पडे. डोंगर दऱ्या, नद्यानाले, झाडेंझुडपें व पशु-पक्षी यांच्या सान्निध्यांत त्याचें बालपण हा हा म्हणतां सरलें. आईच्या तोंडून तो आजोबांच्या व वडिलांच्या पराक्रमाच्या गोष्टी ऐकत होता. रामायण, महाभारतांतल्या कांहीं गोष्टी ऐकण्यांतहि त्याचें मन खूप रमत असे. आपलें दुःख आवरून आई त्याला शिकवीत होती, सुखवीत होती आणि तो अजाण, अवखळ बालक खेळत होता, वाढत होता. त्याच्या बाललीला म्हणजे मातेच्या दुःखीकष्टी मनाला विरंगुळा होता. पुत्राच्या चालीने ती बिचारी चालत होती आणि त्याच्या भवितव्यांत आपलें भवितव्य शोधीत होती.


माहुलीच्या पाडावानंतर शहाजी राजे सर्व कुटुंबासह विजापुरास गेले. या वेळीं त्यांच्या कुटुंबांत जिजाबाई, तुकाबाई व नरसाबाई अशा तीन स्त्रिया व संभाजी, शिवाजी, एकोजी आणि नरसाबाईचा मुलगा संताजी हे चार पुत्र अशीं एकूण आठ माणसें होतीं. सर्वजण गुण्यागोविंदाने राहत होतीं. राजे स्वतः धार्मिक व गुणीजनांचे आश्रयदाते होते. मुलांच्या शिक्षणासाठी त्यांनी शास्त्रीपुराणिक व पंतोजी ठेविले. सर्व मुलांना स्मृति-पुराणें, भागवत, रामायण, महाभारत इत्यादि ग्रंथांतील सुरस व उदात्त कथा ऐकवल्या जात व त्याजबरोबर मर्दानी खेळ शिकवले जात. शिवाजी सातव्या वर्षापासून लिहूं लागला. त्याचें लिहिणें जलद व अक्षर वळणदार असे. शब्दोच्चारहि स्पष्ट असत. इतर मुलांबरोबर हत्ती-घोड्यांवर बसणें; तलवार, भाला, पट्टा व धनुष्य चालविणें, गडकोट चढणें, कुस्ती मारणें, विष उतरविणें, रत्नपरीक्षा करणें इत्यादि विद्या व कला त्याने शीघ्रगतीने आत्मसात् केल्या. जिजामातेचें तर त्याच्यावर विशेष लक्ष असे.

१६३९ सालीं बंगळूरची जाहागिरी मिळाल्यावर राजे आपल्या कुटुंबासह तिकडे गेले. गेल्यावर वर्षभराने शिवाजीचें लग्न झालें. फलटणचे मुधोजी निंबाळकर ( पवार ) यांची मुलगी सईबाई जिजामातेची लाडकी सून झाली. राजांच्या जीवनांत आता स्थिरता व ऐश्वर्य आल्यामुळे त्यांनी प्रथम आपल्या दोन्ही जाहागिरींची नीट व्यवस्था लावून देण्याचें ठरविलें. त्याप्रमाणे आणखी वर्षभराने त्यांनी पुण्या-सुप्याची जहागीर शिवाजीच्या नांवें करून त्याला आपल्या मातेसह पुण्यास पाठविलें. शिवाजी वयांत येईपर्यंत जहागिरीची व्यवस्था दादाजी कोंडदेव पाहणार होता. दादाजीच्या मदतीला शामराव नीळकंठ ( पेशवा ), बाळकृष्णपंत हणमंते ( मुजुमदार ), सोनो विश्वनाथ ( डबीर ), रघुवीर वल्लाळ ( सबनीस ) इत्यादि कारभारी राजांनी बरोबर पाठविले होते.

मायलेकरांची ही पाठवणी करतांना राजांना साहजिकच मोठें दुःख झालें. तथापि, कर्तव्य व व्यवहार त्यांना सोडतां येत नव्हता.

जिजामाता व शिवाजी पुण्याकडे आले ते प्रथम सिंहगडाजवळ कसबें खेड ( खेड-शिवापूर ) येथें राहूं लागले. नजीक गडावर दादाजी कोंडदेवाचें वास्तव्य असे. मायलेकरांवर त्यांची सतत दृष्टि असे व जहागिरींतून जरूर लागेल तो पैसा त्यांना दिला जाई. मध्यंतरीं दादाजीने शहाजीच्या आज्ञेने पुण्यांत कसबा पेठेंत 'लालमहाल' नांवाचा एक मोठा वाडा बांधला. त्या वाड्यांतहि मायलेकरांचा अधूनमधून मुक्काम असे. याच सुमारास जिजाईच्या सांगण्यावरून वाड्यानजीक गणपतीचें देऊळ दादाजीने बांधलें. १६४७ सालीं दादाजी कोंडदेव निधन पावले. त्यानंतर सात-आठ वर्षें तरी उभयतांचा पुण्याच्या वाड्यांत मुक्काम होता. शिवाजीने स्वराज्य उभारण्याच्या ज्या पहिल्या हालचाली केल्या त्या शिवापूर व पुणें येथील मुक्कामांतूनच केल्या आहेत. या वेळच्या धाडसी उद्योगांत त्याला मुख्य आधार व आशीर्वाद होता तो त्याच्या मातेचा. दादाजीचें त्याला मार्गदर्शन होतें, हें खरें. पण प्रेरणा देणारी सावली होती खरी माउलीच. वयाचें व अनुभवाचें पाठबळ आता तिच्यापाशीं होतें. पति दूर देशीं असल्यामुळे विचार करण्यास व निर्णय घेण्यास तिची ती स्वतंत्र होती. मध्यंतरींच्या काळांत शहाजी राजांच्या पुण्याकडे एक-दोन खेपा झाल्या. पण तेवढा अल्पकाळ सोडला तर जिजामाताच शिवबाची मार्गदर्शिका होती. यापुढचें तिचें आयुष्य पतीऐवजी पुत्राच्या सान्निध्यांत व त्याचे वर्धिष्णु अवतारकार्य बघण्यांत गेलें.

○ ○ ○



## ९ : मायलेकरांची एकरूपता

जिजामातेचा लाडका पुत्र शिवाजी आता मोठा होऊन जहागिरीचा कारभार पाहूं लागला. आईची स्वाभिमानी शिकवण, वडिलांचा पराक्रम आणि भोवतालची जाचक परिस्थिति या तीन गोष्टींचा परिणाम होऊन त्याने १६४५ सालीं, म्हणजे वयाच्या पंधराव्या वर्षीं स्वराज्याची शपथ घेतली. जहागिरीच्या प्रदेशांतील मावळ भाग त्याच्या चांगला परिचयाचा झाला होता. कारभार सुधारणें, समाजनिरीक्षण करून संघटना करणें, बळ वाढविणें व मग स्वराज्याची चळवळ उभारणें अशा क्रमाने त्याचीं पावलें पडूं लागलीं. येसाजी कंक, बाजी पासलकर, तानाजी व सूर्याजी मालुसरे, जेधे-बांदल-देशमुख इत्यादि मंडळींना आपलेंसें करून नित्य नव्या साहसांना तो उद्युक्त झाला. १६४६ सालीं तोरणा किल्ला घेऊन शिवाजीने आदिलशाही-विरुद्ध बंडाचें निशाण उभारलें. पुढल्या वर्षीं कोंडाणा व पुरंदर हे किल्ले घेतले. कारण ' संपूर्ण राज्याचें सार तें दुर्ग ' हें त्याच्या राजनीतीचें आरंभापासूनचें मुख्य सूत्र होतें.

कोंडाणा—पुरंदर हे किल्ले घेतल्यावर चार-सहा महिन्यांनी दादाजी कोंडदेव निधन पावले. ( १६४७ ). त्यांच्या पश्चात् कारभारांत मातुश्री जिजामाता शिवरायांना सल्लामसलत देऊं लागली. खुद्द दादाजींच्या हयातींत

रामाजी विठ्ठल व तिमाजी पुरुषोत्तम यांच्यामधील वतनाचा एक गोत-निवाडा ' मातुश्री जिजाआऊसाहेब यांच्या समक्ष ' झालेला होता. शिवाजी राजांनी किल्ले घेतल्यावर विजापूर दरबारांत साहजिकच खळबळ उडाली. शहाजी राजे हे विजापूरकरांचे चाकर असतांना त्यांच्या मुलाने बंडखोरी करून दरबारचे किल्ले ताब्यांत घ्यावेत या गोष्टीचा आदिलशहास घुस्सा यावा हें स्वाभाविकच होय. त्याने शहाजीस या गोष्टीचा जाब विचारला. पण त्यांनी कानावर होत ठेवले. राजांबद्दल दरबारांत आधीच मत्सराग्नि धुमसत होता. राजांचा पराक्रम व दर्जा दरबारांतील मुसलमान सरदारांना पाहावत नव्हता. त्यांतून राजे हिंदु. कर्नाटकांतील हिंदु राजेरजवाड्यांबद्दल राजांना वाटणाऱ्या आपुलकीचा विपर्यास करून राजांच्या हितशत्रूंनी त्यांच्याविरुद्ध आदिलशहाचे कान फुंकले. ' राजे बंड करूं पाहतात ' अशाहि कंड्या पिकवण्यांत आल्या. मग मात्र सुलतानाचा संशय बळावला. त्याने शहाजी राजांच्या अटकेचा हुकूम दिला. राजांच्या छावणीला रात्रीं अचानक वेढा पडला. राजे जागे झाले तों चकमकी सुरू होत्या. खुद्द राजांवर बाजी घोरपडे चालून आला. उभयतांची चांगली झुंज झाली. राजे जखमी होऊन कैदी झाले. त्यांची छावणी लुटली गेली. विजापूरला जवळजवळ दहा महिने राजे कैदेंत होते. शेवटीं ' कोंडाणा, कंदर्पी व बंगळूरचे किल्ले दिलेत तर सोडूं ' या अटीवर त्यांची सुटका करण्यांत आली. वडिलांच्या सुटकेसाठी शिवाजीला कोंडाणा द्यावा लागला. या गोष्टीचें त्याला व त्याच्या आईला अर्थातच फार दुःख झालें.

पुत्राचा पराक्रम चालू असता जिजामाता कारभाराकडे व लोकांच्या अडीअडचणीकडे जातीने लक्ष पुरवीत असे. इ. स. १६५१-५२ चें तिचें एक पत्र उपलब्ध आहे. या पत्रांत गणो आबाजीला तिनें ' जमीन इनाम अनामत न करिता पूर्वीप्रमाणे चालू ठेवणें.' असें फर्माविलें आहे. विशेष

म्हणजे चिरंजिवाने ‘ इनाम अनामत करण्याबदल ’ लिहिलें असतांहि तिने त्याचा हुकूम फिरवून स्वतः नवा हुकूम दिला आहे. कारभारांत जिजामातेचें केवढें वजन होतें व तो कारभार ती स्वतः आपल्या बुद्धिनुसार कसा करीत होती हें या पत्रावरून स्पष्ट दिसून येतें. यानंतर बजाजी निंबाळकराचें प्रकरण उदभवलें. निंबाळकर हे पूर्वापार आदिलशाहींतील एक प्रतिष्ठित जहागिरदार. बजाजी हा शिवाजीचा मेहुणा, म्हणजे पत्नी सईबाईचा भाऊ. एकदा अफझलखानाच्या तावडींत सापडून त्याच्या गळ्यांत साखळदंड बांधण्यांत आले व त्याला जुल्माने मुसलमान करण्यांत आलें. त्यामुळे तो मोठा कष्टी होता. जिजामाता १६५१ सालीं शिखरशिंगणापूरच्या दर्शनासाठी गेली असता तिने बजाजीला बोलावणें पाठवलें व सशास्त्रपणें त्याला हिंदु करून घेतलें. पण एवढ्याने बजाजीला समाजांत प्रतिष्ठा मिळणार नव्हती. मग जिजामातेने आपली नात ( शिवाजी-सईबाईची मुलगी ) सकवारबाई ऊर्फ सखूबाई बजाजीचा मुलगा महादजी यांस देऊं केली व त्याप्रमाणे लग्न घडवून आणलें. हें सामाजिक कार्य घडविण्यांत जिजामातेने त्या काळीं जें धैर्य दाखविले तें खरोखरच अतुलनीय आहे. समाजाविषयीची तिची कळकळ किती प्रामाणिकपणाची होती हेंहि यावरून दिसून येतें. उक्तीने नव्हे तर कृतीने तिने समाजसुधारणेचा व धर्मसहिष्णुतेचा आदर्श घालून दिला. निंबाळकरांच्या शुद्धिकरणानंतर वर्ष-दीड-वर्षाने जिजामातेने व शिवाजीने महाबळेश्वरच्या वेदमूर्ति गोपाळभट्टांकडून मंत्रोपदेश घेतला व पुत्राच्या अभ्युदयार्थ प्रतिवर्षी अनुष्ठानाची व्यवस्था करविली.

शिवाजी राजांची आपल्या मातुश्रीवर अपार निष्ठा. आपली कल्याण चिंतणारी तीच. तिला कशाला दुखवायचें ? उलट ती सांगेल त्याप्रमाणे ऐकायचें व प्रत्येक कार्यांत तिचा आशीर्वाद घेऊन मगच पुढे पाऊल टाकावयाचें. तिच्या सल्ल्याविना कोणतेंहि नवें साहस करायचें नाही. कांही

बारीकसारीक तंटे असतील तर ते तिजकडूनच मिटवावयाचे. मंत्रोपदेश घेतल्याच्या वर्षी जेजुरीच्या खंडोबाच्या देवळांतील गुरवांत तंटा माजला. हा तंटा राजांनी मातुश्रीकडूनच मिटवला. आईचा कौल तो आपला कौल; अशा परखड शब्दांत त्यांनी हा निवाडा केला. मातेवर त्यांची श्रद्धा अशी जबर, की कोणास शब्द देतांना ' मातुश्रीसाहेबांच्या पायाची आण असे ' या शब्दांत स्वत:ला गुंतवून घेत. मायलेकरांच्या इच्छा-आकांक्षा व हालचाली इतक्या एकरूप होत चालल्या की, जणू सुईमागून दोरा. स्वराज्याचें महावस्त्र भराभर विणलें गेलें तें अशा एकरूप हालचालींमुळेच.

इ. स. १६५५ सालीं जिजामातेवर एक कौटुंबिक आपत्ति अचानक कोसळली. ती म्हणजे थोरला पुत्र संभाजी याच्या निधनाची. संभाजी या वेळीं सुमारें तीस वर्षांचा होता. तो नेहमी शहाजी राजांबरोबर असे. राजांबरोबर अनेक लढायांत त्याने पराक्रम गाजवला होता व पुढे पुढे तर तो स्वतंत्रपणें पराक्रम दाखवूं लागला होता. बंगळूराहून पुण्याला आल्यापासून जिजामातेला त्याचा सहवास फारसा लाभला नाही हें खरें; तथापि, त्याच्या हालचालींकडे तिचें लक्ष असे. संभाजीच्या पत्नीचें नांव होतें सखूबाई. उभयतांना १६५४ सालीं पुत्ररत्नाचा ( उमाजी ) लाभ झाला होता. सारें कसें सुरळीत चालू होतें. पण कनकगिरींत अचानक बंडाळी उद्भवल्यामुळे आदिलशाहीकडून संभाजीची तिकडे रवानगी झाली. या वेळीं अफजलखानासारखा बडा सरदारहि संभाजीबरोबर होता. ही बंडाळी मोडत असतां तोफेचा गोळा लागून संभाजी मृत्युमुखीं पडला. खानाचें आणि शहाजीराजांचें आधी बरें नव्हतें. पुढे संभाजीशीं लढाईच्या वेळीं त्याचा कांही तंटा झाला व त्यामुळे संभाजीला त्याने लढाईचे वेळीं नीट मदत केली नाही. राजांना ही गोष्ट फार लागून राहिली. जिजामातेला या प्रकरणाची सर्व हाकिगत समजली तेव्हा तिला परमावधीचें दुःख तर झालेंच, पण

खानाविषयी तिला विलक्षण तिटकारा आला. पतीच्या अपमानाला व पुत्राच्या मृत्यूला कारणीभूत होणाऱ्या इसमाबद्दल कोणत्या साध्वीला तिटकारा वाटणार नाही ?

•

पण योगायोग कसा विचित्र पहा ! संभाजीच्या वीरमरणानंतर दीड-दोन वर्षांनी शिवाजीची पत्नी सईबाई पुरंदर किल्ल्यावर प्रसूत झाली व तिला मुलगा झाला ( १४ मे १६५७ ). शूर चुलत्याची आठवण म्हणून त्याचें नांव संभाजीच ठेवण्यांत आलें. शिवाजीचा हा पहिला मुलगा – संभाजी – जिजामातेचा अतिशय लाडका होता. त्याची आई जरा अशक्त होती. बाळंतपणानंतर ती लवकरच आजारी पडली व प्रतापगडास माहेरीं आली. पुष्कळ औषधोपचार केले. पण गुण न येऊन सईबाई ५ सप्टेंबर १६५९ रोजीं वारली. संभाजी या वेळीं दोन वर्षांचा होता. त्या पोरक्या पोरास जवळचें माणूस म्हणजे त्याची आजी जिजामाता. तिने अपरंपार जिव्हाळ्याने त्याचा सांभाळ केला. संभाजीला आपल्या आईचें दूध थोडेंसेंच प्यायला मिळालें. तो लहान असतांना जिजामातेने पुरंदराहून मुद्दाम दाई पाठविली होती. संभाजीच्या या ' धाराई आवेस तैनात वरसाची होन २६ पावत होती.' अर्थात् ही व्यवस्था बहुधा जिजामातेनेच केली आसावी. सईबाईच्या मागें बालसंभाजीला त्याच्या ममताळू व कर्त्या आजीने कांही कमी पडूं दिलें नाही. पोर विलक्षण हूडपणा करायचा. पण आजी त्याकडे दुर्लक्ष करायची. या संभाजीकडे पाहून तिला पोटच्या संभाजीची आठवण येई आणि ज्या परिस्थितींत तो मृत्युमुखीं पडला ती आठवून तिच्या जिवाची तगमग होई.

○ ○ ○



## १० : उसनें संभाजीचें घ्यावें

जिजामातेला ज्या देवद्वेष्ट्या अफजलखानाविषयी एवढा तिरस्कार वाटत होता तो खान आता खुद्द शिवाजीच्या– तिच्या प्राणप्रिय पुत्राच्या– जिवावर उठला होता. शिवाजीची बंडाळी मोडण्यासाठी, त्याला पकडून आणण्यासाठी व जरूर तर त्याला ठार मारण्यासाठी विजापूर दरबाराने अफजलखानास मोठें सैन्य देऊन पाठविलें. खान कमालीचा क्रूर व कपटी होता. सरळ सामन्यांत शिवाजीचा पराभव होणें कठीण हें जाणून त्याने मनांत कपट योजिलें. विजापुराहून निघाल्यावर मराठ्यांच्या मनांत भीति उत्पन्न करण्यासाठी वाटेंत त्याने ठिकठिकाणीं मंदिरें फोडलीं, लूट केली व सक्तीने खंडणी उकळली. खानाच्या तावडींतून या वेळीं पंढरीचा विठोबा व तुळजापूरची भवानीसुद्धा वांचली नाही. खानाच्या स्वारीने लोक घाबरून गेले. खुद्द शिवाजी राजे सचिंत झाले. जिजामातेला पोराच्या जिवाची काळजी लागली. खानाचें प्रचंड सामर्थ्य व त्याचा कपटी स्वभाव ती जाणून होती. तिच्या मनांत या वेळीं आलें असावें की, हिय्या करावा व सरळ खानाला भेटून पुत्राचे अपराध पोटांत घालण्याची त्याला विनंती करावी. शिवकालीन डचांच्या व इंग्रजांच्या पत्रव्यवहारांत जिजामातेने खानापाशीं केलेल्या रदबदलीचा उल्लेखहि आहे. पण जिजाईचा मानी स्वभाव व खानाचें विध्वंसक धोरण लक्षांत घेतां या साहसाला व

लाचारीला ती प्रवृत्त झाली असेल असें वाटत नाहीं. आमचा इतिहास असें कांही सांगत नाही. उलट, या वीरप्रसवा मातेने वडील पुत्राचें निधन आठवून शिवबाला या वेळीं युद्धप्रवृत्त केलें आहे.

खानाशीं सामना देण्यासाठी शिवाजी राजांनी जावळी प्रांताचा आश्रय घेतला. हा भाग डोंगराळ व दाट झाडीचा. गनिमी काव्याने लढण्यास उत्तम. नजीकच प्रतापगडचा किल्ला. वाईपाशी खानाने तळ दिला होता. प्रथम कृष्णाजी भास्कर व पंताजी गोपीनाथ या दोन्ही-कडच्या वकिलांचीं बोलणीं झालीं व प्रतापगडाच्या पायथ्याशीं खानाची व शिवाजीची भेट व्हावी असें ठरलें. लढाई न करतां कपटाने शिवाजीला मारतां आलें तर तें खानाला हवेंच होतें. दगाफटका झाल्यास दोन्ही पक्षांनी लढाईची सिद्धताहि ठेवली होती. भेटीच्या प्रसंगीं दोघांनी आपापल्या वकिलांसह सशस्त्र यावें व बरोबर फक्त दहा दहा शरीररक्षक घ्यावेत असा करार झालेला होता. १० नोव्हेंबर १६५९ हा भेटीचा दिवस ठरला होता. भेटीसाठी गडाच्या पायथ्याशीं एक डौलदार शामियाना ( सदर ) उभारण्यांत आला. अफजलखानाची भेट म्हणजे शिवाजी महाराजांच्या जिवावरचा प्रसंग. अशा वेळीं मातेजवळ बसून हितगूज केल्याशिवाय ते कसें राहतील ? खानाच्या वधापूर्वी मायलेकरांची भेट कशी झाली हें शाहीर अज्ञानदासाने बिनचूकपणें सांगितलें आहे :

**खबर गेली जिजाऊला । शिवबा जातो भेटायाला**
**पालखींत बैसुनी । माता आली भेटायाला ।**
**शिवबा बोले जिजाऊ सवे । ' बये वचन ऐकावें ।**
**माझी आसोशी खानाला । बये जातो भेटायाला । '**
**जिजाऊ बोले महाराजाला । ' शिवबा न जावे भेटायाला ।**
**मुसलमान बेइमान । खान राखिना तुम्हांला । '**
**राजा बोले जिजाऊला । ' येवढी उमर झाली ।**
**भेट दिली नाही कोणाला । येवढी गोष्ट माते । आज द्यावी मला ।**

आई अबदुलखान आला। याने धाक लाविला देवाला।'
जिजाऊ बोले महाराजाला। 'शिवबा बुद्धिने काम करावें।
उसने संभाजीचें घ्यावें।'
जिजाऊ घेती अलाबला। 'शिवबा चढती दवलत तुला।
घे यशाचा विडा।' शिवबा स्मरे महादेवाला।
गळां घातली मिठी। मातेच्या चरणासीं लागला।
ध्यानीं आठवुनी भगवंताला। शिवाजी राजा सदरे गेला।

मातेच्या चरणांवर मस्तक ठेवून व तिचा 'विजयी भव!' असा आशीर्वाद घेऊन राजे राजगडाहून प्रतापगडीं आले. भेटीचा दिवस उगवला. स्नान, पूजा, भोजन वगैरे आटोपून 'खासा राजियांनी जरीची कुडती घातली. डोईस मंदिल बांधिला. त्यांत तोडा बांधिला. पायांत चोळणा घालून कास कसली व हातांत एक बिचवा व वाघनख चढविलें आणि बराबर जिऊ महाला म्हणून मर्दाना होता, त्याजवळ एक पट्टा व फिरंग, ढाल तैसाच संभाजी कावजी महालदाराजवळ पट्टा व फिरंग व ढाल ऐसे दोघे मर्दाने आपणाबराबरी भेटीस घेतली.' दुपार टळून गेल्यावर खानाची व महाराजांची भेट झाली. तिचें वेधक वर्णन महाराजांचा समकालीन सभासद येणेप्रमाणें करतो—

'खानहि उभा राहून पुढे सामोरा येऊन राजियास भेटला. राजियाने भेटी देता खानाने राजियाची मुंडी कवटाळून खांकेखाली धरिली, आणि हातींची जमदाड होती, तिचें मेण टाकून कुशींत राजियाचे चालविली. तो अंगांत जरिची कुडती होती त्यावर खरखरली. अंगास लागली नाही. हें देखोन राजियांनी डावे हाताचें वाघनख होतें तो हात पोटांत चालविला. खानाने अंगांत झगाच घातला होता. वाघनखाचा मारा करिताच खानाची चरवी बाहेर आली. दुसरा हात उजवे हातचे विचवियाचा मारा चालविला. ऐसे दोन वार करून मुंडी आसडून चौथरियाखाली उडी घालोन निघोन गेले. खानाने गलबला केला की,



'मारिले ! मारिले ! दगा दिधला ! बेगी-धावा.' असें बोलताच भोयांनी पालखी आणिली आणि पालखींत घालून उचलून चालविली. इतकियांत संभाजी कावजी महालदार याने भोयांचे पाय मारिले आणि पालखीखाले भोयांस पाडिलें. खानाचें डोचकें कापिलें. हातीं घेऊन राजियाजवळी आला. इतक्यांत सैदबंडा पटाईत धावला. त्याने राजे जवळ केले. पट्टयाचे वार राजियावरी चालविले. तो राजियाने जिऊ महालियाजवळ आपला हुद्दियाचा पट्टा घेऊन, पट्टा व बिचवा असे कातर करून सैदबंडा याचे चार वार ओढिले ( चुकविले ). पाचवे हाताने राजियाने सैदबंडा मारावा तो इतकियांत जिऊं महाला याणे फिरंगेने ( तलवारीने ) खांद्यावरी सैदबंडियासी वार केला, तो पट्टियाचा हात हत्यारासमेत तोडिला आणि खानाचें शिर घेऊन राजे सिताब गडावरी जिऊ महाला व संभाजी कावजी महालदार असे गेले.'

महाराजांचा आश्रित कवि परमानंद खानवधाची हकिकत जरा निराळ्या प्रकाराने सांगतो. ती अर्थात् अधिक विश्वसनीय आहे.

एका हातीं तलवार व एका हातीं पट्टा घेऊन महाराज एखाद्या सिंहाप्रमाणे प्रतापगडावरून निघाले. शामियान्यांत ते येतात तों खानाने खोटा स्नेह दर्शवून आपली तलवार सेवकाच्या हातीं दिली व महाराजांस म्हणाला, ‘ बेटा, शरण ये. माझ्याबरोबर विजापुरास चल. तुला मोठें वैभव मिळवून देईन. उगीच घमेंड कां करतोस? चल ये, आपला हात माझ्या हातीं दे.’ महाराजांनी त्या धिप्पाड खानास आलिंगन दिलें तो त्याने महाराजांची मान डाव्या बगलेंत पकडून उजव्या हाताने त्यांच्या कुशींत कट्यार खुपसली. बाहुयुद्धनिपुण अशा महाराजांनी आपली मान तत्काळ सोडवून घेतली व अंग चोरून खानाच्या पोटांत तलवार खुपसली ती खानाच्या पाठीपर्यंत आंतडी ओढून बाहेर पडली. खानाचें डोकें गरगरू लागलें. झोंकाड्या देत व आंतडी सावरून धरीत तो ओरडला ‘ मेलो, मेलो, याला धरा.’ जवळ खानाचा वकील कृष्णाजी भास्कर होता. त्या अधमाने महाराजांवर तलवार उगारली. पण ब्राह्मणास मारायचें नाही या ब्रीदाला जागून महाराजांनी त्याचा वार अडवला आणि दुसऱ्या हातच्या पट्ट्याने खानाचें डोकें उडवलें. खान धाडकन् खाली कोसळला. इतक्यांत खानाचे हिंदु-मुसलमान रक्षक महाराजांवर तुटून पडले. महाराजांनी या वेळी हातच्या दोन्ही शस्त्रांची अशी करामत दाखविली की, त्यांच्याभोवती एक तेजस्वी वलय ( कडें ) निर्माण झालें. ही खणाखणी चालू होती तोंच संभाजी कावजी, जिवा महाला, इब्राहीम सिद्दी, येसाजी कंक इत्यादि महाराजांचे रक्षक धावून आले. खानाचा रक्षक सय्यद बंडा महाराजांवर त्वेषाने वार करूं लागला. मग जिवा महाला पुढे सरसावला. सय्यद बंड्यास तो लोळवणार इतक्यांत महाराज हिरीरीने पुढे झाले व बंड्यास आव्हान देऊन त्यांनी सपकन्

त्याचे दोन तुकडे केले. इतरांनी खानाच्या रक्षकांचा समाचार घेतला. अशाप्रकारे मार्गशीर्ष शुक्ल सप्तमी, गुरुवारी, शके १५८१ रोजीं माध्यानी देवद्वेष्टा खान देवाघरीं गेला.'

मग महाराजांनी ' राजगडास मातुश्रीस व सर्वांसही फत्तेची खबर लिहून पाठविली. त्यांनीहि वर्तमान ऐकून साखरा वाटून नगारे कर्णे केले भांडीं मारिलीं. मोठी खुशाली केली.' शिवबाच्या या अपूर्व पराक्रमाची हकिकत ऐकून जिजामातेचा आनंद पोटांत मावेना. हर्षाने तिला वेड लागण्याची पाळी आली. परब्रह्माच्या भेटीने पुंडलिकास जितका आनंद झाला नाही तितका आनंद शिवबाच्या भेटीने जिजामातेला झाला. केवढा पराक्रम! केवढें साहस! केवढी घोर चिंता लागून राहिली होती माउलीला! शिवबा तिचा प्राण होता. खानाने तो हरण केला असतां तर तिचा जीव जीवनावेगळ्या मासोळीप्रमाणे तळमळत, तडफडत राहिला असतां. विजयश्रीने माळ घातलेल्या लेकरास कधी पाहीन असें तिला होऊन गेलें. खानाच्या वधानंतर पुढच्या लढाईची व्यवस्था करून महाराज तातडीने मातुश्रीच्या दर्शनास गेले. मायलेकरांच्या या वेळच्या भेटीचा सोहळा चिटणिशी बखरींत अतिशय भावपूर्णतेने रंगवला आहे :

" याप्रमाणे महाराजांनी यश घेऊन मातुश्रींचे दर्शनास गेले. मातुश्रींनी पोटाशीं धरून, ' संभाजीचा सूड घेतलास, माझे डोळ्यांचें पारणें फेडिलें व शिपाईगिरीची शर्त केली आणि देवांना खैर केली, भेटी जाली, आजचा दिवस सोन्याचा उगवला. ऐसे बोलिली. आणि महाराजां-वरून लिंबलोण करून सतका करविला. दानधर्म बहूत करून, समागमे होते, कामें केलीं, त्यांस बक्षिसें, वस्त्रें भूषणें, तैनाता वाढविणें, पालख्या, अबदागिरे, सोन्याचीं कडीं व द्रव्य देऊन ' तुम्ही सर्व होता म्हणोन राजे खैर होऊन आले.' ऐशी तारीफ गौरव करून मोठा आनंद करिती जाली." मातुश्री येवढेंच करून थांबल्या नाहीत. पतीप्रमाणे त्याही

गुणीजनांचा परामर्श घेणाऱ्या होत्या. शाहीर अज्ञानदासाला बोलावणें पाठवून त्यांनी अफजलखानवधावरील पोवाडा त्याजकडून रचून घेतला, गाऊन घेतला, आणि त्याप्रीत्यर्थ त्याला एक घोडा व सोन्याचें कडें बक्षिस दिलें. मायलेकरांविषयींची आपली कृतज्ञता अज्ञानदासाने पोवाड्याच्या शेवटीं पुढीलप्रमाणे व्यक्त केली आहे :

**माता जिजाऊ बोलली । पोटीं अवतार जन्मला । शंकपाळ शिवाजी महाराजाने केला । आता मी गाईन । भोसले शिवरायाच्या ख्याति । दावा हेवा जाण । अखेर संग्रामाच्या गति । राजगड राजाला । प्रतापगड जिजाऊला । धन्य जिजाऊचे कुशीं । राजा अवतार जन्मला ।**

० ० ०



## ११ : वीरता आणि करुणा

अफजलखानाच्या वधानंतर तोफेच्या इशाऱ्यासरशीं शिवाजीचें सैन्य त्याच्या सैन्यावर तुटून पडलें. विजापुरी छावणी घेरली गेली. खानाच्या सैनिकांना पळता भुई थोडी झाली. अडीच-तीन तास मराठे शत्रूंना झोडपत होते. हत्तींच्या सोंडा कापल्या गेल्या, दांत तोडले गेले, उंट मारले, अमाप लूट मिळाली, दारूगोळा मिळाला, तोफा हस्तगत झाल्या; सोन्यानाण्यासुद्धा खानाच्या छावणींतून दहा लाख रुपयांचा ऐवज मिळाला. खानाचा मोठा मुलगा फाजलखान निसटून गेला. पण त्याचे दोन मुलगे, भोसले-घाटगे हे फितूर सरदार व इतर बरीच मंडळी कैद झाली. बायकामुलांना सोडून देण्यांत आलें. गाय, स्त्री आणि ब्राह्मण यांना उपद्रव द्यायचा नाही असें महाराजांचें ब्रीद होतें.

खानाच्या वधामुळे विजापूर दरबारचा थरकाप झाला. मराठी जनतेला धीर आला व शिवाजीचें सामर्थ्य दुप्पट वाढलें. विजापूरकर व दिल्लीकर मोंगल या दोघांना महाराजांच्या वाढत्या पराक्रमाने व हाल-चालींनी भय उत्पन्न केलें. खानासारख्या अनुभवी व पराक्रमी सरदारास शिवाजीने जिवें मारून शिवाय त्याच्या फौजेची लांडगेतोड करावी ही गोष्ट विजापूरकरांना फार लागली. तशांत त्यांना आणखी एका बातमीने धक्का दिला. शिवाजीने लगोलग पन्हाळा किल्ला जिंकला. मग मात्र जंगी मोहीम आंखण्यांत आली. सिद्दी जोहार ऊर्फ सलाबतखानाकडे

स्वारीचें नेतृत्व देण्यांत आलें. बापाच्या वधामुळे चिडलेला फाजलखान, रुस्तुमखान, सादातखात, बाजी घोरपडे वगैरे सरदार मोठी फौज घेऊन त्याला मिळाले. महाराज या वेळीं किल्ल्यावर होते व त्यांच्याजवळ फौजहि थोडी होती. सिद्दी जोहारच्या प्रचंड फौजेने २ मार्च १६६० रोजीं पन्हाळ्यास वेढा दिला.

महाराष्ट्राचा राजा शत्रूच्या मगरमिठींत सापडला. जिजामातेचा प्राण पन्हाळ्यांत गुंतून पडला. चैत्रापासून आषाढापर्यंत जवळजवळ चार महिने वेढा पडला होता. शत्रू हटेना की महाराज शरण येईनात. किल्ल्यावरील दारू-गोळा व अन्नसाठा हळूहळू संपत आला. शत्रूचें सामर्थ्य अफाट होतें. महाराज व त्यांचे सैनिक मोठ्या विवंचनेंत पडले. बाहेरून मदत मागविली तीहि वेळेवर येईना. इकडे पुण्याच्या बाजूस मोंगल सरदार शायिस्तेखान मोठें सैन्य घेऊन देश उध्वस्त करीत सुटला. मे महिन्यांत तो खुद्द पुण्यांत आला व महाराजांच्या लालमहालांत तळ देऊन बसला. अफजलखानाचें संकट बरें अशी दुहेरी संकटपरंपरा आता कोसळली होती.

जिजामाता या वेळीं राजगडावर होती. शिवबाच्या चिंतेने ती व्याकुळ झाली. जोहरचा वेढा उठणें किंवा तो फोडून शिवबा निसटून जाणें शक्य दिसेना. पण अशी काळजी किती दिवस करायची? स्वस्थ बसून, हताश बनून संकट कसें टळणार? कांही तरी केलें हें पाहिजेच. क्षत्रियाच्या ब्रीदाला जागलें पाहिजे. मग एके दिवशीं त्या वीरमातेला विलक्षण स्फुरण चढलें व ती लढाईच्या गोष्टी करूं लागली. गडावर होतें नव्हतें तें सैन्य जमवून जिजामाता स्वतः शस्त्रसज्ज होऊन पन्हाळ्याकडे निघाली. पण इतक्यांत विजापूरच्या बाजूची मुलुखगिरी करून नेताजी पालकर व सिद्दी हिलाल राजगडीं येऊन पोंचले. जिजामाता क्रुद्ध झाली होती. पुत्र-दर्शनासाठी तिचा जीव तळमळत होता. नेताजीला बघताच ती आवेगाने



व आवेशाने म्हणाली, ' युद्धोत्साही असा माझा प्राणप्रिय पुत्र तिकडे शत्रूच्या वेढ्यांत अडकून पडला आहे आणि तुम्ही त्या धन्यास सोडून, सारी लाज गुंडाळून भ्याडपणें इथे आला आहांत. आता मीच जातें व जोहारचें मुंडकें कापून आणतें. शिवबावांचून मला दशदिशा अरण्याप्रमाणें आहेत. सिंहाप्रमाणे पराक्रमी असणारा माझा बाळ म्हणजे विष्णूचा अंश आहे. तो जर मला आता दिसणार नाही तर मी प्राण सोडीन. तुम्ही शत्रूशीं लढा वा न लढा. मी मात्र निघाल्यें.'

त्या वीरमातेचे हे वीरश्रीयुक्त व तळमळीचे शब्द ऐकून नेताजी घाबरला खजिल झाला व लागलीच जोहारचा वेढा उठवण्याच्या कामगिरीला लागला. जिजामातेला त्यांनी जाऊं दिलें नाही. इकडे किल्ल्यावर रात्रीं महाराजांच्या स्वप्नांत तुळजा भवानी आली. ' प्रसंग बिकट आहे. शत्रूशीं

सख्य करून किल्ला सोडून दे आणि सत्वर राजगडास जाऊन आपलें राज्य संभाळ. तुझी वृद्ध माता तुजवांचून तळमळत आहे.' असा दृष्टान्त झाला. मग एकीकडे महाराजांनी शत्रूशीं वरकरणी तहाची भाषा चालविली व दुसरीकडे एका चांदण्या रात्री भर पावसांत ते वेढ्यांतून निसटून गेले. पहाट झाली. दिवस वर आला. शत्रूच्या छावणींत गडबड उडाली. 'शिवाजी भाग गया' असा कोलाहल माजला. त्याला पकडण्यासाठी ताबडतोब घोडेस्वार निघाले. महाराज गजापूरच्या ( पावन ) खिंडी-पर्यंत पोचले होते. विशाळगड तिथून ५-७ मैल होता. तेवढ्यांत शत्रू जवळ येऊन ठेपला. साक्षात् मृत्यूच. पण या वेळीं सैन्यांतील बाजी प्रभू पुढे आला व महाराजांना पुढे जाण्यास विनवून त्याने खिंड अडवून धरली. पराक्रमाची शर्थ करून बाजी प्रभूने शत्रूला रोखून धरलें. कपडे रक्ताने भिजले होते तरी बहादर चार पांच तास झुंजत होता. सायंकाळीं महाराज गडावर सुखरूप पोचल्याची तोफ ऐकली तेव्हा कुठे वीराने धरणीवर देह टेकला. ( १३–७–१६६० ).

बाजी प्रभूच्या वीरमरणाने खिंड पावन झाली, आणि स्वराज्यावरील अरिष्ट टळलें. महाराजांचे डोळे कृतज्ञतेने भरून आले. जिजामातेच्या जिवांत जीव आला. महाराज तातडीने राजगडास गेले. मातुश्री दिसतांच वंदन करून मिठी घातली. मायलेकरांच्या भेटीचें भावपूर्ण दृश्य पाहून जमलेल्या कुलस्त्रियांचीं अंतःकरणें गहिवरून आलीं. 'विजयी शाहनंदनाने हा सर्व दिवस मातेच्या सहवासांत घालवला.'

संकटामागून संकटें येणें आणि शक्तियुक्तीच्या जोरावर त्या संकटांतून पार पडणें अशा अवखळ गतीने शिवाजी राजांचें आयुष्य चाललें होतें. राजकारणाच्या व रणकारणाच्या धकाधकीच्या मामल्यांत कौटुंबिक आपत्तीहि कोसळत. पण महाराज होते निश्चयाचे महामेरू. कधी डगमगत नसत. कर्तव्य मग तें कोणतेंहि असो, कधी सोडत नसत. अधूनमधून

संसारांतहि रमत असत. महाराजांना मातृसुख कधी कमी पडलें नाही. पण पितृसुखासाठी मात्र ते तळमळत असत. पिता दूर होता, पुत्राचा पराक्रम ऐकून समाधान पावत होता, पण राजकीय परिस्थितीमुळे बाप-लेकांची भेट होऊं शकत नव्हती. भेटीला दोघे उत्सुक होते. १६६१ सालीं अशी भेट एकदा झाली असे बखरकार सांगतात.' आदिलशहाच्या खास परवानगीने शहाजी राजे आपल्या अर्धांगीला व पराक्रमी पुत्राला भेटण्यासाठी महाराष्ट्रांत येण्यासाठी निघाले. तुळजापूर, बेदर, बीड, परांडा, पंढरपूर, फलटण, शिखरशिंगणापूर इत्यादि पूर्वपरिचित ठिकाणांना भेटी देत देत ते जेजुरीजवळ येऊन ठेपले. शिवाजीने मोरोपंतांस पालखी देऊन पुढे पाठविलें. शहाजी राजे वाजत-गाजत खंडोबाच्या देवळांत आले. शिवाजीमहाराज जोडा न घालतां पालखीबरोबर चालत आले. कुटुंबांतील सर्व स्त्री-पुरुषांचा मेळावा जमला होता. मोठा आनंदीआनंद झाला. सुखदु:खाच्या गोष्टी बहुत झाल्या. जिजामातेच्या आनंदाला सीमा उरली नाही. शहाजी राजे पुत्राबरोबर किल्ले पाहत पाहत खूप हिंडले. रायगडास आल्यावर ' हीच राजधानी करा ' असा त्यांनी सल्ला दिला. नंतर पुण्याच्या वाड्यांत कांहीं दिवस राहून पिता-पुत्र पुन्हा जेजुरीस आले. राजांना कर्नाटकांत जाणें भागच होतें. जड व व्याकुळ अंत:करणांनी सर्वांनी एकमेकांचे निरोप घेतले. बेचाळीस पिढ्या उद्धरणाऱ्या आपल्या पराक्रमी पुत्रास तुळजा नांवाची प्रासादिक तलवार व अनेक आशीर्वाद देऊन राजांनी सर्वांचा निरोप घेतला. बारणेपर्यंत शिवाजी व जिजामाता राजांच्या संगतींत होते. तेथून मग ताटातुटी झाली. कायमची.

शिमोगा जिल्ह्यांत पाळेगारांचें बंड मोडण्यासाठी शहाजी राजांची रवानगी झाली होती. राजांना शिकारीचा नाद फार. एक दिवस तुंगभद्रेच्या काठीं बसवापट्टणाकडे राजे शिकारीला गेले. वेळ सायंकाळची.


माघाचे दिवस. गाव होदिगेरे. हरिणाची शिकार करतां करतां राजे घोड्यावरून पडून जखमी झाले व थोड्याच वेळांत निधन पावले. (ता. २३-१-१६६४) शिवाजीने शायिस्तेखानाचीं बोटें तोडल्याची व सुरतेवर स्वारी केल्याची वार्ता त्यांनी नुकतीच ऐकली होती. शिवाजीचें वैभव पाहण्यास त्यांना जगायचें होतें. पण ईश्वराच्या मनांत तसें नव्हतें. त्यांची उत्तरक्रिया एकोजीने केली. शिवरायांना हें वर्तमान कळताच त्यांनी बहुत शोक केला. प्रीतिश्राद्धादि विधि करून दानधर्म अपार केला.

> ‘ मातुश्री अग्निप्रवेश करीत होती तिचे मांडीवर बैसोन गळां मिठी घालून आण घालून राहविली. आपला पुरुषार्थ पहावयास कोणी नाही. तूं जाऊं नको. म्हणून मोठा यत्न करून राजियांनी व सर्व थोर थोर लोकांनी राहविली. ’

शहाजी राजे निधनसमयीं सुमारें सत्तर वर्षांचे होते, तर जिजामाता या वेळीं सदुसष्ट वर्षांची होती. वृद्धापकाळी वैधव्याचा प्रसंग आल्यामुळे ती साध्वी पतिभक्तीने सती जाण्यास निघाली. पण पुन्हा पुत्राच्या माया-पाशांत गुंतून पडली. पुत्राच्या पुरुषार्थावर तिचा जबर विश्वास होता. त्या पुरुषार्थाची वाटचाल अद्याप संपलेली नव्हती. मायलेकरांचें ध्येय अद्याप सिद्धीस जावयाचें होतें. मन घट्ट करून पुत्रप्रेमासाठी व कर्तव्य-पूर्तीसाठी तिने जगायचें ठरविलें. स्वराज्याचा अरुणोदय पाहिल्याशिवाय डोळे मिटायचे नाहीत असेंच जणू तिने ठरविलें.

० ० ०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .................... वि: ....................
क्रमांक .................... नों दि: ....................



## १२ : वात्सल्य, पुत्राचें तसें प्रजेचें

शहाजी राजांच्या निधनाचा शोक आवरून मायलेकरें पुन्हा आपापल्या कामास लागलीं. पुत्राच्या हालचालींवर माउली सतत लक्ष ठेवी. शिवाजी राजांना घरांतलें विश्वासाचें व वडीलधारें माणूस म्हणजे एक जिजामाता. राजे वयाने व कर्तृत्वाने मोठे झाले खरे, पण मातेच्या दृष्टीला ते शिवबाच होते. वैधव्याचें दारुण दुःख गिळून ती वृद्ध माउली पुत्राचा वाढता पराक्रम आणि वैभव पाहण्यास जगली होती. मुलगा साहसी, शूर, मुत्सद्दी व संकटें ओढवून घेणारा आहे हें माहीत असून ती जगली. मुलाचा जीवनक्रम संकटमय व धावपळीचा आहे याची तिला पुरेपूर जाणीव होती. शिवराजांना आता केवळ आदिलशाही व मोगली सत्तांशींच झगडायचें नव्हतें, तर परकी डच, पोर्तुगीज व इंग्रजांच्या हालचलींचाहि बंदोबस्त करावयाचा होता· या सर्वांनी राजांना उसंत म्हणून लाभूं दिली नाही.

शहाजी राजांच्या निधनानंतर दोन-चार महिन्यांनीच आदिलशाही सरदार खवासखान पूर्वीचा तह विसरून महाराजांच्या मुलखावर चालून आला. बाजी घोरपडे व सावन्त हेहि त्याच्याबरोबर होते. महाराज या वेळीं मंगळूर-बसनूरकडे आरमारी स्वारीच्या तयारींत गुंतले होते. जिजामातेला खवासखानाच्या स्वारीची बातमी मिळतांच तिने तांतडीने महाराजांस पत्र लिहवून इशारा दिला, व त्यांचें पारिपत्य करण्याचा मनोदय प्रकट

केला. ' बाजी घोरपडे मुधोळकर याणी स्वधर्मसाधणता सोडून यवनदुष्ट तुरुक ह्याचे कृत्यास अनुकूल होऊन दगाबाजीने हुनरे करून विजापुरास येणें घडलें. तेथे गुजरला प्रकार निर्वाणीचा तो तुम्ही समजलांच आहां. तोहि प्रसंग श्री तुमचा मनोरथ सिद्धीस नेणें व स्वधर्म राज्यवृद्धि करणें म्हणोन पार पडला. सांप्रत पुन्हा दुर्बुद्धि धरून खवासखान विजापुराहून फौजेसुद्धा रवाना जाहले. त्याची इरोळी बाजी याणी व लखम सावंत व खेम सावंत याणी प्रतिज्ञापूर्वक जत ( न ) करून सेना समवेत निघाले. ते तिकडे येत आहेत. तुम्हांस श्री सांब व अंबा यश देणार पूर्ण आहे. ये समयीं त्यांचे वेढे घ्यावे आणि आमचे मनोदय सेवटास नेणार तुम्ही सुपुत्र निर्माण आहां. ' मातुश्रीचा हा इशारा व मनोदय महाराजांनी अर्थातच पुरा केला. आपल्या वडिलांस कैद करणाऱ्या बाजी घोरपड्यास मुधोळला गाठून त्याचा प्रांत लुटून महाराजांनी लढाईत त्यास ठार मारलें. खवासखान पळून गेला. सावंतास पळतां भुई थोडी होऊन त्याने गोवेकरांचा आश्रय घेतला. महाराजांनी पाठलाग करून तिथेहि त्यास दमविलें, नमविलें व शेवटीं तह करण्यास भाग पाडलें.

शिवबाच्या कारभारांत जिजामाता विशेष लक्ष घालीत होती असें नाही. जरूर तेवढीच लक्ष घाली. इतर सारा वेळ देवाधर्मात, दानधर्मात व स्वजनांचा परामर्श घेण्यांत घालवी. १६६५ सालच्या जानेवारींत ( दि . ६ ) सूर्यग्रहणाची पर्वणी आली होती. अशा पर्वणीला तुला करण्याची एक धार्मिक रीत आहे. जिजामातेला अशी तुला करण्याची इच्छा झाली. शिवराजांनी तिला महाबळेश्वरला पोचवण्याची सर्व व्यवस्था केली. त्याप्रमाणे ' शके १५८६ क्रोध संवछरे पौष वद्य अमवशा महाबळेश्वरीं जिजाई आऊ (ची ) तुळा जाली. ग्रहण सूर्याचे होते.' १६६७-६८ सालांत तिने रयतेमधील भांडणतंटे मिटवण्यांत बराच भाग घेतल्याचें दिसून येतें. ' तुम्ही सुखे आपली देसगती चालविणें. आमचे तर्फेने तुमचे वाईट

सर्वथा होणार नाही ' अशा सहानुभूतीने ती निवाडे करी. कधी कधी भांडखोर लुच्च्यांना मुलाचा धाक दाखवून ती ताकीदहि देत असे. जिजामातेचें प्रजावात्सल्य तर खरोखर आगळें होतें. विठोजी हैबतरावाच्या मुलीचें लग्न ठरलें होतें. त्याचा रोजचा प्रपंच कसाबसा भागत होता. मुलीच्या लग्नांत इच्छा असूनहि थोरांमोठ्यांना बोलावणें त्याला शक्य नव्हतें. किंबहुना लग्न कसें पार पडणार याची त्याला काळजी लागली होती. जिजामातेस त्याची ही हलाखी समजतांच तिने २५ होन व ५०० माणसांच्या जेवणाचें सामान त्याजकडे पाठविलें व त्या गरिबाची चिंता दूर केली. दुष्काळांत परागंदा झालेल्या एका कुलकर्ण्याच्या कुटुंबाचा तिने असाच परमर्श घेतला आहे. शिवराजांच्या राजकीय हालचालींकडे जागरूकतेने लक्ष देणारी ही कर्तव्यकठोर माउली त्यांच्या प्रजेचीसुद्धा साउली होऊन राहिली होती.

१६६५ सालीं औरंगजेबाने शिवाजीराजांवर प्रचंड मोहीम काढली. राजांचा विस्तारलेला स्वराज्यरूपी वटवृक्ष कोमेजूं लागला, फडफडूं लागला, उन्मळून पडणार की काय अशी भीति उत्पन्न झाली. जयसिंग व दिलेरखान दरबारांत विडे उचलून महाराष्ट्रांत वेगाने आले. महाराजांच्या मानाने त्यांचें सामर्थ्य अफाट होतें. त्यांनी झपाट्याने महाराजांचे किल्ले व मुलूख ताब्यांत घेऊन त्यांची नाकेबंदी केली. दिलेरखानाने पुरंदरला वेढा घातला. शत्रूचें सामर्थ्य ओळखून या वेळीं महाराजांनी तह करण्याचें ठरविलें. या तहान्वयें महाराजांना २३ किल्ले व चारपांच लाख होनांचा प्रदेश मोंगलांना द्यावा लागला. शिवाय औरंगजेबाची ताबेदारी पत्करून आग्र्यास जावें लागलें.

आग्र्यास जावयाचें म्हणजे जिवावरचा प्रसंग होता. प्रदेश दूरचा व अपरिचित. मोंगलांकडून केव्हा दगाफटका होईल याचा नेम नव्हता. तथापि सुरक्षिततेची जबाबदारी जयसिंगाने अंगार घेतल्यामुळे महाराजांनी

बालसंभाजीसह आगऱ्याला जाण्याचें ठरविलें. औरंगजेबाचा बादशाही दरबार व दरारा म्हणजे आहे तरी काय हेंहि महाराजांना एकदा बघावयाचें होतें. निघण्यापूर्वी महाराजांनी श्रीशंभूस, भवानीस व मातुश्रीस नमस्कार केला. प्यारा पुत्र दूरदेशीं औरंगजेबाच्या भेटीस निघाला, हें पाहून वृद्ध मातेला रडूं कोसळलें. शिवबा परत येतो की नाही अशी तिला भीति पडली. पण शूर पुत्राने तिला धीर दिला. ‘ तुझ्या आशीर्वादाने सुखरूप परत येईन ’ असें बोलले. मग तीनशे विश्वासू लोकांसमवेत राजांनी उत्तरेकडे कूच केलें. पराभूत झाले होते तरी वृत्ति पराभूत झाली नव्हती. उरलें होतें तेवढ्या आधारावरसुद्धा मोठ्या थाटांत व दिमाखाने राजे आगऱ्यास पोंचले.

औरंगजेब बादशहाने प्रवासांत व पुढे राजधानींत राजांची बडदास्त उत्तम ठेवली होती. पण प्रत्यक्ष दरबार-भेटीच्या प्रसंगीं राजांना भलत्याच ठिकाणीं स्थान देऊन त्यांचा अपमान करण्यांत आला. ज्यांनी राजांना एकेकाळीं पाठ दाखविली त्यांनासुद्धा वरचें स्थान देण्यांत आलें. राजांना ही गोष्ट सहन झाली नाही. आगऱ्याची हवा त्यांना सोसवेना ! तिथल्या दरबारी वातावरणांत त्यांचा कोंडमारा होऊं लागला. बादशहाकडे राजांनी निषेध प्रगट केला. बादशहाकडून समजाविण्याचा यत्न झाला. पण अपमान तो अपमान. राजांचें समाधान होईना. तब्येत बिघडली. बादशहाने डोळे वटारले, नखें काढलीं आणि हातीं आलेल्या सावजाला नजरबंद कैदेंत ठेवलें. राजांना ही स्थिति आणखीनच जाचक झाली. ‘ मला महाराष्ट्रांत जाऊं तरी द्या किंवा येथे ठार तरी मारून टाका ’ असे वैतागाचे व निर्वाणीचे उद्‌गार महाराज काढूं लागले. महाराजांवरील नजरकैद आणखी सक्त करण्यांत आली. आगऱ्यास आपल्या जिवाचें कांही तरी बरेंवाईट होणार असा त्यांना संशय येऊं लागला.


मग एक दिवस मोठ्या धाडसाने व युक्तीने, पेटाऱ्यांत बसून

संभाजीसह महाराज मोंगली मगरामिठींतून निसटले. (१७-८-१६६६). वेषान्तर करून ते जे निसटले ते प्रथम मथुरेस आले. तेथे मोरोपंतांचे मेहुणे कृष्णाजी होते. त्यांच्या हवालीं संभाजीला करून महाराज अतिशय त्वरेने महिन्याभरांत महाराष्ट्रांत आले. जिजामाता डोळ्यांत पंचप्राण आणून त्यांची वाट पाहत होती. पुत्राच्या गैरहजेरींत ती कारभारांत लक्ष घालीत होती. आगऱ्याला जाण्यापूर्वी महाराजांनी आपला शिक्का-मोर्तब तिच्या हवालीं केला होता व मोरोपंत, निळो सोनदेव, प्रतापराव आदींना तिच्या आज्ञेंत राहण्यास सांगितलें होतें. विशेष प्रसंगीं ती स्वत:च्या कोयरीच्या आकाराच्या फारशी शिक्क्याचाहि उपयोग करी. पण तिचें चित्त होतें पुत्राच्या येण्याकडे.

राजगडच्या पद्मावती माचीवरील वाड्यांत एके दिवशीं सकाळीं वर्दी गेली की, कोणी बैरागी साधु मातुश्रींचें दर्शन चाहतात. साधूंचें दर्शन ! अलभ्य लाभ ! शुभशकुनच. शिवबा कधी येईल हें तरी त्यांना विचारीन. मग आज्ञा झाली. ‘ त्यांना घेऊन या आंत. ’ ‘जगदंब, जगदंब’ अशी गंभीर वाणी उच्चारीत बैरागी ओसरीवर आले. त्यांच्यापैकी एकाने लवून मुजरा केला. मातुश्रींना ओशाळल्यागत झालें. मग दुसरा बैरागी सस्मित मुद्रेने पुढे झाला, आणि त्याने आवेगाने मातुश्रींचे पायच धरले. मातुश्री चपापल्या. बैराग्याच्या डोक्यावरील जखमेच्या खुणेकडे लक्ष जातांच भावनावेगाने त्या तत्काळ ओरडल्या, ‘ शिवबा, माझ्या लेकरा, ऊठ ! ’ मग मायलेकरें कडकडून भेटलीं. आनंदाने बेहोष झालीं. जणु जिवाशिवाचीच भेट झाली. ‘ भवानीने संरक्षून स्वास्तिक्षेम आणिलें. निराजीपंत, दत्ताजीपंत व राघोबा मराठा असे चौघे आले. राजगडास आलियावर थोर धर्म मोठा महोच्छाव केला. साखरा वांटल्या. तोफांचे आवाज केले. मातुश्रीने व कारकुनांनी व लष्कर, गड, कोट हशम सर्वांनी संतोष करून खुशाली केली. ’

एवढ्या आनंदांत रुखरूख नि चुटपूट लागली होती ती एका गोष्टीची. लाडक्या नातवाचा ठावठिकाणा नव्हता. ' शिवबा, शंभुराया कुठे रे आहे ? ' असे शब्द ऐकतांच राजेहि गहिवरले व आवंढा गिळून मोठ्या धीराने म्हणाले, ' मासाहेब, मी आलों तसाच एक दिवस तोहि येईल. त्याच्या जिवास अपाय होऊं नये म्हणून आम्हीच त्याचेविषयी अशुभ वार्ता पिकविली होती. पण आता शंभुरायाची काळजी नको. तो लवकर येईल. ' तरी पण म्हातारीस चैन पडेना. पाडवा आला. कुणाला अन्न गोड लागलें नाही. मग एक दिवस मथुरेचे कृष्णाजी संभाजीराजांना घेऊन राजगडास आले. आजीने त्यास कवटाळून धरलें. वीर, धीर आणि उदार शिवराजांनी कृष्णाजीच्या कुटुंबियांस पांचपंचवीस हजार होन बक्षिसादाखल देऊन त्यांच्या स्वामिनिष्ठेचा गौरव केला. जिजामातेस पुत्र भेटला, नातू भेटला, सर्व कांहीं मिळालें. आता डोळ्यांनी बघायची होती एक गोष्ट. मनांत आस होती एक. पेरलें होतें, तें वाढलें होतें, फुलत होतें. पण फळें लागायचीं होतीं, चाखायचीं होतीं. पूर्वीचे डोहाळे स्मरून मनांत खदखदत होतें की ' शिवबा, वडील स्वपराक्रमाने वजीर झाले, वडे सरदार झाले, राजासारखे वागले. पण ' राजे ' झाले नाहीत. तूं राजा हो. महाराष्ट्राचा राजा हो. डोळे मिटण्यापूर्वी मला एकदा तो सुखसोहळा बघूं दे. याचि देहीं याचि डोळां बघूं दे. '

० ० ०



## १३ : हर्ष आणि खेद

शिवाजीराजे आगऱ्याहून सुटून राजगडीं आले ते दगदगीने कांही दिवस आजारी पडले. विश्रांतीची त्यांना गरज होती. प्रकृतीला आराम पडतांच मग दिवसाचीहि उसंत न घेतां त्यांनी फौजा सिद्ध केल्या व मोंगलांच्या घशांत गेलेला मुलूख जिंकण्याची मोहीम काढली. राजांचें अद्‌भुत पलायन आणि त्यांनी नव्या जोमाने सुरू केलेली मोहीम बघून मोंगल, विजापूरकर, पार्तुगीज व इंग्रज या सत्तांना धास्तीच बसली. सर्वसामान्य जनता तर राजांना ईश्वराचा अवतार मानूं लागली.

राजांना आपल्या किल्ल्यांचें फार महत्त्व वाटत होतें. ‘गडकोट हेंच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचें मूळ, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी’ असें त्यांच्या राजनीतीचें सूत्र होतें. सिंहगड ( कोंडाणा ) हा त्यांचा प्यारा गड होता. त्यांच्या पराक्रमाची ती आरंभींची निशाणी होती. त्या गडाला इतिहास होता. तेव्हा या गडापासूनच त्यांनी आपल्या मोहिमेस आरंभ केला. कोंडाणा घ्यावा असें जिजामातेच्याहि मनांत होतें. पण हा किल्ला म्हणजे सिंहाचा जबडा. त्या जबड्यांत शिरणार कोण? कुणाला पाठवावें या अवघड कामगिरीवर? मग एक नांव आठवलें. तानाजी मालुसरे. आज्ञा होतांच तीनशे मावळ्यांनिशी घोरपड लावून तानाजी गडावर चढला. वेळ काळोखी. मावळ्यांच्या

आगमनाची चाहूल लागून मोंगल जागा झाला. किल्लेदार उदेभान शूर होता. तलवारीला तलवार भिडली. खणाखणी जोरदार झाली. तानाजी व उदेभान यांची गाठ पडून दोघेहि त्वेषाने लढले आणि परस्परांच्या वाराने धारातिर्थीं पडले ( ४–२–१६७० ). मावळ्यांनी किल्ला सर केला, गड आला पण सिंह गेला ! शिवाजी व जिजाईला ही वार्ता कळतांच दोघांना दारुण दुःख झालें.

कोंडाणा जिंकल्यावर पंधरा-वीस दिवसांनी जिजामातेची दुसरी सून सोयराबाई प्रसूत होऊन तिला मुलगा झाला ( २४–२–१६७० ). त्याचें नांव राजाराम ठेवण्यांत आलें. राजारामाच्या जन्मानंतर वर्ष-भराने शिवाजीराजांनी राजगडचा मुक्काम हलवला व सर्व कुटुंबियांसह ते रायगडला राहूं लागले. या वेळीं जिजामातेने सत्तरी ओलांडली होती. रायगडची हवा थंड व तेथे पाऊस फार. येथलें हवापाणी मातेला मानवेना म्हणून शिवाजीने गडाच्या पायथ्याशी, पाचाड गावीं तिच्यासाठी एक स्वतंत्र गढी ( वाडा ) बांधली. पाचाडला पूर्वीपासून बाजारपेठ होती. गडावर बरेंचसें सामान येथून जात असे. पाचाडच्या वाड्यांतच जिजामातेचें उर्वरित आयुष्य गेलें. वय झाल्यामुळे तिचें दिसण्याचें मान कमी झालें होतें. ऐकूंहि कमी येई. शरीर थकत चाललें होतें. कोणी कांही तक्रार घेऊन आले किंवा विचारपूस केली तर तेवढ्यापुरतें ती कारभारांत लक्ष घाली. एरवीचा सारा वेळ देवधर्मांत, पुराण-श्रवणांत ती घालवीत असे. शिवराजांनी मातुश्रीच्या येथल्या खर्चाची स्वतंत्र व्यवस्था करून तिच्यासाठी कारकून, दिवाण, नोकरचाकर, पुराणिक, दासी वगैरे नेमणुका करून दिल्या होत्या. आईच्या सुखसोयींत त्यांनी कांही कमी पडूं दिलें नाही.

१६७४ साल उजाडलें. महाराष्ट्राच्या इतिहासांत एक नवें पर्व सुरू झालें. वसंत ऋतूला आगळा बहर आला. राकट भूमीने नवतेज

धारण केलें. रखरखीत उन्हाळा संपत आला. सह्याद्रीच्या शिखरांवर सिंधुसागराचे विरळ मेघ चवऱ्या ढाळूं लागले. शिवराज्यभिषेकासाठी रायगडहि नटूं थटूं लागला. चारी बाजूंचे शत्रू महाराजांच्या पराक्रमाने निस्तेज, निष्प्रभ झाले होते. गरीब महाराष्ट्राची कणखर-राकट भूमि परदास्यांतून मुक्त झाली होती. मराठी मनें, मराठी माणसें शिवाजीला राजा मानूं लागलीं होतीं. पण अद्याप सकलांच्या मनांतून गुलामी वृत्ति गेली नव्हती. प्रतिष्ठितपणाच्या परंपरागत जीर्ण कल्पना कांही लोक उराशीं कवटाळून बसले होते. आदिलशहाला व औरंगजेबाला शिवराजांनी पाणी पाजलें तरी त्यांना तें.खरें वाटेना आणि वाटलें तरी गुलामी वृत्तीचीं जळमटें त्यांच्या मनांतून जाईनात. शिवराजांच्या कुलगोताची तर्कटांनी मग चौकशी आरंभिली. कांही नतद्रष्टांनी राजांच्या राजेपणाविषयी शंका घेतल्या. या शंकाकुशंकांना जागा राहूं नये व तमाम लोकांना स्वराज्याची प्रचीति आणून द्यावी यासाठी महाराजांनी स्वतःला राज्याभिषेक करून घेण्याचें ठरविलें.

गडावरील तटबंदी मजबूत झाली होती. इमारतींचें रंगकाम संपलें होतें. दारूगोळा भरपूर होता. शस्त्रागार सज्ज होतें. धनधान्यांनी कोठारें समृद्ध होतीं. तलावांत भरपूर पाणी खेळत होतें. जगदीश्वराचें मंदिर घंटानादाने निनादत होतें. माणसांची ये-जा कमालीची वाढली होती. प्रतापगडला जाऊन महाराजांनी श्रीभवानीचें दर्शन घेतलें. येतांना पाचाडास मुक्काम करून मातुश्रीस पालखींत घालून तिजसमवेत स्वारी गडावर आली. मातेला अस्मान ठेंगणें झालें. स्वर्ग दोन बोटें उरला. राज्याभिषेकासाठी गडावर गर्दीच गर्दी झाली. दहा हजार लोक जमा झाले. समारंभ विधिपूर्वक यथासांग होणार होता. काशीच्या गागाभट्टांकडे समारंभाचें पौरोहित्य देण्यांत आलें. तत्पूर्वी भारतांतील पवित्र नद्यांचे जलकुंभ गडावर येऊन पोचले. समारंभास आरंभ झाला.

२८ मे १६७४ रोजीं शिवराजांची मुंज झाली. ३१ ला सर्व राण्यांशीं समंत्रक वैदिक पद्धतीने पुन्हा विवाह झाले. तत्पूर्वी एक दिवस अरिष्टनाशार्थ राजांचा तुलादानविधि झाला. निरनिराळ्या धातूंचीं नाणीं व खाद्यपदार्थ यांची किंमत सुमारें लक्ष होन भरली. ही सारी रक्कम दानधर्मांत वांटण्यांत आली. प्रत्यक्ष राज्यारोहणसमारंभ शके १५९६ ज्येष्ठ शु. १३, शुक्रवार, दि. ६ जून १६७४ रोजीं पहाटे पांचच्या सुमारास झाला. सिंहासनावर बसण्यापूर्वी महाराजांनी मातुश्रीस वंदन करून तिचा आशीर्वाद घेतला. मग राजाराणीवर सुवर्णकलशांतून अभिषेक करण्यांत आला. ब्राह्मणांनी मंत्र म्हटले. लोकांनी जयजयकार केला. सकाळीं सात वाजतां छत्रपति शिवाजीमहाराज दरबारांत सिंहासनावर आरूढ झाले. गागाभट्ट, मोरोपंत व इतर अष्टप्रधान नजीक उभे राहिले. युवराज संभाजी महाराजांच्या पायाशीं पायरीवर बसले. मग सरदार-मानकऱ्यांचे मुजरे होऊन नजराणे सादर झाले. इंग्रजांच्या वकिलानेहि नजराणा नजर केला.

**देशाचा पालनवाला । तो शिवाजी राजा झाला**
**धर्माचा रक्षणवाला । तो शिवाजी राजा झाला**
**वैकुंठ रायगड केला । लोक तो देवगण बनला**
**शिवराजा विष्णू झाला । वंदन त्याला.**

या वैभवशाली समारंभास दीड लाख होन खर्च झाला. पंक्तिभोजनें अमाप झालीं. दानधर्म अपार झाला. नवें नाणें पाडण्यांत आलें. नवा राजव्यवहारकोश रचण्यांत आला. नव्या राजशकास आरंभ झाला. शिवराजांची राजमुद्रा नवतेजाने झळकूं लागली—


**प्रतिपच्चंद्ररेखेव । वर्धिष्णुर्विश्ववंदिता**
**शाहसूनोः शिवस्यैषा । मुद्रा भद्राय राजते ॥**




जिजामातेच्या डोळ्यांचें पारणें फिटलें. हा अनुपम सोहळा पाहून तिचे नेत्र आनंदाने दाटून आले. तिचे सकल मनोरथ पूर्ण झाले. जीवन कृतार्थ झालें. ' याचसाठी केला होता अट्टहास । शेवटचा दीस गोड व्हावा ' या स्थितिप्रत ती पोचली. अत्यानंदाने तिचा ऊर फाटण्याची वेळ आली. रायगडावरील गडबड, महोत्सव नी आनंदीआनंद बघून तिचे डोळे निवले. वेड्यागत झालें तिला. रात्रीं शिवबाला जवळ बोलावून कुरवाळून तिने आपल्या हाताने दृष्ट काढली, आणि म्हणाली, " शिवबा, भाग्याचा झालास, महाराष्ट्राचा राजा झालास. लोकांचा राजा झालास ! लोकांना निर्भय व सुखी केलेंस. पुरुषार्थाची शर्थ झाली. माझे मनोरथ पूर्ण केलेस. आज सोन्याचा दिवस पाहिला. अपूर्व तेज बघून घेतलें. आता या डोळ्यांना अंधार पाहावणार नाही. मनाला दुःख सोसवणार नाही. उद्या मला पाचाडांत पोचींव. देवाचें नांव घेत दिवस मोजीत राहीन. "

दुसऱ्या दिवशीं पालखींत घालून मातुश्रींना पाचाडांत पोचविण्यांत आलें. गडावरून आल्यापासून त्यांना थकवा फार वाटूं लागला. जिवाची आशा वाटेना. राजे रोज भेटून जात. मातेची प्रकृति एक दिवस फारच बिघडली म्हणून राजे सन्निध बसून राहिले. ज्येष्ठ वद्य ९, शके १५९६, बुधवारीं (दि. १७ जून १६७४) मध्यरात्रींचा समय प्राप्त झाला. जिजामातेचे नेत्र पैलतीराला लागले आणि तिचा वीरपुत्र तिच्या उशाशीं खाली मान घालून अश्रू ढाळीत बसला होता. मातुश्री गेल्याचें कोणी तरी सांगतांच अजाण बालकाप्रमाणे राजे ढसढसा रडूं लागले. राज्याभिषेकाच्या आनंदावर विरजण पडलें. त्या सुखसोहळ्यानंतर अकराव्याच दिवशीं महाराजांवर मातृवियोगाचें दुःख कोसळलें. आईची चिता बघून त्यांना पुन्हा पुन्हा भडभडून येत होतें. महाराजांना असें रडतांना कोणीच पाहिलें नव्हतें. पण आता रडून, शोक करून आई परत येणार नव्हती. विवेक करून तो निश्चयाचा महामेरू आणी बहुत जनांचा आधारू राजा कर्तव्यास लागला.

० ० ०





## १४ : स्मारक आणि पुण्यस्मरण

राजधानी रायगडाच्या पायथ्याशीं पाचाड नांवाचें छोटें गाव आहे. या गावांत गेलें की एक छत्री ( स्मारक ) उभारलेली दिसते. शिवाजी महाराजांनी ज्या ठिकाणीं आपल्या तीर्थरूप मातुश्रीस चंदनाची चिता रचून अग्नि दिला त्याच ठिकाणीं ही छत्री उभारलेली आहे. दुर्भाग्याची गोष्ट म्हणजे बरींच वर्षे आम्हा मराठ्यांस ती अज्ञात होती. तिचा शोध चालू शतकांत कुलाबा जिल्हा लोकल बोर्डानें नेमलेल्या रायगड समितीने लावला व मग कुठे आम्हा लोकांना जिजामातेचें स्मारक गवसलें. तेव्हा स्मशानवत् भूमींत एका विहिरीनजीक एक पडका चबुतरा आढळला. चबुतरा अष्टकोनी असून वर दोन खांब व कमान कशीबशी उभी होती. याच वेळीं विहिरीचा व वाड्याचा ठावठिकाणा लागला. वाडयाच्या पडक्या भिंती अद्याप दिसतात. दोन्ही स्थानें जिजामातेच्या सान्निध्यामुळे लोकांना पवित्र वाटूं लागलीं. सश्रद्ध लोक वाडयाची माती कपाळाला लावूं लागले. विहीर पायऱ्यांची आहे. इंदूरच्या महाराजांनी तिच्या जीर्णोद्धारासाठी मोठी रक्कम दिल्यामुळे आता ती विहीर दुरुस्त करण्यांत आली आहे. जिजामातेची पडीक अवस्थेंतील छत्रीहि आता नीट उभारण्यांत आली आहे. ज्यांना रायगडला जाण्याचा योग येईल त्यांनी पाचाडांतील या स्मरकाचें अवश्य दर्शन घ्यावें म्हणजे गडाच्या चढणीचा त्यांना शीण होणार नाही.

जिजामातेची थोरवी किती वर्णावी ! कोणत्या शब्दांत वर्णावी !

-कवीन्द्र परमानंद, जयराम पिंडये, गागाभट्ट इत्यादि शिवकालीन पंडितकवींपासून तों अलीकडील सावरकर-गोविंदांपर्यंत अनेक कवींनी व ग्रंथकारांनी तिच्या थोरवीचें गुणगान केलें आहे. वीरपत्नी व वीरमाता या नात्यांनी तिचें वर्तन खरोखर आदर्श होतें. पतीवर रागवावें-रुसावें अशी परिस्थिति असून तिने कधी शहाजी राजांचा राग केला नाही. उलट त्यांना देवासमान मानून त्यांच्या मृत्यूची वार्ता कळतांच ती पतिव्रता अग्निप्रवेश करण्यास निघाली. जिजामातेच्या भावजया व एक सून सती गेल्याचें इतिहासांत नमूद आहे. पतिनिधनसमयीं सन्निध असती तर तीहि सती जाण्याचा संभव होता. जिने सवतींचा व त्यांच्या मुलांचा कधी राग केला नाही ती पतीचा राग कां करील ? पति कोणत्या राजकीय स्थितींत व बंधनांत नांदत होता याची तिला जाणीव होती. वीरता, धीरता, समजूतदारपणा, सोशिकपणा, प्रेमळपणा आणि विनय या गुणांची जिजामाता खरोखर मूर्ति होती. बालपणीं पुत्रावर तिने जे संस्कार केले, शिकवण दिली त्यामुळेच तिचा पुत्र स्वाभिमानी, शूर व सदाचारी निघाला. शिवाजीच्या मोठेपणींसुद्धा तिचें मार्गदर्शन चालू होतें. शिवाजे राजे कोणत्याहि महत्त्वाच्या प्रसंगीं मातुश्रीचा सल्ला व आशीर्वाद घेत. पुत्राइतकेंच प्रजेविषयी तिच्या अंत:करणांत वात्सल्य होतें. गृहिणी या नात्यानेसुद्धा तिची वागणूक आदर्श होती. सासू, दीर, सुना, नातवंडें यांनी गजबजलेल्या घरांत ती माउली सावलीप्रमाणे नांदत होती. सुनांना तिचा धाक वाटत नसे, तर आदर वाटे. शिवरायांसारखा छत्रपति राजा ज्या स्त्रीला देवतेसमान मानीत होता त्या स्त्रिची थोरवी वर्णन करण्यास शब्दांचे बुडबुडे असमर्थ आहेत.

शब्दसृष्टीच्या ईश्वरांनी मात्र या थोर स्त्रीचें जें गुणगान केलें आहे तें आपण समजावून घेऊं. कर्नाटकांत शहाजीराजांच्या पदरीं जयराम

पिंड्ये नामक कवि होता. ' राधामाधवविलासचंपू ' या काव्याच्या एकादश उल्लासांत तो म्हणतो की—

**जशी चंपकेशी खुले फुल्लजाई । भली शोभली ज्यास जाया जिजाई**
**जिचे कीर्तिचा चंबु जंबुद्विपाला । करी साउली माउलीसी मुलाला.**

' फुललेल्या जाईने चाफा खुलून दिसावा त्याप्रमाणे जिजाईमुळे शहाजी शोभून दिसत होते. मुलांवर माउलीची असावी त्याप्रमाणे भारतांतील लोकांना जिजाईचा कीर्तिरूपी चंबु ( घुमट ) विसावा वाटत आहे. '

गागाभट्टाने शिवराजप्रशस्तींत जिजामातेची प्रशस्ति येणेंप्रमाणे केली आहे—

**कादंबिनीव जनजीवनदानहेतुः । सौदामिनीव सकलारिविनाशनाय**
**आलंबिनी भवति राजगिरेर्दिदानी।जीजाभिदा जयति शहाकुटुंबिनी सा**

मेघमालेप्रमाणे लोकांच्या जीवनास उपयुक्त होणाऱ्या, विद्युल्लतेप्रमाणे सर्व शत्रूंचा नाश करणाऱ्या, राजगडावर सर्वांचें आश्रयस्थान होणाऱ्या या शहाजीच्या पत्नीचा – जिजाचा – विजय असो ! '

' शिवाजी दी ग्रेट ' या इंग्रजी ग्रंथाचे विद्वान् लेखक कै. डॉ. बाळकृष्ण यांनी जिजामातेच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाविषयी एक मार्मिक वाक्य लिहीलें आहे. तें असें–' In one word, she had the head of a man over the shoulders of a woman. ' ( देहाने स्त्री असलेली जिजाई म्हणजे मूर्तिमंत पौरुषच होतें. )

कै. वासुदेवशास्त्री खरे यांनी ' शिवसंभव ' नाटकांत जिजाईची रंगवलेली व्यक्तिरेखा अशीच तेजस्वी आहे.

स्त्रीजातीविषयी शिवरायांच्या भावना केवढ्या उदात्त स्वरूपाच्या होत्या हें सर्वांना ठाऊक आहे. आपल्या सैनिकांपैकी स्त्रियांना कोणी

पीडा देऊं नये अशी त्यांची सक्त आज्ञा असे. स्त्रियांच्या अब्रूची व शीलाची महाराजांना अतिशय चाड होती. एक आख्यायिका अशी सांगतात की, १६५७ सालीं कल्याण-भिवंडीचा भाग काबीज करतांना आबाजी सोनदेवांच्या हातीं तिथल्या मुसलमान सुभेदाराची सून लागली. तिचें अप्रतिम लावण्य पाहून आबाजींनी ती शिवाजीमहाराजांस नजर केली. पण महाराजांनी तिचें लावण्य पाहतांच 'आमच्या मासाहेब तुमच्यासारख्या खुबसूरत असत्या तर आम्हीहि सुंदर निपजलों असतों' असे उदात्त उद्‌गार काढून त्या भयभीत मुलीस उंचीं वस्त्रें व दागदागिने देऊन तिच्या घरीं पोचतें केलें. महाराजांच्या या आदर्श वर्तनाने बिचारा आबाजी मेल्याहून मेल्यासारखा झाला. महाराजांच्या ठायीं स्त्रीजातीविषयी जो इतका आदर वसत होता त्याचें मुख्य कारण त्यांची स्वत:ची आदर्श माता.

न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे व भारताचार्य चिंतामणराव वैद्य या विद्वानांनी आपापल्या ग्रंथांत जिजामातेची जी वास्तविक योग्यता वर्णिली आहे ती उद्‌धृत करून या थोर स्फूर्तिशालिनी स्त्रीचें पुण्यस्मरण आम्ही संपवितों.

न्यायमूर्ति **म. गो. रानडे** 'मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष' (१८९७)

" जिजाबाई थोर कुळांत उत्पन्न झाली होती व तिचा शरीरसंबंधहि थोर घराण्याशीं झाला होता. पण एवढयाच गोष्टीवर तिची थोरवी अवलंबून नव्हती. तिच्या थोरपणास तिच्या अंगचे गुणच कारण होते. ती य:कश्चित् कुळांत उपजती तरीहि तिचे अलौकिक गुण झाकते ना. शिवाजीचें जिजाबाईवर अतोनात प्रेम असे. प्रत्येक गोष्टींत तो जिजाबाईचा सल्ला घेई. जिजाबाईने शाबासकी दिली की, केलेल्या सर्व श्रमाचें सार्थक झालें असें त्यास वाटे व नवीन स्वाऱ्याशिकारी करण्यास त्यास अधिक हुरूप येई. जिजाबाईने मांडीवर घेऊन पाजलेल्या गोड

उपदेशामृतामुळेच तो इतका धार्मिक बनला होता. जिजाबाईने पाजलेल्या बाळकडूनेच स्वकर्तव्याची त्यास पूर्ण ओळख करून दिली होती. कोणत्याहि अवघड कामगिरीवर जावयाचें असलें म्हणजे शिवाजी प्रथम आईचा आशीर्वाद घेई. शिवाजी जो इतका उदयास आला त्यास कारण तरी बहुतांशीं त्याची आई जिजाबाईच होय. ”

× × ×

भारताचार्य **चिंतामणराव वैद्य** 'वैद्यांचे ऐतिहासिक निबंध' (१९३१)

' शिवाजी महाराजांची मातृभक्ति विलक्षण होती. सुदैवाने जिजाऊ-सारखी पूज्य, निःस्पृही, करारी, सद्‌गुणी अशी त्यास मातुश्री लाभली होती. तिची भक्ति केवळ देवासारखी शिवाजीमहाराजांनी केली. तिला हरप्रयत्नाने संतुष्ट ठेवण्याचा त्यांनी आमरणान्त प्रयत्न केला व कोणतीहि गोष्ट तिला विचारल्याशिवाय केली नाही. नवऱ्याने दूर केल्यामुळे कदाचित् जिजाऊचा ओढा माहेराकडे जावयाचा; पण तिने स्वकर्म काय आहे याचा पक्का विचार करून माहेराचा मुळीच ओढा धरिल नाही व आपल्या मुलावर जीव की प्राण प्रेम करून आपल्या पतीच्याच जहागिरीवर तिने दिवस काढले. या गोष्टीचा परिणाम महाराजांच्या मनावर झाला असलाच पाहिजे. शिवाजीचे मातेवरील प्रेम व जिजाऊचें आपल्यावर विशेष प्रेम न करणाऱ्या पतिसंबंधीचें आचरण लक्षांत घेतलें म्हणजे रामचंद्र-कौसल्येची आठवण झाल्यावांचून राहत नाही. कौसल्येसहि पतीचा आधार कमीच होता. ती केवळ रामचंद्राच्या आधारावर जगली होती. '

० ० ०

# परिशिष्ट

## जिजामाता–पत्रें

[ शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १ व २ मध्ये जिजामातेचीं दहा-बारा पत्रें उपलब्ध छापलीं आहेत. त्यांतील कांही तिने स्वतः लिहवून पाठविलीं आहेत तर कांही तिच्याशीं संबंधित अशीं आहेत. हीं पत्रें जिजामातेच्या गुणांची उत्तम ओळख करून देणारीं असल्यामुळे प्रस्तुत चरित्रांत त्यांतील कांही निवडक पत्रें पुनर्मुद्रित केलीं आहेत. ]

( ५१३ ) शके १५६८ चैत्र व १२
पोटपत्र इ. स. १६४६ एप्रिल २

**दादाजी कोंडदेव**—विठ्ठल गिरमाजी हवालदार शिरवल. रामाजी विठ्ठल देशकुलकर्णी शिरवल हा पुण्यास येऊन **सौ. मातुश्री जिजाआऊसाहेब** यांच्या समक्ष बोलला की, आपला व तिमाजी पुरुषोत्तम यांच्या वतनाचा निवाडा गोत देऊन करावा. त्यावरून हें पत्र तुम्हांस लिहिलें आहे. तरी परगण्याचे दे॥ख, पाटील व वतनदार यांचे माथा घालून निवाडा गोतन्यायें करणें. शिवापूरचे मुक्कामीं वांटणीचा महजर करून दिला आहे त्यावर जाऊं नये.

( ६१४ ) शके १५७३
खुर्दखत फा. मु. सी. इ. स. १६५१–५२

अजर. जिजाबाई साहेब—हुदे. व मोक. मौ. वेहरवडे पर. पुणें गणो गबाजी तबीब कस. पुणें यास वेहरवडे येथे जमीन इनाम ( प्रज पदमाजी होनप ) खुद्दाचे फर्मान वजीर **महाराज व सिउबा** ( जिल्हेज ७ ) यांच्या खुर्दखताप्रमाणे चालू आहे. सालमजकुरी इनाम अमानत करण्याबद्दल **चिर. रा. राजे.** यांचें पत्र आलें. तरीहि इनाम अनामत न करितां पूर्वीप्रमाणे चालू ठेवणें. चिर. रा. **सिउबाचे** खुर्दखताचा उजूर न करणें.

( ६३१ ) शके १५७४ फाल्गुन शु. १
'प्रतिपच्चंद्र' मुद्रा इ. स. १६५३ फेब्रु. १८

वेदमूर्ति गोपाळभट बिन श्रीधरभट, वास्तव्य श्री महाबळेश्वर.

विद्यार्थी **शिवाजी राजे** दंडवत [ प्रधानाची मु. ] विनंति उपरी स्वामी

भले थोर अनुष्ठाते सूर्य–उपासनी पद्महस्ती, ऐसे जाणोन आपण मातुश्री **जिजाबाई आउसाहेब** वेदमूर्ति **प्रभाकर भट** उपाध्ये यांच्या विद्यमाने स्वामीपासून मंत्रउपदेश संपादिला. स्वामी आपले गुरु. स्वामीस आपण आपले अभ्योदयार्थ सूर्यप्रीत्यर्थ अनुष्ठान सांगितलें. प्रतिवर्षी वर्षासन द्याव-याची मोईन केली असे. बितपशील वर्षासन पैकी गल्ला नवशेरी. सूर्यप्रीत्यर्थ अनुष्ठान प्रतिवर्षी करावें त्यास नक्त होन १००.

याप्रमाणे होन पाछाई एकशे व गल्ला नवशेरी बारूळे मापें खंडी आठ वजन टकबंदी सवा अठरा मण व आरक्त वस्त्रें दोनी व पितांबर एक शाल एक व आसन एक याप्रमाणें वर्षासन व पूजा सामुग्री मोईन दानपत्रें करून दिल्ही असे. स्वामींनी आमचे **अभ्योदयार्थ सूर्यप्रीत्यर्थ** प्रतिवर्षी **अनुष्ठान** उत्तरोत्तर करावें व मंत्रउपदेशहि स्वामींचे वंशपरंपरेने आमचे वंशपरंपरेस करावा. आपण संकल्पपूर्वक प्रतिवर्षी वर्षासन दानपत्र करून स्वामीस दिल्हे. हें आपले वंशपरंपरेने उत्तरोत्तर चालवावयास अन्यथा करूं तरी श्री **महादेव साक्ष**. स्वामींनी निरंतर देवापाशीं आमचें कल्याण इच्छावें. लेखनालंकार मोर्तब.

(१२३४) शके १५९० पौष शु. ६
इ. स. १६६८ डिसें. २८

राजश्री **जिजाबाई**– बाबाजी रामदेश कु० पर० पुणें

मुकुंद कान्हो देशकु० याचे तकसिमेस तुम्ही खलेल करतां तरी सालाबादप्रमाणे वागणें. नशते कथले केल्या, चिरंजीव कांही कोन्हाचा मुल्हाजा करणार नाहीत. ऐसे समजोन घसघस न करणें. पेस्तर बोभाट आला म्हणजे बोल नाही.

(१२४४) शके १५९० फाल्गुन व. ८
इ. स. १६६९ मार्च १५

अजर. रा. **जिजाबाई** साहेब. विठोजी हैबतराऊ सिलंबकर देशमु. तर्फ गुंजनमावल

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
१६
अनुक्रम ...................... दि: ..................


तुम्ही आपली कन्या गोमाजी नाईकाच्या लेकास दिधली. लग्न सिधी कारणें तुम्हांस हुजूर बोलाविले. तुम्ही सांगितलें की, सांप्रत रोजीचे खावयास नाही आणि लग्नसिधी कैसी होईल. त्यावरून तुम्हास होन २५ व ५०० माणसाची जेवणाची सामान दिधलें असे. लग्न सिध करणें.

० ० ०

## प्रमुख संदर्भ-साहित्य


१. कवीन्द्र परमानन्दकृत श्रीशिवभारत—**स. म. दिवेकर**
२. राधामाधवविलासचंपू : ( जयरामपिंड्येकृत )-**वि. का. राजवाडे**
३. शिवचरित्रप्रदीप—**आपटे-दिवेकर**
४. शिवकालीन पत्रसारसंग्रह—( खंड १ व २ ) **केळकर–आपटे**
५. श्रीशिवप्रभूचें चरित्र ( सभासदाची बखर )—**वि. स. वाकसकर**
६. श्रीशिवछत्रपति महाराज ह्यांचें सप्त प्रकरणात्मक चरित्र ( चिटणीस विरचित )—**का. ना. साने**
७. House of Shivaji—Jadunath Sarkar
८. Shivaji and his Times—Jadunath Sarkar
९. दत्तोपंत आपटे लेखसंग्रह—**द. वि. आपटे**
१०. महाराष्ट्रीय ज्ञानकोश—**डॉ. श्री. व्यं. केतकर**
११. युगप्रवर्तक शिवाजीमहाराज—**वा. कृ. भावे**
१२. राजा शिवछत्रपति—**ब. मो. पुरंदरे**
१३. छत्रपति संभाजीमहाराज यांचें चरित्र—**वा. सी. बेंद्रे**
१४. छत्रपति शिवाजीमहाराज—**दि. वि. काळे**


० ० ०

## म. श्री. दीक्षित यांचीं प्रकाशित पुस्तकें

**१. डॉ. आंबेडकर**
**२. पेशवाईतील रत्नें**
**३. सत्तावनचे सप्तर्षि**
**४. पिचलेलीं मनगटें**
**५. तात्या टोपे**

१०८२५